म. ग्रं. सं. ठाणें
विषय कै- प्रवास
सं. न. 220
१८५८



REFBK 0009737
REFBK-0009737

# पगण्यानें होत आहे रे

# ‘केल्यानें होत आहे रे...’

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 22203. वि: 12.8.9.1987
क्रमांक 220 नों: दि: 20/9/80

एलमोर एम्. मक्की

REFBK-0009737
REFBK-0009737

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 26376
स्थळप्रत

एक रुपया पन्नास नये पैसे
( दीड रुपया )

कैलास प्रकाशन ३.

*

प्रथमावृत्ति
जून १९५७

*

मूळ पुस्तक
'The People Act.'

*

वेष्टन
स्टुडिओ डी. जी. जी.

*

मराठींत संपादन
नारायण पुराणिक

*

: मुद्रक :
व्यं. रा. शिगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार, पुणें २.

*

: प्रकाशक :
कैलास प्रकाशन,
१२ त्रिभुवन रोड,
मुंबई ४.

Copyright, 1955, by Harper & Brothers. Abridged from the Book and Reproduced by Permission of the Publisher.

कैलास
प्रकाशन

# पुस्तक परिचय

अमेरिका जगांतील सर्वांत श्रीमंत देश आहे. पण ह्या देशांतहि मागासलेलीं खेडीं आहेत. त्यांना प्रगतीसाठीं कामें करावीं लागतात.

सरकारी मदतीशिवाय प्रगति होत नाहीं असें नाहीं. सरकारी मदत प्रगतीला निःसंशय पोषक ठरते. पण ह्या मदतीचा उपयोग करून घेण्यासाठीं गांवांत एकी हवी आणि सामुदायिक संघटना हव्यात.

ह्याच शक्तीच्या जोरावर आपली प्रगति घडवून आणणाऱ्या सहा अमेरिकन गांवांची माहिती ह्या पुस्तकांत दिली आहे. ती वाचली तर आपलीं खेडीं, आपलीं माणसं, आपल्या गरजा नि अडचणी आणि ह्या अमेरिकन खेड्यांतलीं माणसं नि त्यांच्या अडचणी ह्यांत फरक तर नाहींच पण भरपूर साम्य असल्याचें आपल्या लक्षांत येईल.

लेखकानें हीं खेडीं पाहिलीं, त्यांच्या प्रगतीचा अभ्यास केला नि मग त्यांच्या कथा अमेरिकन नभोवाणीवरून ध्वनिक्षेपित केल्या. आपल्याला हें पुस्तक आवडेल असा विश्वास वाटतो.

—प्रकाशक.

अनुक्रम 22203 दि:
क्रमांक 220 नों: दि:
ग्रंथालय
९८३७

# १

# डोंगरावरील चमत्कार

[ ज्या गांवांत लोकांना डॉक्टरची अतिशय भीति वाटे त्या गांवाचें आरोग्य सुधारायचा निर्धार करून एका डॉक्टरानें गांवांत नुसतें हॉस्पिटलच उभें केलें नाहीं; तर तेथें नवें जीवन आणि ऐक्य निर्माण केलें.

आपल्याकडे अशीं कितीतरी खेडीं आहेत. त्यांनाहि असेच प्रयत्न करावे लागतील. ]

आमच्या शेवरोलेट गाडीनें चौऱ्याहत्तर नंबरच्या रस्त्यावरील एक कठीण वळण घेतलें नि आमचें लक्ष नुकत्याच रंगविलेल्या " येथून हिकरी नट खिंड सुरू होते " ह्या पाटीकडे गेलें. त्याच रस्त्यावर पुढें कांहीं मैलांवर ' बाहेर जाण्याचा रस्ता ' अशी पाटी आहे. खिंडींतल्या छोट्या वसाहतींनीं आपल्या नव्या जिवनाच्या सुरुवातीला जो आनंदोत्सव साजरा केला त्या उत्सवांत ह्या पाट्या लावण्यांत आल्या.

ह्या छोट्या वसाहतींत राहणाऱ्या सुमारें बाराशें कुटुंबीयांचे पूर्वज स्कॉटिश, वेल्श आणि इंग्लिश होते. कित्येक पिढ्यांपासून ह्या खिंडीच्या हद्दींतच आपलें सारें जग आहे असें हे रहिवासी मानीत आले. खडकाळ घळईत सरळसोट व अजस्र दरडीच्या आश्रयानें ते राहात किंवा कुठें धांवत्या झऱ्याला बिलगून एखाद्या उंच जागीं त्यांनीं घरटीं बांधलेलीं असत. डॉक्टर म्हटला कीं त्यांची भीतीनें गाळण उडे. अत्यवस्थ नातेवाइकाला शस्त्रक्रियेसाठीं डॉक्टरच्या हवालीं करण्यापेक्षां त्याचें मरण बघितलेलें पुरवलें अशी त्यांच्या मनाची प्रवृत्ति बनली होती.

' बॅट केव्ह ' गांवच्या लोकांची डॉक्टरांच्या सुरीची भीति ज्या तरुण डॉक्टरानें घालविली त्याचें नांव जॉर्ज बॉंड. जॉर्ज दिसायला खूप देखणा, सहा फूट दोन इंच उंच आणि दोनशें पौंड वजनाचा धिप्पाड गृहस्थ होता. जॉर्ज इथें नसता तर आज जी गोष्ट आम्ही इथें सांगत आहोंत ती सांगायचा प्रसंगच आला नसता.

खिंडीच्या वेशींतून आंत शिरल्यावर थोडें पलीकडे ' व्हॅली क्लिनिक आणि हॉस्पिटल ' अशी पाटी दिसते. हॉस्पिटलची एकमजली इमारत पन्नास फूट रुंद आणि शंभर फूट लांब आहे. बॉंड इथें काम करतो. हॉस्पिटलबाहेर एक जीप उभी होती. आम्हीं चढण ओलांडून आंत शिरतांच पांढरा झगा घातलेला एक धिप्पाड गृहस्थ बाहेर आला व आमच्याशीं हस्तांदोलन करीत म्हणाला, " आपण ताबडतोब निघालों तर—"

आम्ही त्याच्या जीपमध्यें बसलों. डोंगरमाथ्यावरून खिंडीवर काळे ढग सरकत होते. " वादळ सुरू होण्यापूर्वी तुम्हांला हा भाग पाहायला मिळावा अशी माझी इच्छा आहे." तो म्हणाला, " तुम्ही तुमचं रेकॉर्डिंग मशिनहि बरोबर घ्या. तुम्ही आतां जें कांहीं ऐकाल त्यांतलं कांहीं रेकॉर्ड करून ठेवावंसं वाटेल तुम्हांला."

मी आणि एन्. बी. सी. चा लेखक हाझाम आमचें मिनिटेप रेकॉर्डिंग मशीन घेऊन जॉर्जच्या जीपमधून निघालों. कांहीं क्षणांतच ताशीं पन्नास मैलांच्या वेगानें जीप धावूं लागली. धिप्पाड शरीराचा जॉर्ज आपल्या पायांना जीपमधील जागा अपुरी पडते म्हणून पाय पोटाशीं धरून ती वेगानें चालवीत होता.

रस्त्याच्या डाव्या बाजूला वळून जीप एका छोट्या रस्त्यानें दोन्ही बाजूंच्या झुडपांना घाशीत डोंगर चढूं लागली. " डगी कॉनॉरची नि तुमची ओळख करून देतों." जॉर्ज जीपच्या आवाजापेक्षां मोठ्यानें ओरडून म्हणाला, " म्हातारी सुईण होती. वरच्या झोपडींत राहते. आपण येणार असल्याचें मीं तिला सांगितलें आहे."

सुकलेल्या एका ओढ्याची घळ ओलांडून, डोंगराची चढण चढून आमची जीप एका मोडक्या मोटरीजवळ येऊन पोंचली. त्या मोटरीचीं मागचीं चाकें जमिनींत खोल रुतून बसलीं होतीं. इथें रस्ता संपला होता. आम्ही पायीं चालूं लागलों. हा वेळपर्यंत पाऊस जोरानें पडूं लागला नि आम्ही भिजून चिंब झालों. आमचें मिनिटेप मशीन भिजूं नये म्हणून आम्हीं तें लपेटून घेतलें. थोडी उघडीप होतांच आम्ही परत चालूं लागलों.

पायवाट संपवून आम्ही जेव्हां मोकळ्या जागेजवळ आलों तेव्हां डगी आमची वाट पहात झोपडीच्या उंच ओसरीवर उभी असलेली दिसली. ती अंगानें किडकिडीत होती आणि तिनें आपल्या केसांचा अंबाडा घातला होता. झोंपडींत तिच्याबरोबर तिचा पुतण्या राहात असे. झोंपडीमागें कुंपणाला एक गाय बांधलेली होती. जमिनीचा एक तुकडा नांगरलेला होता. कांहीं कोंबडीं पंख फडफडवीत धांवत होतीं.

आम्ही झोपडीजवळ पोंचेपर्यंत पाऊस बंद झाला, ऊन पडलें, आणि डोंगराच्या कडेवर धुकें दिसूं लागलें. डगीच्या झोपडीमागें कांहीं अंतरावरच डोंगरमाथा होता. बॉंड आमची ओळख करून देत म्हणाला, " मीं तुला सांगितलेलीं माणसं हींच डगी. "

आपल्या स्वतःच्या मुलाशीं वागावें तशा मोकळेपणानें डगी डॉक्टर बॉंडशीं वागत होती. त्याच्या लहानपणापासून ती त्याला पाहात आली होती. तिला त्याचा अभिमान वाटत असावा असें दिसलें. आमच्चें रेकॉर्डिंग मशीन पाहून ती मुळींच बिचकली नाहीं.

" जॉर्ज बॉंडची आणि तुझी पहिल्यानें केव्हां भेट झाली तें सांग ना आम्हांला. " असें मीं तिला विचारलें तेव्हां, " त्याचं असं झालं " म्हणत आपल्या खणखणीत बोलींत ती पूर्वीचें सांगूं लागली. तिच्या आवाजाचें नि शब्दोच्चारांचें वैशिष्ट्य आमच्या रेकॉर्डिंग माशिननें टिपून घेतलें असलें तरी तें शब्दबद्ध करून इथें लेखणीनें प्रकट करणें कठीणच आहे. डगी सांगूं लागली – " एकदां माझे काका एका शिकारी कुत्र्याच्या शोधांत इथें आले. त्यांच्याबरोबर डॉक्टर बॉंड होता. बारा वर्षांचा असेल

तेव्हां तो. मी त्यावेळीं आजारी होतें. मला आठवतं कीं मला दिलासा देत तो म्हणाला कीं, ‘मी डॉक्टर होऊन येईन आणि तुला फुकट औषध देईन.’ त्यानंतर तो मोठा झाला, त्यानें स्वतःला डॉक्टरहि केलं. माझ्यासाठीं त्यानें खूप केलं. इथल्या सगळ्याच लोकांना त्याच्या हातानें फार गुण पडतो.” असें म्हणून कृतज्ञतेनें डॉक्टर बॉंडकडे ती पाहूं लागली.

त्या खिंडीच्या पांचशें मैलांच्या परिसरांत जे सहा हजार लोक राहातात त्यांतलीच डगी ही एक. बॉंड ह्या सर्वांचा जसा डॉक्टर आहे तसा मित्रहि आहे.

१९२६ सालीं जॉर्ज बारा वर्षांचा असतांना ह्या भागांत आला होता. त्याच वेळीं तो डगी कॉनॉरला भेटला. ती तेव्हां आजारी होती. पुढें जॉर्जच्या कुटुंबीयांनीं जवळच एक शेत विकत घेतलें नि छोटा जॉर्ज उन्हाळ्यांत डोंगरावर हिंडूं लागला. तिथल्या शेतावर तो काम करी. लांकूड कापणाऱ्या गिरण्यांत जाई आणि संध्याकाळीं शेतकऱ्यांच्या झोपड्यांत जाऊन खड्या आवाजांत पहाडी गीतें गात बसे. तीं माणसें, ती हवा, जणूं जॉर्जच्या रक्तांत भिनलीं. डगीच्या काकाचा मुलगा फेट हेडॉक त्याचा जिवलग मित्र झाला. एकदां चार्ली नांवाचा एक इसम एकामागें एक चार झटके येऊन मेलेला जॉर्जनें पाहिला. पण चार्लीला औषध द्यायला जवळपास कोणी डॉक्टरच नव्हता. आपलीं निम्मी मुलें जगलीं तर ह्या भागांत राहाणारी माता स्वतःला भाग्यवान् समजे हें जॉर्जच्या लक्षांत आलें. त्यानें निश्चय केला ‘आपण डॉक्टर व्हायचं नि इथेंच परत यायचं.’

पेन्सिल्वेनियामधील मर्सरबर्ग येथें त्याचें प्राथमिक शिक्षण झालें नि पुढील शिक्षण फ्लोरिडा विद्यापीठांत. सुटींत तो रस्ते–बांधणीवर किंवा जहाजांच्या कारखान्यांत मजुरी करी. वैद्यकीय शिक्षणासाठीं त्याला प्रवेश मिळविणें फार कठीण गेलें. कारण बहुतेकांनीं त्याचें शास्त्रीय ज्ञान अपुरें असल्याचें सांगितलें. शेवटीं मॅगिल विद्यालयांत त्याला प्रवेश मिळाला. एक वर्षानंतर त्यानें मार्जोरी बॅरिनो ह्या मुलीशीं लग्न केलें. १९४४ सालीं

त्याचें वैद्यकीय शिक्षण संपून त्याला पदवी मिळाली आणि शार्लट येथील मेमोरियल हॉस्पिटलमध्यें तो वैद्यकीच्या व्यवसायांतील प्रारंभिक अनुभव घेऊं लागला.

अठरा महिन्यांनंतर तो, त्याची बायको आणि तीन मुलें 'बॅट केव्ह' ला आलीं. रॉकवुड इनच्या आवारांत असलेलें एक छोटें घर त्यानें भाड्यानें घेतलें. "ह्यापुढें इथें जन्मभर हात चोळीत बसावें लागणार," अशीच त्या वेळीं तरी त्याची भावना होती. त्यानें मोठ्या रस्त्यावर तीन खोल्या भाड्यानें घेतल्या; त्यांत दवाखाना थाटला; दुखणाइतांसाठीं एक खाट टाकली आणि मदतीसाठीं एक परिचारिका नोकरीवर ठेवली. अर्थात् त्याला फार दिवस हात चोळीत बसावें लागलें नाहीं. कारण लोकांनाच डॉक्टराची गरज होती.

डगीच्या घरून आम्ही परत आल्यावर बॉंडनें आमचा निरोप घेतला. त्याचा मित्र फेट हेडॉक आतां बांधकामाचा कंत्राटदार झाला होता. आम्हांला तो म्हणाला, "आमच्या गांवाजवळ कुणी डॉक्टरच नव्हता. शहरांतले डॉक्टर रात्रीच्या वेळीं इथें यायला तयार नसत. थंडीच्या दिवसांत बर्फानें रस्ते बंद होत आणि मग त्यांना असल्या जागीं यायला पायीं चालावं लागे."

गांवचा वाणी बेल निक्स म्हणाला, "आज माझं वय पंचेचाळीस वर्षांचं आहे. माझं सारं आयुष्य इथेंच गेलं. डॉ. बॉंड हा इथला पहिला डॉक्टर."

दवाखाना सुरू केल्यापासूनच डॉ. बॉंडला भरपूर काम पडत असे. पहिल्याच आठवड्यांत न्यूमोनिया झालेलें एक सबंध कुटुंब त्यानें मृत्युमुखांतून ओढून काढलें. ही बातमी सगळीकडे पसरली.

त्याच्या दवाखान्यांत येणें शक्य असलें तरी लोक बहुधा त्याला आपल्या घरीं बोलवीत. आपल्या रुग्णांना भेटण्यासाठीं तो रोज आपल्या जीपनें पावणेदोनशें मैल प्रवास करी. रस्त्यांत रिपरिपीत चिखल असो कीं बर्फ गोठलेलें असो, त्याला जावेंच लागे. बहुधा त्याला म्हाताऱ्या माणसांना

तपासावें लागे. ह्या प्रत्येक भेटीपायीं तास–दीडतास तरी खर्च व्हायचा. पण तिथल्या समाजांत वृद्धांना फार आदराचें स्थान होतें, आणि बॉंड डॉक्टर असला तरी त्यालाहि ह्या चालीरीति पाळणें भाग होतें.

पण ह्या अडचणींपेक्षां मोठी अडचण होती ती म्हणजे लोकांनीं इंजेक्शनच्या सुईची आणि डॉक्टरांच्या चाकूची घेतलेली भीति. बॉंडनें ह्यासंबंधींची एक आठवण सांगितली.

" पहिल्याच आठवड्यांत एका छोट्या मुलीला घेऊन तिची आई माझ्याकडे आली. मुलीला असह्य वेदना होत होत्या. मीं तपासलं व तिचं ॲपेंडिक्सचं ऑपरेशन करणं आवश्यक असल्याचं बाईला सांगितलं. आईनें साफ नाकारलं. तिनें मुलीला एरंडेल द्यायचा आग्रह केला. माझ्याकडे आणण्याआधीं तिला रेचक दिलेलं होतंच. मीं तिला साफ सांगितलं, 'तूं ऑपरेशन करूं दिलं नाहींस तर मुलीचं प्रेत घेऊनच तुला घरीं जायची पाळी येईल!' एक तासानें तिचा विरोध असूनहि मीं ऑपरेशन केलं व मुलगी वांचली."

डोंगरावर राहणाऱ्या एका म्हातारीच्या मुलीच्या बाळंतपणासाठीं बॉंडला एकदां बोलावणें आलें. तो गेला तेव्हां बाळंत होत असलेल्या त्या मुलीच्या अंगावर माशा घोंगावत होत्या. त्यानें ॲंटि–टिटानसचें इंजेक्शन द्यायची तयारी केलेली पाहतांच म्हातारीनें त्याला ठार मारण्यासाठीं बंदूक उचलली. बॉंडनें आपलें पिस्तूल काढून जवळ ठेवलें नि इंजेक्शन दिलें.

आपल्या भावाबद्दल डगी कॉनॉरनें आम्हांला सांगितलें कीं, " डॉक्टरांच्या सुरीची भीति घेतल्यामुळेंच माझा भाऊ गेला. तो लांकडं तोडीत असतां त्याचं ॲपेंडिक्स फुटलं. ऑपरेशन करायचं त्यानें साफ नाकारलं. तीन दिवसांत तो मेला." ह्याप्रमाणें बहुतेकांना आपल्या संबंधितांपैकीं कुणीना कुणी केवळ वैद्यकीय उपचाराच्या भीतीनें मृत्युमुखीं पडल्याचें आठवत होतें.

तरुण डॉक्टर बॉंडनें आपल्या शक्त्यनुसार करतां येईल तेवढें केलें. शक्य तेथें देवीप्रतिबंधक लस टोचली, बाळंतपणें केलीं, ऑपरेशन्स केलीं. त्याची आतां सर्वांशींच ओळख झाली होती. " एखादा रोगी जेव्हां

अनुक्रम 22203 दि. 22-1-91
क्रमांक 220 नों. दि. 28-1-91

मृत्युमुखीं पडतो तेव्हां माझा एकादा मित्र नाहींसा झाल्यासारखं मला वाटतं." असें डॉ. बॉडनें सांगितलें. रूथ मेरिल नांवाच्या स्त्रीच्या तोंडून ह्या विधानाच्या सत्यतेचा निर्वाळा मिळाला. ती म्हणाली कीं, "पैसे नसले तरी डॉक्टर उपचार करायला मागेंपुढें पहात नाहींत." फेट हेडॉक म्हणाला, "त्याच्यावर विश्वास टाकून खुशाल निश्चिंत व्हावं."

ज्या मुख्य रस्त्याला लागून ह्या वसाहती आहेत त्यांवरील रहदारी खूपच वाढली आणि त्याबरोबर अपघातांची संख्याहि पण. अशा प्रसंगीं साधारण औषधोपचार उपयोगी पडत नसल्याचें बॉडच्या लक्षांत आलें. शिवाय ह्या भागांत डॉक्टरहि अगदींच थोडे होते. त्याचें विचारचक्र चालू झालें.

१९४७ च्या मध्यास आपलें स्वप्न स्पष्ट करण्याची वेळ आली आहे असें बॉडला वाटलें. "एक जीप, एक औषधांची पिशवी आणि छोटासा दवाखाना एवढ्याच साधनांच्या जोरावर रोगप्रतिबंधक उपाय अंमलांत आणणं अशक्य होतं." तो म्हणाला.

त्याच्या मनांत एक छोटेंसें हॉस्पिटल सुरू करण्याचें स्वप्न कितीतरी दिवसांपासून होतें. आतां तें स्पष्ट करण्यास त्यानें सुरुवात केली. तो जेथें जेथें जाई तेथें तेथें हॉस्पिटलची आवश्यकता सुचवी. प्रार्थनेला लोक चर्चमध्यें जमले कीं तेथेंहि हॉस्पिटलबद्दल चर्चा होई. त्यांना डॉक्टर हवा होता. हॉस्पिटल नसलें तर डॉक्टर फार दिवस राहणार नाहीं असें त्यांना वाटलें. डॉक्टर निघून जाण्याची शक्यता आहे हें लक्षांत येतांच ते काळजींत पडले.

आपल्याला हवें असलेलें छोटें हॉस्पिटल सरकारी अधिकारी देणार नाहींत हें बॉडला माहीत होतें म्हणून तो कांहींच बोलला नाहीं. त्यानें लोकांनाच विचार करायला लावलें. बारा खाटांचें हॉस्पिटल 'बॅट केव्ह'ला पुरे आहे असें बॉडचें मत होतें; तर इतकें छोटें हॉस्पिटल फार खर्चाचें आणि शेवटीं तोट्याचें ठरतें म्हणून सरकारी अधिकारी त्याविरुद्ध होते. म्हणूनच बॉड प्रथम स्पष्ट कांहीं बोलला नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांचें म्हणणें चूक असल्याचें आपण सिद्ध करूं शकूं असा त्याला आत्मविश्वास होता. तो

म्हणे, " ग्रामीण जीवनाचा पाया ज्या चार भक्कम आधारांवर उभारला आहे ते चार आधार म्हणजे घर, शाळा, धर्ममंदिर आणि आरोग्ययोजना."

एक वर्षांत त्या समाजांतील आदरणीय व्यक्ति कोण आहेत तें त्यानें हेरून ठेवलें होतें. ज्या चार तालुक्यांत तो काम करीत असे त्यांतल्या अशा व्यक्तींना त्यानें ऑक्टोबर १९४७ मध्यें एकत्र बोलावलें. सर्वजण आल्यावर जॉर्जनें आपलें म्हणणें स्पष्ट केलें. बालमृत्यूच्या मोठ्या संख्येचा विचार करावयास त्यांना सांगितलें. नंतर प्रत्येकाचें वैयक्तिक मत विचारलें. हॉस्पिटल हवेंच असें प्रत्येकानें स्पष्ट सांगितलें. हॉस्पिटल हवें असें ठरल्यावर दोन प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहिले. हॉस्पिटल मिळणार कसें ? पैसा कसा उभा होणार ? किती खर्च लागेल ह्याचा अंदाज बॉंडनें त्यांना दिला. प्रत्येक खाटेला चौदा हजार डॉलर्स ह्याप्रमाणें बारा खाटांच्या हॉस्पिटलचा खर्च एक लक्ष अडुसष्ट हजार डॉलर्स ( सुमारें ७ लक्ष ९८ हजार रुपये ) इतका होणार होता. ह्या पलीकडे बॉंडनें त्यांना कांहीं सांगितलें नाहीं. हें काम सोपें नाहीं हें त्यानें स्पष्ट केलें, पण निश्चित् कसलीच योजना पुढें ठेवली नाहीं. त्यांनींच विचार करून हें ठरवावें असें त्याला वाटत होतें. पण घरीं जाण्यापूर्वीं त्या सर्वांनीं एक मंडळ नेमायचा निर्णय घेतला. " मंडळ नेमल्यावर काम कसं करावयाचं तें स्पष्ट होईल. " ते म्हणाले

ह्यानंतरच्या ६ महिन्यांत जॉर्ज भेटेल त्याच्याशीं ह्या एकाच मुद्यावर चर्चा करीत होता. त्यानें बोलाविलेल्या सभेंतील इतर माणसांचें लक्षहि ह्या एकाच गोष्टीभोंवतीं केंद्रित झालें होतें. ह्या सर्वांची दुसऱ्यांदा बैठक भरली असतां तींत एक मंडळ नेमण्यांत येऊन त्यांत उपस्थितांपैकीं ६ जणांचा व बाहेरच्या कांहीं प्रतिष्ठित नागरिकांचाहि समावेश करण्यांत आला. थोड्याच दिवसांत ही सभासदसंख्या विसावर गेली. सर्व सभासदांनीं ' व्हॅली क्लिनिक आणि हॉस्पिटल ' संस्था स्थापून नोंदवली व ते त्या संस्थेचे विश्वस्त झाले.

" आमच्यामागें योग्य माणूस उभा असल्यानें आम्ही यशस्वी होऊं ह्याची आम्हांला खात्री होती." असें फेट हेडॉकनें सांगितलें. जॉर्ज बॉंड त्यांचाच होता नाहीं का ?

पहिली गरज इमारतीची होती. 'बॅट केव्ह'पासून एक मैलावर एका टेकडीच्या उतारावर एका शाळेची पडकी इमारत होती. पण तिचा पाया आणि बाहेरच्या भिंती मजबूत होत्या. ही इमारत मिळाली तर बांधकामाचा बराच खर्च वांचेल असें बॉंडला वाटलें. पण ज्या समितीची ती इमारत होती तिनें इमारत देतां येणार नसल्याचें सांगितलें.

ह्याच वेळेला कॉंग्रेसच्या ( अमेरिकन लोकसभेच्या ) एका सभासदाच्या मुलाला मुख्य सडकेवर अपघात झाला असतां बॉंडनें त्याच्यावर उपचार केले. ह्या कृतज्ञ खासदाराला ह्या उपकारांची भरपाई करावयाची होती. बॉंडची अडचण लक्षांत येतांच त्यानें समितीच्या सभासदांशीं चर्चा केली. सभासदांना बॉंडचा हेतु मान्य झाला. कायदेशीर व्यवहार व्हावेत म्हणून त्यांनींच दीड हजार डॉलर्स जमा केले आणि ती इमारत विकत घेऊन हॉस्पिटलच्या विश्वस्तांना देण्यासाठीं बॉंडला ती रक्कम दिली. मग कायदेशीर व्यवहार पुरे करण्यासाठीं इमारतीचा लिलांव पुकारला, जाहिरात दिली, लिलांव केला. फक्त एकाच माणसानें इमारतीची मागणी त्या लिलावांत केली—डॉ० बॉंडनें. इमारत ताब्यांत येतांच त्यानें ती विश्वस्तांच्या नांवानें करून दिली.

इमारत मिळाली नि मग सर्वांच्या उत्साहाला वाटा फुटल्या. सरकारी मदत मिळणार नाहीं हें त्यांना ठाऊक होतें. चार तालुक्यांतल्या सहा हजार नागरिकांकडून सुमारें आठ हजार डॉलर्स मिळतील असा त्यांनीं अंदाज केला. घरोघर जाऊन पैसे जमा करायला सुरुवात झाली. बॉंड व्याख्यानें देऊन मदत मागूं लागला. बारा हजार डॉलर्सची रक्कम जमा झाली.

पण पैशांपेक्षां श्रमाच्या आणि सामानाच्या रूपानें अधिक उपयोगी मदत मिळेल हें विश्वस्त ओळखून होते. फेरेल बर्खीला बांधकामप्रमुख नेमण्यांत आलें. फेट हेडॉकला त्याचा साहाय्यक नेमलें. त्यांनीं बांधकाम खर्चाचा नि साहित्याचा अंदाज काढला. मजुरी किती लागेल त्याचा हिशेब केला. १९४८ मध्यें बर्खीनें आत्महत्या केली. "आपण हें काम पुरें करूं शकूं किंवा नाहीं असं त्याला वाटलं असावं." बॉंड म्हणाला, "मला इतर कांहीं कारण दिसत नाहीं."

हेडॉक आणि लॉनी हिल ह्यांनीं बांधकामाची जबाबदारी घेतली. “ बरेंचसें सामान आम्ही विकत घेऊं शकणार नाहीं हें आम्हाला ठाऊक होतं. म्हणून आम्हीं सामानाच्या देणग्या मागितल्या. पुष्कळांनीं आम्हाला झाडें दिलीं, कांहींनीं लांकडं दिलीं, कांहींनीं खिळे दिले. लांकूड कापायची गिरणी इथें आहे, तिथें आम्हाला फुकट लांकूड कापून मिळालं. ” असें हिलनें आम्हांला सांगितलें.

हेडॉक, हिल, एड समी हीं माणसें विनावेतन कामें करूं लागलीं. हिलनें सांगितल्याप्रमाणें १२ फेब्रुवारी १९४८ ला बर्फ पडत असतांच कामाला सुरुवात झाली. ज्याला जें येत होतें तो तें करीत होता. रात्रीं दिवे लावून काम चालू असे. एकादे वेळीं जादा काम करण्यासाठीं पंचवीस तीस माणसें जमा होत. स्त्रियांनीं पडदे तयार केले, हॉस्पिटलचे कपडे शिवले, इमारतीला रंग दिला, काम करणारांच्या जेवणाची व्यवस्था केली.

मिसेस किंडले ह्यांच्या अध्यक्षतेखालीं शंभर स्त्रियांची एक बैठक झाली. त्या बैठकींत डॉ. बॉंडनें हॉस्पिटलसाठीं लागणाऱ्या कपड्यांची व इतर साहित्याची माहिती दिली. निरनिराळ्या गांवीं महिलांनीं मंडळें स्थापन केलीं. पत्रें लिहून मदत मागितली. सामान मिळालें आणि चार हजार डॉलर्स जमा झाले.

इतर मार्गांनीं पैसा गोळा होऊं लागला. गांवचा एक मुलगा गायक होता. आपले कार्यक्रम सोडून तो गांवाला आला. त्याच्या जलशाचें एकशें चार डॉलर्स उत्पन्न झालें. मुलें तिकिटें विकूं लागलीं. निग्रोंनीं पांचशें डॉलर्स जमा केले.

ह्या कार्यानें दोन गांवांतील जुनें वैमनस्य नाहींसें झालें. साऱ्यांनाच हॉस्पिटल आपलें आहे असें वाटत असे. प्रत्येकजण हॉस्पिटलच्या उद्‌घाटनाच्या दिवसाची वाट पाहात होता.

सप्टेंबरच्या सुरुवातीला हॉस्पिटल पुरें होण्याआधींच मिसेस् लाउया पिटिलो बाळंतपणासाठीं आली. हॉस्पिटलची ही सुरुवात होती. तिच्या मुलीचें नांव चेरी जॉर्जियाना ठेवण्यांत आलें.

एकोणीस सप्टेंबरला उद्‌घाटनासाठीं पांचशें नागरिक जमले. प्रत्येकानें आपलें प्रवेशमूल्य म्हणून डबाभर खाण्याचे जिन्नस दिले. दहा ऑक्टोबरला जेव्हां दानपत्र–अर्पण समारंभ झाला, तेव्हां त्याहिपेक्षां जास्त माणसें जमलीं. प्रार्थना झाल्यावर भाषणें झालीं. विभागीय आरोग्याधिकारी रॅनस्वर म्हणाले, " हें समाजाच्या सामुदायिक श्रमाचं एक उत्तम उदाहरण आणि स्फूर्तिस्थान आहे."

विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष कार्ल फ्रीमन ह्यांनीं हॉस्पिटलचें दानपत्र स्वीकारल्यावर खजिनदार हार्वे गेल ह्यांनीं हिशेब सादर केले. " श्रमदान आणि देणग्या म्हणून आलेल्या वस्तूंच्या किंमती सोडून फक्त १४,६०० डॉलर्स खर्च आला आणि देशांत इतरत्र प्रत्येक खाटेला १५००० डॉलर्स खर्च येतो. सरकारी मदत आम्हांला मुळींच मिळाली नाहीं. कदाचित् मदत मिळावी एवढे मोठे आम्ही नाहीं असं त्यांना वाटलं असावं ! "

पण निमंत्रितांच्या चेहऱ्यांवरील भाव पाहून जॉर्ज बॉंड मात्र म्हणत होता, ' खरंच, कुणाचीहि मदत न घेतां हें हॉस्पिटल उभं राहिलं हेंच चांगलं झालं. प्रत्येकानें श्रम दिले, आपला वांटा दिला. प्रत्येकाला हें हॉस्पिटल आपलंच आहे असं वाटेल.'

दानपत्र–अर्पण समारंभानंतर डॉक्टरांच्या छायाचित्राचें अनावरण झालें व मग सर्वांनीं हॉस्पिटल पाहिलें. त्यांतल्या एकाद्या वस्तूकडे बोट दाखवून कोणीतरी म्हणे, " ती मीं माझ्या घरांतून दिलेली आहे. " त्यांच्या आपलेपणाची ती खूण होती.

* * *

खरी परीक्षा नंतरच होती. ही एकी टिकेल का ? आरोग्य-योजना एकोप्यानें पार पडेल का ?

हाझम आणि मी १९५० च्या जुलैंत प्रथम येथें आलों. खिंडींत इतरत्र भटकून आम्ही हॉस्पिटलमध्यें परत आलों. डॉक्टरांच्या दरवाजाला कडीसुद्धां नव्हती. आम्ही आंत गेलों. जॉर्जनें आपले मदतनीस डॉ. टॅम,

दोन परिचारिका व स्वयंपाकीण ह्यांच्याशीं आमची ओळख करून दिली व मग आम्हांला सांगितलें, " तुमचं तुम्ही बघा आतां. "

आम्ही रेकॉर्डिंग मशिनचा मायक्रोफोन घेऊन निरनिराळ्या खोल्यांत गेलों. बेन वॉरेन नांवाचा लांकूडतोड्या आम्हांला म्हणाला, " मी लांकडं तोडीत असतां पोटांतील फोडामुळें ( अल्सर ) वेदनांनीं गडबडा लोळूं लागलों. हॉस्पिटल नसतं तर मी कांहीं जगलों नसतों."

इतर रुग्णांच्या बरोबरच ड्यान-स्मर होती. तिच्या पाठींत वेदना होत होत्या म्हणून एके दिवशीं सकाळीं चार वाजतां तिला आणलें. तिची दांतखीळ बसली होती. जॉर्जनें तिला अँटि–टिटानस दिलें आणि आणखी औषध आणण्यासाठीं मोटर पाठविली. जॉर्ज म्हणाला, " बारा दिवस तज्ज्ञ डॉक्टरांशीं आम्ही टेलिफोनवर सल्लामसलत करीत होतों व रात्रंदिवस तिच्यावर नजर ठेवीत होतों. टिटानस (धनुर्वात ) अतिशय वाईट रोग आहे." स्मर कुटुंब पाहुणें म्हणून आलेलें होतें. स्मर म्हणाले, " ह्या डोंगराळ भागांत असे डॉक्टर मिळाले म्हणूनच तिचे प्राण वांचले. कृतज्ञतेनें आमचं हृदय भरून येतं."

अर्भकालयाच्या प्रमुख मिसेस फ्रीमन बॉड येथें येण्यापूर्वींपासूनच ह्या भागांत आजाऱ्यांना हॉस्पिटलमध्यें पोंचवण्याचें काम करीत होत्या. बॉडनें त्यांना पोस्टानें शिक्षण घेऊन अभ्यासक्रम पुरा करायला लाविला नि अर्भकालयाच्या प्रमुखपदीं नेमलें.

ह्या बाईंनीं आम्हांला रफ आणि सेटल कुटुंबांच्या ओळखी करून दिल्या. दोन्ही कुटुंबांनीं जॉर्ज बॉडची स्तुती केली.

" आतां लोक सुरीला किंवा इंजेक्शनच्या सुईला भीत नाहींत." डगी कॉनॉर म्हणाली, " आणि शिवाय हॉस्पिटल सर्वांना घराजवळच पडतं..." मग रात्रीं दीड वाजतां स्वत: येऊन बॉडनें आपल्या म्हाताऱ्या आईला कसें औषध दिलें व तिची शुश्रूषा केली तें डगीनें सांगितलें.

जेवायला वेळेवर न येणें हा डॉक्टरांचा जन्मसिद्ध हक्क आहे. आम्ही जॉर्जच्या जीपमधून त्याच्या घरीं गेलों तेव्हां मार्ग, त्याची बायको, तिन्ही

मुलांना सांभाळून स्वयंपाक करून त्याची वाट पहात होती. मीं तिला म्हटलें, " इथें कंटाळा येत असेल नाहीं ? "

" मुळींच नाहीं. " ती म्हणाली, " उलट हें तर जॉर्जचेंच गांव आहे. "

आम्हीं जॉर्जवर तयार केलेल्या चित्रपटाबद्दल तिचें मत विचारलें. ती म्हणाली, " त्यानें खूप त्याग केला असं तुम्हीं दाखवलं आहे. खरं म्हणजे ही जागा नि इथले लोक हेंच त्याचं जीवन–सर्वस्व आहे. "

पण कधींतरी बॉंड कुटुंबाला इथून निघून जावेंसें वाटेल असें मला वाटत होतें. ह्या माझ्या मनांत उद्‌भवलेल्या प्रश्नाचें उत्तर रात्रीं साडेदहा वाजतां आम्ही हॉस्पिटलमध्यें गेलों असतां मिळालें. एका म्हातारीचें ॲपेंडिक्सचें पाऊण तास चाललेलें ऑपरेशन संपवून जॉर्ज बाहेर आला. त्याची वाट पाहात असतां त्याच्या कार्यालयांतील पुढील वस्तु माझ्या नजरेंत भरल्या. हॉस्पिटलमध्यें जन्मलेल्या पहिल्या मुलीच्या, मेरी जॉर्जियानाच्या, पायाचे फ्रेम करून ठेवलेले ठसे, तिन्ही बॉंड पोरांचीं छायाचित्रें, त्या भागाचा नकाशा आणि डोळ्यांवर चष्मा घातलेल्या एका नग्न स्त्रीचें रेखाचित्र. त्या चित्राखालीं लिहिलें होतें, ' डॉक्टर म्हणाले, मला फक्त चष्म्याचीच गरज आहे. '

जॉर्ज बॉंड आल्याबरोबर मीं विचारलें, " रोज रात्रीं इतक्या उशिरां काम करतां ? "

" बहुतेक–" तो म्हणाला, " एकोणपन्नास सालीं मी पंच्यायशीं मोठीं व सव्वाशें लहान ऑपरेशन्स केलीं. आज जरा जास्त वेळ लागला. म्हातारपणीं ॲपेंडिक्सचा त्रास सहसा होत नाहीं. "

झांकून ठेवलेल्या एका मायक्रोफोनमध्यें त्यानें चार मिनिटें ऑपरेशनचें स्वरूप सांगितलें. तें रेकॉर्ड करून ठेवण्यांत आलें.

लोकांतला विश्वास पाहून मला समाधान वाटल्याचें मीं त्याला सांगितलें.

" तुमचं म्हणणं बरोबर आहे." तो म्हणाला, " पण हें सारं घडून यायला वेळ लागतो. आतां इनॉक्युलेशन्स करून घेणारांची संख्या वाढली आहे. गर्भारपणीं व बाळंतपणानंतर तपासणी करून घेणाऱ्या स्त्रियांच्या संख्येंतहि वाढ झाली आहे. "

" जें इथें झालं तें इतरत्र होऊं शकेल का ? " मीं विचारलें.

" कां नाहीं ? इथें असं काय झालं ? समाजांतले सर्व लोक एकत्र आले आणि एक कार्य त्यांनीं पुरं केलं. ग्रामीण भागांतील डॉक्टर आणि जनता ह्यांना इतरत्र हें कां करतां येऊं नये ? त्यामुळें डॉक्टरहि आपल्या समाजाचा आधारस्तंभ होईल. "

" तुम्ही इथेंच कायम राहणार ? " मीं विचारलें.

" मला वाटतं, मी मरेपर्यंत– " त्यानें शांतपणें उत्तर दिलें.

जानेवारी १९५२ मध्यें आम्ही पुन्हा तेथें गेलों. हॉस्पिटलला मुलांचा सहा खाटांचा एक खास विभाग जोडण्यांत आला होता. त्याच्या बांधणीसाठीं जनतेनें श्रमदान केलें होतें व पत्रें लिहून पैसे गोळा केले होते.

बरेच स्वयंसेवक तयार झाल्यानें जॉर्जचें बरेंच काम कमी झालें होतें. हॉस्पिटल आतां वाढलें होतें. एकंदर तीस खाटा होत्या. जॉर्जनें आम्हांला सांगितलें कीं, " परवां रात्रीं आमच्याकडे एकाच वेळीं चार बाळंतपणं आलीं. तेव्हां फोन करून स्वयंसेविका बोलवायला आम्हीं कुणालातरी सांगितलें. आम्हीं बऱ्याच लोकांना शिकवून तयार केलं आहे. इथें दोनच मार्ग असतात. एक स्वयंसेवक शिकवून तयार करावयाचे किंवा जास्त माणसं नोकरीवर ठेवायचीं. इथें काम करणारीं अर्धीं माणसं विनावेतन काम करीत असतात. "

ज्या अनौपचारिक पद्धतीनें तिथें कामें चालत होतीं त्याचें बाहेरच्या माणसाला आश्चर्यच वाटलें असतें. " माझ्या पोराला आइस्क्रीम देऊं का ? " एक आवाज विचारीत होता. " स्वयंपाकीणबाईंना सांगून द्या." जॉर्जनें उत्तर दिलें.

डॉक्टरांची मेव्हणी आतां व्यवस्थापिका आहे. सासू स्वयंसेविका म्हणून परिचारिकेचें काम करते.

१९५० सालीं ३६०३ व १९५२ सालीं ३४२२ रुग्णांना हॉस्पिटल-मध्यें प्रवेश देण्यांत आला. बाहेरून उपचारासाठीं येणारांचे आंकडे ७४७५ व ८२८० असे होते. जन्म १०५ व ११७.

बाहेरून उपचार करणारांना जी फी आकारली जाते तेंच हॉस्पिटलचें खरें उत्पन्न. शिवाय औषधें व प्रयोगशाळांच्या उपयोगासाठीं मिळणारी फी आणि स्वतंत्र खोल्यांचें भाडें.

जॉर्जला पगार मिळत नाहीं. हॉस्पिटल विश्वस्तांच्या मालकीचें आहे आणि जॉर्जला ते तपासणीसाठीं बोलावतात. रोग्याला आकारण्यांत येणाऱ्या फीपैकीं दोन डॉलर जॉर्जला मिळतात. तो कोणाच्या घरीं गेला तर ती फी त्यालाच मिळते. कांहीं जण जॉर्जला वस्तु देतात. आम्ही तेथें असतां एकजण फी म्हणून मांसाचा तुकडा घेऊन आला.

हॉस्पिटलला येणारी तूट देणग्या उभारून भरून काढली जाते.

जॉर्जच्या ह्या प्रयोगाचा ड्यूक एंडोमेंट अभ्यास करीत आहे. फार मोठ्या दीर्घकालीन योजना हातीं घेऊन व विनाकारण खर्च करून हॉस्पिटलें तोट्यांत येतात असें जॉर्जचें मत आहे.

त्या रात्रीं आम्ही जॉर्जच्या सुटीच्या घरीं गेलों. ब्रॉड नदीच्या किनाऱ्यावर त्याची ही खोली आहे.

" समजा आज कुणाला जर तुझी गरज लागली तर ? " मीं विचारलें.

" तर दुसरी जीप घेऊन कुणीतरी येईल. " तो म्हणाला.

त्या रात्रीं आम्हीं खूप गप्पा मारल्या. ग्रामीण भागांत रुग्णालयांची सांखळी कशी तयार करतां येईल तें जॉर्ज आम्हांला समजावून सांगत होता. त्याला आपल्या हातानें ज्या वृद्ध डॉक्टरानें जगांत आणलें त्याचा उपदेश तो आम्हांला सांगत होता. " खेड्यांतून उपचार करण्याचं वैशिष्ट्य असं

आहे कीं रुग्ण आणि वैद्य ह्यांचे संबंध प्रेमाचे असतात. धर्म, वंश किंवा सांपत्तिक स्थिति ह्यांचा विचार तिथें नसतो. तीं सारीं माणसं आपलींच असतात नि तीं आजारी असतात म्हणून त्यांना उपचार करावयाचे असतात. माणसं म्हणून त्यांचा मान राखला जातो. ”

“ हें तुम्हीं हॉस्पिटलवरून सिद्ध केलें आहे. पण हॉस्पिटलचं भविष्य काय ? ” मीं विचारलें.

“ सुरू केलेलं हॉस्पिटल चालू ठेवण्यासाठीं पुरेसे नागरिक मिळणं ही मोठी अडचण असते. विश्वस्तांनीं हॉस्पिटल बांधलं पण तें चालविण्याची जबाबदारी त्यांना नको असते. पहिल्या वर्षीं जेव्हां सहा हजार डॉलर्स तोटा आला तेव्हां ते घाबरून गेले आणि खर्च कमी करण्यासाठीं त्यांनीं अनेक सूचना केल्या. मीं जागेचं भाडं भरावं, नोंदविलेल्या प्रत्येक रुग्णाला पैसे भरायला लावावे, कुणालाच विनामूल्य उपचार करूं नयेत आणि व्यवस्था पाहण्यासाठीं व्यवस्थापक नेमावा अशा त्यांच्या सूचना होत्या. व्यवस्था पाहण्यासाठीं एक कार्यकारी समिति नेमावी असा ठरावहि त्यांनीं केला. पण आतां ही भीति कमी झाली आहे. व्यवस्थापकीय कामाचें चांगलें ज्ञान असलेले सभासद पाळीपाळीनें मंडळावर घ्यावेत अशी योजना आम्ही आतां तयार केली आहे.”

त्यावरून आमच्या लक्षांत आलें कीं, हॉस्पिटल बांधण्याच्या जबाबदारी-पेक्षां तें चालविण्याची जबाबदारी अधिक कठीण आहे. हॉस्पिटल बांधतांना तयार झालेल्या ह्या नव्या सामाजिक प्रवृत्ति उपयोगांत आणण्या-साठीं एखादा नवा पुढारी तयार होईल का ? डॉक्टर बाँडनें ‘ मॅट केन्हला ’ सुरू केलेलें हें काम सर्व राज्यभर पसरविण्यास ते त्याला जाऊं देतील का ?

जॉर्जला ह्या प्रश्नांची पुरी जाणीव आहे. सामाजिक जबाबदारीच्या नव्यानें उसळलेल्या भावनेचा उल्लेख करून तो म्हणाला, “ माझी खरी श्रद्धा ह्या नव्या भावनेवर आहे. ”

१९५३ सालीं त्याला आरमारी कामगिरीवर बोलाविलें तेव्हां मंडळानें आनंदानें त्याला जाऊं दिलें. “ आतां निव्वळ माझ्यावर जबाबदारी टाकून मंडळ स्वस्थ बसत नाहीं. ” जॉर्ज म्हणाला, “ हॉस्पिटल चालविण्यासाठीं त्यांनीं माणसं शिकवून तयार केलीं आहेत. ” जॉर्जच्या जागीं आलेल्या डॉ. बर्चनेंसुद्धां त्याला सर्व प्रकारचें साहाय्य मिळत असल्याचें सांगितलें.

आतां नव्यानेंच स्थापन झालेल्या ‘ हिकरी नट सिविक क्लब’नें गांवांत टेलिफोन्स आणले, गांवांतील तळ्यांत मासे सोडून मत्स्यपालनास सुरुवात केली, डोंगराच्या उतरंडीवर हरणें पाळलीं, गांवांतील केरकचरा उचलून टाकण्याची व्यवस्था केली, स्काऊट संघटना उभी केली आणि आतां रस्त्यावर दिवे लावायची योजना पार पाडण्याच्या तयारींत ते आहेत.

एका डॉक्टरनें एक हॉस्पिटल चालविण्यासाठीं त्यांना एकत्र आणलें पण ह्या एकीतून कितीतरी चांगलें निर्माण झालें. एका नागरिकानें एका वाक्यांतच हें सारें स्पष्ट केलें. तो म्हणाला, “ हॉस्पिटलनें आम्हां सर्वांना एकजीव केलें. ”

# २

# सरहद्द

[ रस्ते, वीज, सुधारलेली शेती आणि गांवकऱ्यांची एकी ह्यांनीं घडवून आणलेला चमत्कार ह्या कथेंत वाचायला मिळेल.

नांवें अमेरिकन असलीं तरी गांव, गांवकरी, त्यांच्या अडचणी नि त्यांतून काढलेला मार्ग ह्या गोष्टी महाराष्ट्रांतल्या खेड्यालाहि लागू होतील. ]

आम्ही ज्या गांवाला जात होतों तें अवघें तीन मैल राहिलें असतां रीसनीं आम्हांला गाडी थांबवायला सांगितलें नि रस्त्याच्या कडेला असलेल्या एका घराकडे बोट दाखवीत ते म्हणाले, " इथल्या वातावरणाची खरी कल्पना यायला ही जागा चांगली आहे. भौगोलिक आणि राजकीय दृष्टीनें आम्ही अगदीं एकाकी जीवन जगत होतों हें तुम्हांला माहितीच आहे. ह्या एकाकी जीवनांतून आम्हांला बाहेर काढण्यास तीन गोष्टी कारणीभूत झाल्या. ( १ ) एकशें एकोणतीस नंबरचा राजरस्ता, ह्याच रस्त्यानें आपण आतां आलों. ( २ ) तुम्हांला समोर दिसतें तें दगडी घर —तिथें जॉर्जिया माऊंटन प्रयोगशाळा आहे. ह्या प्रयोगशाळेनें आमच्या शेतजमिनीची आम्हांला चांगली माहिती करून दिली आणि ( ३ ) तुम्ही समोर पाहताहांत ते विजेचे खांब. ह्या खांबांनीं आमचें काम पुरें केलें. "

आम्ही आमच्या मोटरींत मेथॉडिस्ट पाद्री जॅक वाल्ड्रेप ह्यांना घेतलें होतें. ते किडकिडीत, पाठीला पोक आलेले होते आणि त्यांचा आवाज कांहींसा कर्कश होता. त्यांचें बोलणें संपलें तरी त्यांचा आवाज

ऐकणाराच्या कानाशीं घुटमळत असल्यासारखा वाटे. " यंग हॅरिस कॉलेजमध्यें वीस वर्षांपूर्वीं मी जेव्हां धर्मशिक्षण घेत होतों तेव्हां निरनिराळ्या गांवीं प्रवचनांसाठीं जायचा. एकदां माझा एक स्नेही मला म्हणाला, त्या युनियन भागांतून मी जेव्हां प्रवास करतों तेव्हां स्वतःच मी माझ्या खेचरांचें खाणें बरोबर घेऊन जातों. ह्या भागांत कुणाजवळ कांहीं मिळायचें नाहीं. आतां परिस्थितींत खूप सुधारणा झाली आहे. आज दर एकरीं शंभर बुशेल उत्पन्न काढणारे जॉर्जिया स्टेटमध्यें जेवढे क्लब आहेत त्यांतले एक तृतियांश ह्या भागांत आहेत. आतां बाहेरचे लोक इथें स्थायिक व्हायला उत्सुक असतात. मला वाटतं, आमच्या प्रगतीची कथा जगाला सांगण्यासारखी आहे. "

ती कथा मिळविण्यासाठीं आम्ही ब्लेअर्सव्हिल ( वस्ती ६३७ ) ह्या तालुक्याच्या गांवीं गेलों. आम्ही गांवांत गेल्यावर रीसनीं आम्हांला पोस्ट ऑफिस, बँक, पेट्रोल पंप, औषधाचीं व इतर मालाचीं दुकानें व दोन हॉटेल्स दाखविलीं. जवळच एक थिएटर, किराण्याचें दुकान, दोन मोटर-तबेले, मेथॉडिस्ट व बाप्टिस्ट चर्चेस, व्यायाम शाळा आणि कँबेल सूप तयार करणारा कारखाना आहे.

रीस आणि वाल्ड्रेप ह्यांनीं आमची कांहीं वृद्धांशीं ओळख करून दिली. त्यांतल्या कांहींना रीसनीं सांगितलेल्या प्रगतीपूर्वीचे दिवस आठवत होते व कांहींनीं ती प्रगति घडवून आणण्यांत भागहि घेतला होता.

जॉर्जियाच्या सुप्रीम कोर्टाचे सभासद न्यायमूर्ति थॉमस एस्. कँडलर म्हणाले, " १९१५ सालीं मीं नोकरीस सुरुवात केली तेव्हां नऊ तालुक्यांत मला घोड्यावरून फिरती करावी लागे. जिथें कोर्टाचा मुक्काम पडे तिथें आम्ही एक आठवडा राहात असूं. रस्ते म्हणजे पायवाटाच होत्या. ताशीं चार मैल मजल मारतां आली तर नशीब समजायचें.

" आम्ही लाकडी घरांत रहात असूं. सबंध तालुक्यांत दोनच घरांना रंग लावलेला होता. त्यांतील एका घरांत राहणारा एक गृहस्थ निवडणुकीसाठीं

उभा राहिला, तेव्हां त्याचा पराभव झाला. कारण लोक म्हणत, तो मोठा जहागिरदार आहे.

" आमची आजी घरींच मेणबत्त्या तयार करी. आजोबांनीं जेव्हां दिवा विकत आणला तेव्हां त्या दिव्याची आम्हांला भीति वाटायची.

" आमची शाळा एका पडक्या चर्चमध्यें भरायची. माझ्या भावाचीच पाटी-पेन्सिल मी वापरीं. प्यायचं पाणी आम्ही एका बादलींत घेऊन जायचे नि बरोबर एकच कप पाणी पिण्यासाठीं असायचा. आम्ही सव्वाशें विद्यार्थी होतों आणि सर्वांना एक शिक्षिका. त्या मास्तरीणबाई आम्हांला बहुधा रोज पिटून काढायच्या. ज्याचं शिक्षण पुरं होई तो हा भाग सोडून जायचा.

" खरे डॉक्टर असे इथें नव्हतेच. दोघां जणांना आम्ही डॉक्टर म्हणत असूं. कारण त्यांनीं नऊ महिने डॉक्टरीचं शिक्षण घेतलेलं होतं. ते रेचक द्यायचे, नाहींतर कांहीं गोळ्या द्यायचे. सबंध भागांत एक डझन वर्तमानपत्रं सुद्धां खपत नसत. हवा चांगली असली तर रविवारचं वर्तमानपत्र आम्हांला सोमवारीं रात्रीं मिळायचं.

" चार खेचरं आणि चार मजुर मदतीला घेऊन मी नि माझे मेहुणे चाळीस एकराच्या आमच्या शेतांतून दर एकरीं दहा बुशेल धान्य पिकवीत असूं. तालुक्याबाहेरच्या बाजारांत आमचा माल खपत नसे म्हणून उरलेलं धान्य, फळं इत्यादींची आम्ही व्हिस्की करायचे. नाताळच्या आठवड्यांतच इकडचे बहुतेक खून पडायचे, कारण लोकांना ह्या दिवसांत कामहि नसायचं आणि पुष्कळ लोक ' थोडी जास्त घेत. '

" आणि आतां ? " आम्हीं विचारलें.

" आतां ? " ते आवेशानें म्हणाले, आतां ग्रामीण जीवन पूर्णपणें बदललं आहे. आतां तें कंटाळवाणं राहिलेलं नाहीं. आतां आमच्याकडे उत्तम रस्ते आहेत, मोटरी आहेत. वीजपुरवठा सुधारण्यासाठीं आम्हीं सरकारी कर्ज घेतलं असून तें आम्ही वेळेवर फेडूं. वीस वर्षांत सर्व वीजपुरवठा आमच्या मालकीचा होईल.

" आधुनिक यंत्रांच्या साहाय्यानें आज आमचे तरुण शेतकरी एका वर्षांत इतकं धान्य पिकवतात कीं पूर्वी तेवढं पीक काढायला मला नि माझ्या भावाला चाळीस वर्षं लागलीं असतीं.

" हायस्कूलचं शिक्षण संपल्यावर अधिक शिकायचं असलं तर आमचीं मुलं आतां कॉलेजांत जाऊं शकतात नि शिक्षण संपल्यावरहि गांव सोडून जात नाहींत.

" हिंवाळ्यांतल्या दीर्घ रात्री आतां काळोखांत बसून गारठून काढाव्या लागत नाहींत. आतां प्रत्येक घरांत भरपूर प्रकाश असतो.

" आतां प्रौढ माणसं नाताळांत स्वत: चैन करीत हिंडायच्या ऐवजीं मुलांना मजा करायला देतात. सर्व कुटुंब एकत्र येऊन आनंद लुटतात आणि प्रार्थना नि पूजा करतात. "

आम्ही तेथून सरबताच्या कारखान्यांत गेलों नि ब्याहत्तर वर्षांच्या ' डॉक् ' थॉमसना भेटलों. " मला जुने दिवस चांगले आठवतात. " ते म्हणाले. आमच्याशीं बोलण्यासाठीं त्यांनीं आनंदानें आपलें गुऱ्हाळावरचें काम थांबवलें. एक खेचर शांतपणें तें चरकाचें जूं ओढीत होतें नि चरकांतून उसाचा पिवळा धमक रस येत होता. ह्या रसाचें पुढें उत्तम सरबत करून तें बिस्किटांत वापरण्यासाठीं पाठवलें जातें.

ते एका बाकावर बसले नि आपल्या डोक्यावरची भोकें पडलेली जुनी हॅट त्यांनीं कपाळावरून मागें ढकलली नि आपले वडील ज्या लाकडी झोपडींत राहात होते त्या झोपडीबद्दल ते सांगूं लागले.

" ती लाकडी झोपडी तयार करतांना एकहि खिळा वापरला नव्हता. लाकडाचे ओंडके फोडून नि घासून वापरले होते. त्यांच्यावरून चालतां येत असे. आम्ही दिवसांतून तीनदां पाव खात असूं. आमच्या घरीं तेव्हां गाय नव्हती. जेव्हां वडिलांनीं एक गाय आणली तेव्हां आम्ही अगदीं पोट भरून खरवस खायचे नि गोड दूध प्यायचे. आम्हीं कांहीं कोंबड्या आणि डुकरं पाळलीं होतीं. पौंडाला तीन सेंट ह्या दरानें तीं आम्हीं

शेजाऱ्यांना विकीत असूं. आमच्याजवळ एका फाळाचा एक नांगर होता नि जमिनींत गहूं पिकविण्यासाठीं ती आम्हाला त्या नांगरानें नऊ वेळां नांगरावी लागे. "

आतां बदललेल्या परिस्थितीचा आम्हीं उल्लेख केला.

" आतां लोकांना जेवढी अक्कल आहे तेवढी जर तेव्हां असती तर असली नांगरट करायच्या आधीं त्यांनीं फांस लावून जीवच दिला असता. " ते म्हणाले. पिकें कापायच्या वेळीं दहाबारा जण विळे घेऊन कसे बाहेर पडायचे नि सर्वांत जास्त पिकलेलें शेत कसें आधीं कापीत असत तें त्यांनीं आम्हांला सांगितलें. ते म्हणाले, " आम्हीं बैलगाड्यांतून कांहीं मुळं आणि कांहीं कोंबड्या विकायला न्यायचे. कोंबड्यांना शेपट्या असल्या तर प्रत्येक कोंबडीला आम्हांला दहा सेंट मिळत असत. शेपटी नसलेली कोंबडी दिसली कीं गिऱ्हाईक म्हणायचे ' कोंबडीला शेपटी उगवली कीं मग आण '—शेपटीला एवढं महत्त्व कां होतं तें मला अजूनही माहीत नाहीं. "

" आणि तुम्ही काय खरेदी करीत होतां ? " आम्हीं विचारलें.

" चोवीस पौंडांची पिठाची पिशवी. जर आमच्या विक्रींतून आम्हाला हव्या त्या वस्तू घेण्याएवढी मिळकत झाली नाहीं तर डॉलर दोन डॉलरच्या उधारीवर सही करून आम्हीं खरेदी करायचे. "

थॉमसच्या ह्या हकिगतीस इतरांनीं दुजोरा दिला.

बाप्टिस्ट पाद्री क्लॉड बायन्टन १९२० सालीं जेव्हां युनियन काउंटींत आले तेव्हां त्यांची पहिल्या दोन आठवड्यांची कमाई १७ डॉलर आणि ८१ सेंट एवढी झाली. त्यांत भागेना म्हणून त्यांनीं जंगल खात्यांत नोकरी धरली आणि शाळेंत शिकवायला सुरुवात केली. ते म्हणाले, " खिडक्यांच्या ऐवजी त्यावेळीं झडपा होत्या. शाळेंत लागणारे काळे फळे आमचे आम्हींच तयार करीत असूं. शाळेंत लागणारीं अर्धीं पुस्तकं शिक्षक आपल्या पगारांतून विकत घेत. घरीं जेवायला बसतांना स्त्रीपुरुष निरनिराळे जेवत नि चर्चमध्यें वेगवेगळ्या जागीं बसत.

" मी पुष्कळदां खेंचरावरून किंवा घोड्यावरून प्रवास करीं. कधीं माझी बायको माझ्याबरोबर असायची. नाले ओलांडतांना त्यावर आडव्या टाकलेल्या लाकडांच्या ओंडक्यांवरून चालावें लागे. मला ओंडक्यांवरून चालणं तेवढं जमायचं नाहीं तेव्हां माझी बायको ओंडक्यावरून चालायची आणि तिचा हात धरून मी पाण्यांतून चालत जायचा.

" कुणी मेले कीं घरीं वाळत घातलेल्या जळाऊ लाकडांचीच पेटी आम्हीं तयार करायचे व तिच्यांतून प्रेत न्यायचे. मी शवपेटी तयार करायचा, थडगें खोदायचा, प्रेत पुरायचा आणि प्रार्थनाहि म्हणायचा."

पुढें ब्लेअर्सव्हिलेला एक कच्चा रस्ता झाला. त्या रस्त्याची हकिकत आम्हांला सिड चांडलरनें सांगितली. तो त्या वेळीं कोलंबस विद्यापीठांत शिकत होता नि ब्लेअर्सव्हिलेच्या एका पोरीवर त्याचें प्रेम बसलें होतें.

तो म्हणाला, " मी विद्यालयांत असतांना माझी नि मेरीची जेव्हां ओळख झाली तेव्हां ब्लेअर्सव्हिल कुठें आहे तें मला नक्की माहीत नव्हतें, मला वाटलं कीं, दोन दिवसांत जॉर्जियांतल्या कुठल्याही गांवीं मला सहज जाऊन येतां येईल. म्हणून अटलांटापासून शंभर मैलांवर असलेल्या कोलंबसहून मी एका शनिवारीं रेल्वेनें निघालों आणि रात्रीं 'ब्ल्यू रिज'ला उतरलों. तिथें ब्लेअर्सव्हिलेला कसं जातां येईल ह्याची मीं चौकशी केली. प्रथम ते लोक तिथें जायला रस्ता नाहीं असं म्हणाले नि नंतर म्हणाले, 'ती फोर्ड मोटर ज्या माणसाची आहे तो तुला पोंचवील.' तो मोटरवाला माणूस पंचवीस डॉलर्स मागूं लागला. मी त्याला सांगितलं. 'मला गाडी भाड्यानें हवी आहे, मी विकत नाहीं मागतलं.' मग मीं मेरीला फोन केला. तिनें रात्रीं तिथेंच राहायला नि सकाळीं मर्फीला यायला सांगितलं. ते लोक मला तिथें भेटणार होते. रविवारीं मी ब्लेअर्सव्हिलेला पोंचलों नि मला ताबडतोब परत निघायची व्यवस्था करावी लागली...
" गांवचे शेरीफ एका वेड्याला मिलेजव्हिले येथें सकाळीं घेऊन जाणार असल्याचं आम्हाला कळलें. मला बरोबर घेऊन जायचं त्यांनीं कबूल केलें. आम्हीं डोंगर चढायला सुरुवात केली. शेरीफना सारखं थांबून आपल्या

गाडीच्या रेडिएटरमधलं पाणी बदलावं लागे. तो वेडाही उतरून रेडिएटर-मध्यें पाणी भरायचा. डोंगरमाथ्यावर आम्ही पोंचल्यावर शेरीफ उतरले व त्यांनीं एक चकचकीत दुधारी कुऱ्हाड हातांत घेतली. मला वाटलं आतां हा गृहस्थ आम्हा दोघांना इथें खलास करून घरीं परत जाणार. पण त्यांनीं सहा इंच घेराचं एक झाड तोडलं नि साखळीनें तें मोटरीच्या मागें ब्रेकसारखं बांधलं. तें झाड नसतं तर गाडीचे ब्रेक्स शिल्लकच राहिले नसते. टोलनाक्यावर त्यांनीं तें झाड काढून टाकलं नि नाक्यावरच्या माणसानें तें फोडून जळण्यासाठीं वाळत टाकलं."

ही परिस्थिति पाहिली कीं गांवच्या लोकांचीं कांहीं स्वभाववैशिष्ट्यें कळतात. गांवाबाहेरचा प्रत्येक माणूस त्यांना परका वाटे. विजेचा कांहींच उपयोग नाहीं असा त्यांचा समज होता. उद्योग नसल्यानें दिवस मोठा झाला कीं ते म्हणत, "काय दिवस मोठाले आहेत बघा. दिवसांत दोनदां दाढी करावी लागते." अंधश्रद्धाहि कमालीची होती. ते म्हणत, "देवाच्या मनांत असलं तर तोच इथें पाऊस पाडील."

× × ×

१९२५ सालीं वर उल्लेख केलेला रस्ता तयार झाला तेव्हांच त्याच्या ह्या आलिप्तपणाला पहिला तडा गेला. पुढें यू. एस. १२९ हा राजरस्ता तयार झाला. त्यामुळें क्लेअर्सव्हिले दक्षिणेस अटलांटा व उत्तरेस ॲशव्हिले आणि नॉक्सव्हिले ह्यांच्याशीं जोडलें गेलें. हा रस्ता होण्यापूर्वी गेनविल ह्या ऐंशीं मैलावर असलेल्या बाजारपेठेला पोंचायला ह्या गांवच्या लोकांना पांच दिवस लागत. गुरें चालत जात नि पोंचण्याआधींच वाळून रोडकीं होत.

गांवच्या पहाडी सौंदर्यामुळें प्रवासी आणि आपली सुटी चैनींत घालवणारे भटके गांवाला आले तर गांवांत बराच पैसा येईल हें बॉनेल स्टोन नांवाच्या ओव्हरसिअरनें ओळखलें व रस्त्यासाठीं त्यानें न्या. यू. कँडलरनीं आणि इतरांनीं मागणी केली. रस्ता सुरू झाल्यावर कोणीतरी प्रथम एक मालवाहतुकीची मोटर घेतली. बाहेरचे लोक गांवीं येऊन माल विकत

घेऊन स्वतःच्या वाहनांतून घेऊन जाऊं लागले. डोंगराआड दडलेल्या एका निसर्गसंपन्न गांवाचा भाग्योदय सुरू झाला.

१९३० सालापर्यंत सबंध तालुक्यांत फक्त दोन ट्रॅक्टर्स होते. १९३० सालीं जॉर्जिया विद्यापीठानें आम्हांला रीसनीं दाखविलेली प्रयोगशाळा सुरू केली व जॉन बेलीला तिचा प्रमुख नेमलें. मेरीच्या भेटीसाठीं अडकून पडलेल्या सिड चॅंडलरला विद्यापीठानें आपला प्रतिनिधि नेमलें.

सिड चॅंडलरनें आम्हांला आपले अनुभव सांगितले, " मी प्रथम इथें आलों तेव्हां गांवाबाहेरच्या माणसाशीं बोलायलाहि गांवकरी तयार नसत. माझ्यासारखा मुलगा त्यांना काय शिकविणार अशी त्यांची समजूत होती. मी त्यांना कांहीं शिकवायच्या भानगडींत पडलों नाहीं. त्यांना काय हवें तें मीं लक्षांत घेतलं नि त्याच्या कामांत मी त्यांना मदत करूं लागलों. रस्ता असल्यानें आम्ही बटाटे, कोबी, वाटाणे मोठ्या प्रमाणावर पिकवून बाहेर पाठवूं लागलों आम्हीं जेव्हां सरकारनें उत्तम ठरविलेलं बटाट्याचं बीं आणलं तेव्हां त्यापेक्षां गांवचंच बीं चांगलं आहे असं पुष्कळ लोक म्हणाले. पुढें अनुभवानें आम्ही आणलेलं बीं अधिक चांगलं असल्याचं त्यांना पटलं. पुढें बटाट्यांची प्रत ठरविणारं यंत्र आम्हीं आणलं तेव्हांहि ते संशयी होते. पण पांच वर्षांत आम्ही हजारों डॉलर्सचे बटाटे विकूं लागलों."

एक रस्ता, एक विभागीय अधिकारी आणि एक प्रयोगशाळा ह्यांनीं क्रांति घडवून आणली !

त्रेसष्ट वर्षांच्या जोन्सनें आम्हांला सांगितलें कीं, " रस्ता तयार होण्यापूर्वी आम्ही कशीतरी आमची जमीन ओरपायचे नि पिकं लावायचे. फक्त दोन गठ्यांतच माझं अडीच एकरांचं पीक मी वाहून न्यायचा. कांहीं लोक सुकलेल्या ओहोळांत पेरीत असत."

अशाच लोकांच्याबद्दल लॉकनें लिहिलें होतें. " पाऊस आला कीं पूर यायचा नि ह्यांचीं शेतं वाहून जायचीं. पूर गेल्यावर जमीनच शिल्लक राहात नसे."

जोन्सची बायको १९३५ सालीं वारली. तिची आठवण झाल्याबरोबर त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. ती वारली तेव्हां त्याच्या चार पोरांचें नि त्याचें सांत्वन करण्यासाठीं चँडलर त्यांना भेटायला गेला होता.

चँडलर आतां 'परका' राहिला नव्हता. 'डॉक' जोन्सनें मन मोकळें करून त्याला आपला बेत सांगितला. "मी गांव सोडून जाणार आहें" तो म्हणाला, "कांहीं तरी काम करीन. पोरांच्या दृष्टीनें बरं."

चँडलरनें सारं ऐकून घेतलं. ऐकून घ्यायची त्याची पद्धतच होती. शेवटीं तो म्हणाला "डॉक, अजून कांहीं सारं संपलं नाहीं. आम्ही शेतीबद्दल चर्चा करण्यासाठीं एक बैठक घेणार आहोंत. तुम्ही आलांत तर बरं होईल."

'डॉक' त्या बैठकीला गेला तेव्हां तिथें आणखी सात आठ माणसं होतीं. ते फारसें न बोलतां एकमेकाकडे बघत राहिले. चँडलरनें त्यांचें लक्ष त्यांच्यासमोर असलेल्या अडचणीकडे वेधलें. मग हळुहळू त्या अडचणीवर चर्चा करावयास सुरुवात झाली. चँडलरनें कांहीं जमिनीबाबत अशी सूचना केली कीं धान्याऐवजीं त्या जमिनींत जर गवत काढलें तर गांवाला भरपूर गवत मिळेल आणि जमिनीची धूपहि थांबेल. "तें कबूल" एकजण म्हणाला, "पण आम्हाला ती वाकडी-तिकडी नांगरट मान्य नाहीं."

"वाकड्या नांगरटीबद्दल पिकांनीं कधीं तक्रार तर नाहीं ना केली?" चँडलर सहज म्हणाला, "वाकड्या नांगरटींत सुद्धां पीक येतंच."

शेतांना बांध घालण्यासंबंधीं चर्चा सुरू झाली. एक गृहस्थ म्हणाला, "मला आमच्या पाद्र्यानें सांगितलं आहे कीं, जर शेताला बांध असावेत अशी देवाची इच्छा असती तर त्यानें ते तसे निर्माण केले असते." दुसरा म्हणाला, "मीं चांदण्यांत पेरणी केली कीं, माझं पीक चांगलं येतं."

ही चर्चा 'डॉक' ऐकत होता. लूथर मिलर नांवाचा शेतकरीहि ऐकत होता. मिलरला धर्माचें इतकें वेड होतें कीं, फावल्या वेळीं तो धर्मोपदेश करी. दोघांनींहि चँडलरच्या म्हणण्याला मान्यता दिली.

जोन्सची बायको १९३५ सालीं वारली. तिची आठवण झाल्याबरोबर त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. ती वारली तेव्हां त्याच्या चार पोरांचें नि त्याचें सांत्वन करण्यासाठीं चँडलर त्यांना भेटायला गेला होता.

चँडलर आतां 'परका' राहिला नव्हता. 'डॉक' जोन्सनें मन मोकळें करून त्याला आपला बेत सांगितला. "मी गांव सोडून जाणार आहें" तो म्हणाला, "काहीं तरी काम करीन. पोरांच्या दृष्टीनें बरं."

चँडलरनें सारं ऐकून घेतलं. ऐकून घ्यायची त्याची पद्धतच होती. शेवटीं तो म्हणाला "डॉक, अजून कांहीं सारं संपलं नाहीं. आम्ही शेतीबद्दल चर्चा करण्यासाठीं एक बैठक घेणार आहोंत. तुम्ही आलांत तर बरं होईल."

'डॉक' त्या बैठकीला गेला तेव्हां तिथें आणखी सात आठ माणसं होतीं. ते फारसें न बोलतां एकमेकाकडे बघत राहिले. चँडलरनें त्यांचें लक्ष त्यांच्यासमोर असलेल्या अडचणीकडे वेधलें. मग हळुहळू त्या अडचणीवर चर्चा करावयास सुरुवात झाली. चँडलरनें कांहीं जमिनीबाबत अशी सूचना केली कीं धान्याऐवजीं त्या जमिनींत जर गवत काढलें तर गांवाला भरपूर गवत मिळेल आणि जमिनीची धूपहि थांबेल. "तें कबूल" एकजण म्हणाला, "पण आम्हाला ती वाकडी-तिकडी नांगरट मान्य नाहीं."

"वाकड्या नांगरटीबद्दल पिकांनीं कधीं तक्रार तर नाहीं ना केली?" चँडलर सहज म्हणाला, "वाकड्या नांगरटींत सुद्धां पीक येतंच."

शेतांना बांध घालण्यासंबंधीं चर्चा सुरू झाली. एक गृहस्थ म्हणाला, "मला आमच्या पाद्र्यानें सांगितलं आहे कीं, जर शेताला बांध असावेत अशी देवाची इच्छा असती तर त्यानें ते तसे निर्माण केले असते." दुसरा म्हणाला, "मीं चांदण्यांत पेरणी केली कीं, माझं पीक चांगलं येतं."

ही चर्चा 'डॉक' ऐकत होता. लूथर मिलर नांवाचा शेतकरीहि ऐकत होता. मिलरला धर्माचें इतकें वेड होतें कीं, फावल्या वेळीं तो धर्मोपदेश करी. दोघांनींहि चँडलरच्या म्हणण्याला मान्यता दिली.

" तो कांहीं ' शहरी ' उंटावरचा शहाणा नव्हता " मिलर चँडलर-बद्दल म्हणाला, " तसं म्हटलं तर शिकलेल्या लोकांना आमच्यापेक्षां अधिक कळतं पण तसं कबूल करायला आम्हांला आवडत नाहीं. प्रत्येकाला सुधारायची इच्छा असते, पण कोणाच्याहि पायांत कोलदांडा घालून तशी सुधारणा होत नाहीं, उलट मनुष्य पडतो. शिवाय त्याला न समजणाऱ्या भाषेंत आपण कांहीं सांगायला गेलों तर तो अंधश्रद्ध बनतो. गांवच्या लोकांशीं बोलायचं तर त्यांची तुमची चांगली ओळख झाली पाहिजे. सिड चँडलर खेडुतांशीं बरोबरीच्या नात्यानें वागतो, आमच्या भाषेंत आमच्याशीं बोलतो."

कांहीं कल्पना ह्याप्रमाणें प्रत्यक्षांत आणायचें ठरवून ' डॉक ' नें गांव सोडून जाण्याचा बेत लांबणीवर टाकला. ' डॉक ' म्हणाला, " माझ्या शेतांत नवें बियाणं, यंत्रं वापरून पाहण्यासाठीं त्यानें मला कर्ज दिलं व माझं शेत एक प्रात्यक्षिक केंद्रच बनविलं. माझं शेत बघायला इतर शेतकरी येत असत."

हळुहळू ' डॉक ' नें सहा गाई घेतल्या. सातवी पास झालेल्या आपल्या मुलीला उच्च शिक्षण घेण्यासाठीं पाठवायचें त्याच्या मनांत होतें. पण त्याच्याजवळ पैसे नव्हते. तो गेला नि प्रिन्सिपॉल निकलसनना भेटला. त्यांची आधींच ओळख झालेली होती.

" डॉक," प्रिन्सिपॉल म्हणाले, " मला तुला मदत करायचीय्. पण तूं आम्हांला कांहींच देऊं शकणार नाहींस ? "

" दूध. " डॉक म्हणाला.

" छान्, आम्हांला दूध हवंय्. पण तूं इथपर्यंत दूध पोंचवणार कसा ?"

" माझी नि पोस्टमनची ओळख आहे. तो माझ्यासाठीं एवढं करील." डॉकनें उत्तर दिलें.

तो आम्हांला पुढें सांगूं लागला, " तेव्हां माझी मुलगी कॉलेजांत रहायला गेली. आमच्या पोस्टाच्या पेटीजवळ मी दुधाचें भांडें ठेवायचा.

तें माझा पोस्टमन मित्र कॉलेज जवळच्या पेटीजवळ पोंचवायचा नि माझी मुलगी तें घेऊन जायची. त्या दुधामुळें तिचें शिक्षण पुरें झालें. ''

डॉकच्या आणखी दोन मुली विद्यापीठांत गेल्या. मुलगा विमानदलांत आहे. " माझ्या तालुक्याचा हा विक्रम आहे." तो म्हणाला.

" तूं निघून गेला नाहींस ह्याचं तुला आतां बरं वाटतं ना ? " आम्हीं विचारलें.

" ह्या सबंध जॉर्जियांतलें तुम्हीं मला कांहींही दिलंत तरी माझ्या जागेचं मोल भरून निघणार नाहीं. " तो म्हणाला, " पण आमच्या ह्या भागांत जें घडलें तें घडलें नसतें तर मात्र मला किंवा माझ्या कुटुंबाला जगणें अशक्य झालें असतें."

१९३५ ते ५२ च्या दरम्यानची डॉकची प्रगति : अशी -- जमीन ६० एकरांची २०० एकर झाली. गुरें चरण्याची जमीन ६ एकरांची ६७ एकर. डुकरं १ चीं १०, कोंबड्या ७५ च्या ३८०० व गुरं १९ चीं ४०. शिवाय तो आतां भरपूर खतं वापरतो.

हॉवर्ड नीलचें उदाहरण असेंच आहे. १९३५ सालीं २८ एकरांच्या निकस जमिनीसाठीं त्यानें ४७५ डॉलर्स किंमत दिली. आतां तो दर एकरीं शंभर बुशेल पीक काढतो. त्याला एकरीं ६००० डॉलर किंमत देऊं केली पण त्यानें जमीन विकायचें नाकारलें.

" आमच्या कुटुंबांतील सर्वजण एकमेकाच्या सुखदुःखांत सहभागी होतात." डॉक म्हणाला, " मी माझ्या पोरांना मदत करतांना जेवढें शिकलों तेवढें इतर कशानेंहि शिकलों नाहीं. माझे शेजारी मला आवडतात. एकमेकांच्या कामांत आम्ही एकमेकाला मदत करतों. माझा एक शेजारी माझें कूळच आहे. राजकारणांत तो रिपब्लिकन पक्षाचा आहे, तर मी डेमोक्रॅटिक पक्षाचा आहें. पण आमचं छान जमतं. वागतांना मला जें योग्य वाटतं तेंच मी करतों नि माझं चुकतं असं कुणी सिद्ध करीपर्यंत तसंच वागतों. "

अनुक्रम 22203 वि: ... क्रमांक ... नों: दि: ...

डॉक जोन्सचा चँडलरला फार अभिमान वाटतो. " लोक सुधारत आहेत. " तो म्हणाला, " मी त्यांच्यांतच वाढलों. "

लोकांच्या ह्या प्रगतीला १९३२ सालीं सुरुवात झाली. चँडलरनें आठ माणसांना 'फावर्डी घेऊन कामाला लावलें व एकमेकांच्या सहकार्यानें काम करावयास सुरुवात केली. तो स्वतः त्यांच्याबरोबर काम करीत होता.

" ह्या लोकांत काम करतांना तूं जें यश मिळविलंस त्याचं काय ? " आम्हीं चँडलरला विचारलें.

तो थबकला. " मला नाहीं ठाऊक, " तो म्हणाला, " पण त्यांच्यांतलंच एक होऊन राहिलं पाहिजे. एकादी गोष्ट आपल्याला जशी करून हवी असेल तशी करतांना त्यांना ती जशी करायची संवय असेल तशी करूं देऊन पाहिली पाहिजे. लहान मूल रांगायला स्वतःच शिकतं पण त्याला चालायला मात्र शिकवावं लागतं व चालायला शिकवतांना त्याला आधार द्यावा लागतो. आधाराचे पांगुळगाडे जवळ जवळ असले कीं ते पकडण्याच्या इच्छेनें मूल एका आधारापासून दुसऱ्या आधारापर्यंत चालत जातं व म्हणूनच चालायला शिकतं. आपल्या शिक्षणपद्धतींत दोष एवढाच आहे कीं असे आधार फार दूर दूर अंतरावर असतात. त्यामुळें चालत जायची इच्छा होत नाहीं. ह्याला उपाय असा कीं पुढाऱ्यांनीं आपल्या अनुयायाजवळ राहून त्याला आधार दिला पाहिजे. "

" म्हणजे स्वावलंबी व्हायला लोकांना तूं शिकवतोस तर ? "

" हो. कुणालाहि दुसऱ्यावर अवलंबून राहायला आवडत नाहीं. जर आहे ह्या परिस्थितींतून वर यायला तुम्हीं लोकांना उद्युक्त केलेंत तर ते प्रगति तर करतीलच पण परिस्थितीचा अभ्यास करून आपले निर्णयहि आपणच घेतील. "

पण प्रत्येकाला कांहीं हें पटलेलें नाहीं. हे विरोधक आजहि ज्या भूमिकेवरून प्रतिपादन करतात त्या भूमिकेवरून चँडलर व बेली ह्यांना पूर्वी कोणत्या अडचणींना तोंड द्यावें लागलें असेल त्याची कल्पना येऊं शकते.

" पाणीपुरवठा काय करायचा? ओढ्याच्या पाण्यासारखं दुसरं पाणी नाहीं. " " यंत्रांनीं जमिनींना जसे हादरे बसतात तसे माणसांनाहि बसून माणसें थकून जातील." अशासारखीं मतें हे विरोधक बोलून दाखवीत असतात.

डॉक जोन्सइतकाच लूथर मिलर नव्या कल्पनांचा उत्साही पाठिराखा होता. त्यानें सांगितलें कीं आम्ही फार आत्मप्रेमी माणसें आहोंत. त्यामुळें चँडलर आणि प्रयोगशाळेचे बेली हे जणूं दगडी भिंतीवर डोकीं आपटून घेत आहेत असें वाटत असे."

मिलर धर्मोपदेशक असल्यानें त्याच्या अनुयायांवर त्याचें वजन आहे. ह्याचा फायदा करून घेण्यासाठीं बेलीनें ठरविलें कीं हवाबंद डबे भरण्याच्या कारखान्याची व्यवस्था पाहण्यासाठीं त्याला नेमायचें. गेलीं बारा वर्षें वीस ते तीस शेतकरी त्याच्या कारखान्यांत भाजीपाला आणून व यंत्रांत तो शिजवून हवाबंद डब्यांत भरून घेत आहेत. पुष्कळदां रोज दोन हजार डबे येथें भरण्यांत येतात. ( कारखान्याचा खर्च भागविण्यासाठीं सरकारला प्रत्येक डब्यामागें एक सेंट मिळतो. )

सिड चँडलरबरोबर बांध घालणाऱ्या आठ शेतकऱ्यांप्रमाणेंच ह्या कारखान्याचा उपयोग करणारांचाहि फायदा झाला.

प्रयोगशाळेचा जसजसा जम बसत गेला तसतशी अधिक जमीन, अधिक गुरें घेऊन शेतीशिक्षणाचें क्षेत्र वाढविण्यांत आलें. पण ही सर्व प्रगति होऊनही प्रयोगशाळा ही व्यक्तिगत कार्यानेंच ओळखली जाई. बेलीची काम करण्याची पद्धतच तशी होती.

" आमच्या पिढीला जॉन बेली हा स्काऊट—मास्तर आणि युवकनेता होता. " बायरन रीसनें आम्हांला सांगितलें, " फावल्या वेळांत तो काय करतो तिकडे आम्ही लक्ष देत नसूं. सहलीला जाणें, बास्केटबॉल नि इतर खेळ खेळणें ह्यांची संधी त्याच्याच मुळें आम्हांला मिळाली. ही संधी त्या पूर्वीं आम्हांला कधींच मिळाली नव्हती. स्काऊट मास्तरचा प्रयोगशाळेशीं

कांहीं संबंध नाहीं असें कुणाला वाटेल. पण तसा संबंध आहे. आमच्याकडल्यासारखीं स्वतंत्र विचारांचीं व वागणुकीचीं माणसें निव्वळ कल्पना मानीत नाहींत. माणसाला त्यांनीं आपलें म्हटल्याशिवाय ते त्याच्या कल्पना स्वीकारीत नाहींत. आपल्या कर्तव्यक्षेत्राबाहेर जाऊन बेलीनें आमचें जें हित केलें त्यामुळेंच त्याला आम्ही आमच्यांतलाच एक मानीत आलों व त्यानें सांगितलेल्या कल्पना स्वीकारूं लागलों."

एकदा बेलीलाच आम्हीं त्याच्या स्वत:बद्दल बोलायला लावलें. तो म्हणाला, "१९३२ ते १९३८ पर्यंत मी इथल्या लाकडी झोंपडींतच राहात होतों. एकदां रात्रीं एक वाजतां झोपेंतून उठवून एकानें आपल्या मुलाला उपचार करण्यासाठीं शहरांतून डॉक्टर बोलावून आणण्यास मला सांगितलें. डॉक्टरांनीं यायचें नाकारलें म्हणून यंग हॅरिस येथील डॉक्टरांच्याकडे आम्ही त्या मुलाला घेऊन गेलों. त्या डॉक्टरांनीं मुलाला फ्रँकलिन हॉस्पिटलमध्यें घेऊन जाण्यास सांगितलें. माझ्या गाडींत फारच थोडें पेट्रोल शिल्लक होतें. त्या गृहस्थानें मला सांगितलें कीं जर मी त्याला हिवांसी गांवापर्यंत पोंचवलें तर तेथून त्याचा भाऊ त्या मुलाला घेऊन पुढें जाऊं शकेल. आम्ही त्याप्रमाणें हिंवांसीला गेलों नि त्या गृहस्थाच्या भावानें त्याला नि त्याच्या मुलाला ताबडतोब फ्रँकलिनच्या हॉस्पिटलमध्यें नेलें. हॉस्पिटलमध्यें त्या मुलावर ॲपेंडिक्ससाठीं ताबडतोब शस्त्रक्रिया करण्यांत आली. मी इथल्या लोकांना जी मदत करतों त्यापैकीं एक प्रसंग मीं तुम्हांला सांगितला. पुष्कळदा त्यांच्या मृतांच्या शवपेट्या उचलून दफनासाठीं मला माझ्या गाडींतून स्मशानांत न्याव्या लागतात."

ब्लेअर्सविल गांवाला १९३५ पासून प्रगतीच्या मार्गानें नेणारी तिसरी शक्ति म्हणजे टेनेसीच्या नॉरिस डॅम धरणांतून मिळणारी वीज. बांधकामाच्या सामानाचा व्यापारी पॉल पॅरिस ह्यानें आम्हांला सांगितलें कीं, "जेव्हां सुरुवातीला विजेचे खांब आजूबाजूच्या टेकड्यांवर दिसूं लागले तेव्हां उत्तर जॉर्जियाच्या लोकांनीं त्यांच्याकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें. पण ब्लेअर्सविलच्या चराऊ रानांत वीज कंपनीचे लोक येऊं लागेपर्यंतच ते दुर्लक्ष करीत होते. इथेंहि तें

शेतांत खांब रोवायच्या अगदीं विरुद्ध होते. त्यांना शेतांतून जाऊं देण्यासहि शेतकरी तयार नसे. शेताला वळसा घालून त्यांना जावें लागे. शेतकरी म्हणे, ' काळोख पडला कीं मी झोपीं जातों. मला वीज हवीय् कशाला ? ती वीज आपल्या शेतावरून ' हांकलून ' देण्यासाठीं शेतकरी पुष्कळदां बंदुक घेऊन धांवे व मग खांब पुरण्याचें काम करणारांना पळून जावें लागे. ''

विजेबद्दल कांहींना व्यक्तिशः राग होता. वीज तयार करणारी टी. व्ही. ए. योजना खूपच प्रचंड होती व ती कांहींना फार निर्दयपणाची वाटली. पुष्कळांची सुपीक जमीन पाण्याखालीं गेली होती नि त्यांना त्याबद्दल अतिशय चीड येई. पुढें उंचावरली निकृष्ट जमीनहि टी. व्ही. ए. च्या स्वस्त विजेच्या साहाय्यानें ( पूर्वींच्या विजेचा दर, दर किलोवॅट तासाला दहा सेंट होता, तर टी. व्ही. ए. च्या विजेचा दर दीड सेंट. ) आणि तेथील खतांच्या कारखान्यांतून मिळणाऱ्या खतामुळें जेव्हां खूप सुधारली तेव्हां ही चीड कमी झाली. ह्या विजेनें बेली व चँडलर ह्यांच्या कार्यासाठींहि भरपूर मदत केली. स्टोव्ह, दिवे, रेफ्रिजरेटर्स, फ्रीजर्स, कपडे धुण्याचीं यंत्रें, दूध काढण्याचीं यंत्रें, विजेवर चालणाऱ्या रव्या, पंप, रेडियो—असे कितीतरी 'नोकर' थोड्याशा खर्चानें वापरायला मिळाल्यानें पुष्कळांना रिकामा वेळ मिळूं लागला व लोक शिकारीला नि मासे मारायलाहि जाऊं लागले.

शेतकऱ्यांना रासायनिक खतांची भीतीच वाटायची. ते त्यांना ' ॲसिड ' म्हणत. चँडलरनें नि बेलीनें इतर प्रयोगांप्रमाणेंच ह्यावरहि प्रयोग करून शांतपणें त्यांना खतांचा फायदा पटवून दिला नि मग शेतकऱ्यांची खतांची मागणी सपाटून वाढली. टी. व्ही. ए. जवळ खतें तयार होतीं. पण एवढीं खतें विकत घेण्यासारखी संघटना क्लेअर्सविलमध्यें नव्हती.

ह्याबद्दल वाल्ड्रेप एकदां मला म्हणाले, " तुम्हांला ठाऊक आहे का ? एकादी चांगली कल्पना ठार मारण्यासाठीं कुठल्याहि समितीला तीन बैठका घ्याव्या लागतात. पहिल्या बैठकींत समिती त्या कल्पनेबद्दल नुसती चर्चा करते. दुसऱ्या बैठकींत ती कल्पना मरेपर्यंत तिची चर्चा होते नि तिसरी बैठक भरते नि समितीच मरते ! "

आपली ही कल्पना मला मनाशीं नीट ग्रहण करूं देण्याच्या इराद्यानें ते क्षणभर थांबले व नंतर म्हणाले, "नवी शाळा बांधून झाल्यावर आम्हीं चेंडू खेळायचें क्रीडांगण कसें मिळवलें तें सांगितलें का तुम्हांला? एक दोन माणसं प्रथम वर्गणी गोळा करूं लागलीं. नंतर क्रीडांगण आंखून द्यायला त्यांनीं कुणाला तरी सांगितलं. पैसे अपुरे पडले कीं हे लोक कुठून तरी पैसे उभे करायचे, प्रॉमिसरी नोटा लिहून द्यायचे. लवकरच हे पैसे फिटतील. ज्यांना खेळायची गरज आहे असे लोक कुठल्याहि कमिटीपेक्षां लवकर क्रीडांगण तयार करूं शकतील."

स्वतःचें चर्चेहि समितींशिवायच आपण चालवतां कीं काय म्हणून मीं त्यांना विचारलें.

त्यांनीं स्मशानाच्या व्यवस्थेसाठीं नेमलेल्या समितीची गोष्ट हंसत हंसत सांगितली—"ही समिती कांहींच करीत नसे. मग कांहीं माणसांनीं एकत्र येऊन सारं स्मशान स्वच्छ केलं. त्याचं कुणालाच वाईट वाटलं नाहीं. तेव्हां अनौपचारिकपणेंच कामं करायची आमची पद्धत असावी असं मला वाटतं."

पण सर्व गांवकऱ्यांच्यातर्फे हमी देणारी संघटना असल्याशिवाय ब्लेअर्सविलला खत मिळणार नव्हतं. तेव्हां १९४७ सालीं एक दिवस सिड चँडलर आणि बॉनेल आकिन मिळून अठरा गांवकरी एका ठिकाणीं जमले.

अकिननें सांगितलें, "तीस टन उत्तम सुपर फॉस्फेट आपल्यासाठीं ठेवलेलें आहे. पण त्यासाठीं गांवची प्रातिनिधिक संघटना तयार करणें आवश्यक आहे. ह्या संघटनेंतील लोकांनीं सह्या करून माल ताब्यांत घ्यायचा नि माल मिळाल्यावर आपण पैसे द्यायचे."

ह्यावर सर्वच एकदम बोलूं लागले.

"आपण संघटना तयार करावी असें मी सुचवतों."

"तिचा कांहीं उपयोग नाहीं."

"कां?"

" आपण व्यापाऱ्यांशीं चढाओढ करूं लागलों तर त्यांना काय वाटेल ? "

" पण एवढें खत कुठल्याच व्यापाऱ्याजवळ नाहीं. शिवाय आपल्याला बीं पण लागेल नि तें तर इथें मिळतच नाहीं."

" आपण सारे स्वतंत्र आहोंत नि हवं तें करूं शकतों."

" ही सहकारी संघटना हवी, नाहीं का? नांव काय ठेवणार ? "

" युनिअन काऊंटी कृषि मंडळ."

" हं. छान, आपण सारे शेतकरी आहोंत. आपलं अन्न धरतींतूनच मिळतें."

" कुणाचा विरोध आहे का ? ...बाजूनें मतें ? विरुद्ध मतें......? ठराव पास. आतां प्रत्येकानें पुढें येऊन आपल्याला किती पोतीं खत व किती पौंड बीं हवं तें लिहून देऊन सही करायची. "

गांवांतली पहिली सहकारी संघटना ही अशी जन्माला आली. हा कोंब फोंफावून पुढें त्याचा मोठा वृक्ष झाला. पण त्याला एका गंडांतरांतून जावें लागलें.

जे. सी. क्रिस्टोफर ह्यांनीं खत आणलें व आपल्या बखळींत सांठवलें. मंडळाचे ते पहिले चिटणीस झाले. सभासदनोंदणी केली. पुढें मालाची मागणी वाढल्यावर मंडळानें माल विकून आपलें स्वतःचें गुदाम बांधलें. 'एब' रिच मंडळाचे व्यवस्थापक झाले. त्यांनीं राष्ट्रीय सहकारी बँकेकडे हंगामी कर्ज मागितलें. पण सहकारी मंडळ कर्ज देण्याइतकें मजबूत नाहीं असें सांगून बँकेनें कर्ज नाकारलें. पुढच्याच वर्षी क्लेअर्सविल बँक बुडाली व मंडळाची ५४०० डॉलर्सची ठेव नाहींशी झाली.

" आम्ही तुम्हांला सांगितलंच होतं." कांहीं सभासद म्हणाले, " आतां आपण स्वस्थ झोपीं जावं हें बरं." दुसरे म्हणाले.

पण सभासद झोपीं जायला तयार नव्हते. त्यांनीं एक जाहीर सभा घेतली. ताबडतोब दोन हजार डॉलर्स जमा झाले. तेवढीच रक्कम बँक

पुन्हा सुरू झाल्याबरोबर बँकेनें दिली आणि स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेनेंहि तेवढीच भर घातली.

पुढें मंडळानें सभासदांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्थासुद्धां केली. त्यापूर्वीं प्रत्येकाला आपला माल बाजारांत घेऊन जावा लागे. १९५३ सालीं मंडळाचें सर्व कर्ज फिटलें. वार्षिक उलाढाल १९४९ सालीं ६८००० डॉलर्स होती ती १९५३ सालीं १,४९,००० डॉलर्स एवढी झाली. ५४ सालीं तर त्यांत आणखी वाढ झाली होती. व्यवस्थापक 'एब' रिच ह्या यशाचें मोठें श्रेय 'धान्य मंडळा'ला देतात. दर एकरीं जो शेतकरी शंभर बुशेल उत्पन्न काढतो त्याला क्लबचा सभासद होतां येतें. १९४८ सालीं ४१ सभासद होते,' ४९ सालीं ७१ होते '५२ सालीं पाऊस पुरेसा पडला नाहीं, तरी ४० सभासद होते.

१९४८ सालीं सिड चँडलर टी. व्ही. ए.च्या कामासाठीं दुसऱ्या गांवीं गेल्यावर त्यांच्या जागीं 'स्पड' वेलबॉर्न आले. पण त्यांचेंहि गांवावर इतकें प्रेम आहे कीं, दुसऱ्या गांवीं महिन्याला शंभर डॉलर्स अधिक मिळणारी नोकरीहि त्यांनीं नाकारली. "इथें निश्चित काम होतंय्" 'स्पड' म्हणाले, "शाळा आणि पोस्ट ऑफिस माझ्या नजरेसमोर जळून खाक झालें. आग विझल्याच्या दुसऱ्या दिवशीं आम्हीं हजार फूट रबरी नळ आणला. माझ्यासमोर बँक बुडाली. माझ्याच समोर नवीन शाळा बांधली गेली, नवें पोस्ट ऑफिस बांधलें गेलें, नवी बँक सुरू झाली. आतां इथें लाँड्री, पेट्रोल पंप आणि थिएटर पण आहेत." त्यांनीं आणखीहि एक माहिती द्यायला हवी होती. १९०० सालीं तेथल्या जमिनींची जी किंमत होती ती आतां चौपट झाली होती.

विस्तारयोजनेचे अधिकारी फार्मर म्हणाले, "इथें घडलेले बदल प्रत्यक्ष शब्दांत वर्णन करून सांगणें फार कठीण आहे." लोखंडाचे व्यापारी बिल मीक्स म्हणाले, "जॉर्जियांत तग धरून राहिलेली शेवटली सरहद्दहि मीं नाहींशी झालेली पाहिली."

आजूबाजूला झालेल्या बांधणींत व नव्यानें स्थापन झालेल्या युवक मंडळासारख्या संस्थांतून ह्या प्रगतीचा प्रत्यय येतो. आतां दंतवैद्य डॉ. ली दर मंगळवारीं येथें येतात. नॉर्थ जॉर्जिया न्यूज ह्या वृत्तपत्राची मालकी हरोल्ड वेस्ट ह्यांनीं घेतली व त्याचा खप आतां सातशें झाला आहे. १९४८ पासून ह्या भागांत एकहि खून झाला नाहीं.

न्यू मिल्टन हॉटेल चांगलें भरभराटीला आलें आहे. हॉटेलचे मालक बॉनेल अकिन ह्यांच्याकडे आम्हीं जेवायला गेलों असतां त्यांनीं आपण सर्व पदार्थ गांवींच विकत घेत असल्याचें सांगितलें. जेवतां जेवतां त्यांनीं मदत केलेल्या दोन पोरांची माहिती आम्हीं त्यांच्याकडून काढली. एकाचें वय होतें सहा, दुसऱ्याचें आठ. एक चकणा होता, दुसरा आंधळा. अकिननीं सांगितलें–"ते माझ्याकडे टोमॅटो विकायला आले. मीं त्यांच्याकडे असतील तेवढे टोमॅटो पौंडाला दहा सेंटप्रमाणें विकत घ्यायचें कबूल केलें. त्यांनीं एक एकर जमिनींत टोमॅटो लावले–म्हणजे माझ्या गरजेपेक्षां चौपट ! पण मीं सर्व टोमॅटो विकत घेतले नि पहिल्या वर्षीं त्यांना साडेत्रेसष्ट डॉलर्स दिले. त्यामुळें चकणा मुलगा चष्मा विकत घेणार होता नि आंधळा अंध शाळेंत जातों म्हणाला."

"ब्लेअर्सविलचं वैशिष्टय काय तें मी सांगतें." 'स्पेड' वेलबॉनची बायको म्हणाली, "इथें इतकं शांत असतं कीं इथेंच राहावंस वाटतं." नंतर तिनें स्त्रियांच्या कार्याची माहिती दिली. "आमचें इथें उद्यान मंडळ आहे. शाळेला लागणारें खेळाचें सामान घेण्यासाठीं ह्या वर्षी आम्हीं पैसे जमविले. इथें सुंदर फुलांना तोटा नाहीं. आतां आम्ही रस्त्याच्या कडेला एक उद्यान सुरू करणार आहोंत."

बांधकामाच्या सामानाचे व्यापारी पॉल पॅरीस ह्यांची बायको एडिथ हिनें गृहमंडळें चालविलीं आहेत. जेव्हां स्त्रियांना अशा मंडळाची गरज असल्याचें तिच्या लक्षांत आलें, तेव्हां ती विस्तारयोजनेच्या अधिकाऱ्यांकडे गेली. त्यांनीं विचारलें, "तूं गृहशास्त्राची पदवी घेतली आहेस. तूंच हें काम कां करीत नाहींस ?"

तिनें कबूल केलें. पण अधिकाऱ्यांनीं ह्या कामासाठीं देण्यास पैसे शिल्लक नसल्याचें सांगितलें. ती स्वस्थ बसली नाहीं. गांवच्या आमदाराकडून तिनें दरमहा दोन डॉलर्स द्यायचें आश्वासन घेतलें व अशीं डझनभर माणसें मिळवून तिनें कामाला सुरुवात केली. पुढें मग थोडीशी सरकारी मदतहि मिळाली. आतां सर्व विभागांत तिच्या मंडळाचें कार्य पसरलें आहे. पाकशास्त्र, हवाबंद डब्यांत अन्न भरणें, अभ्रे करणें अशीं कामें मंडळांत शिकविण्यांत येतात."

" कुणीं विरोध नाहीं का केला ? "

" एक बाई म्हणाली कीं, नळांतून येणारें पाणी कृत्रिम असतें ! "

आतां एडिथच्या जागीं एक पगारी कार्यकर्ती काम करीत आहे.

* * *

ह्या सर्व प्रगतीचा परिणाम म्हणजे लोकांना वाटणारा उत्साह ! तो निरनिराळ्या स्वरूपांत व्यक्त होतो. रेव्हेन्यू खात्याचा आडदांड शिपाई प्रुएट म्हणाला, " मला मिळालेलं हें सर्वांत चांगलं गांव आहे. पूर्वीं मला असं वाटायचं कीं, जगांतील सर्वांत सुंदर वस्तु एकच—तरुण छोकरी ! हे डोंगर मला फार आवडतात. इथें किती निवांत वाटतं ! सतरा वर्षांत माझ्या बहुतेकांशीं ओळखी झाल्या आहेत. मी बंदूकही फारशी नेत नाहीं. एखाद्याला पकडायचें असेल तर तो लपून बसलेल्या जागीं जाऊन मी त्याला बोलावतों व मी पकडवॉरंट आणल्याचें सांगतों. मग तो आपणच पुढें येतो व मी त्याला पकडून नेतों."

लोखंडाचे व्यापारी बिल मीक्स म्हणाले, " इथं दैनिक वर्तमानपत्र न वाचलं तरी चुकल्यासारखं वाटत नाहीं. हें जवळजवळ नंदनवन आहे. इथल्या राहणींत मनावरचा ताण नाहींसा होतो. अतिश्रमानें मनावरचा ताबाहि उडत नाहीं." मीक्सना पूर्वीं खेड्यांत राहायची भारी भीति वाटायची.

धर्मोपदेशक बॉयंटन काव्यमय भाषेंत म्हणाले, " हे डोंगर म्हणजे ईश्वरानें एकमेकावर रचलेले विचार ! ह्यांतलं स्वातंत्र्य असं आहे कीं, तें

लोकांना आकर्षित करतं नि रमवितं. इथले निर्झर म्हणजे ईश्वराचे प्रवाही विचार ! फुलें म्हणजे ईश्वराचे फुललेले विचार !— आम्ही जेव्हां सर्वजण एकत्र येऊन काम करतों तेव्हां तें ईश्वराला हव्या असणाऱ्या मार्गानेंच करतों. कुणी इथून निघून गेला तरी परत आल्याशिवाय राहात नाहीं."

फोर्ड ट्रॅक्टर्सचे व्यापारी प्रेसिल ह्या गांवीं राहायला आले तेव्हां गृहशांतीच्या वेळीं एक शेजारी म्हणाला, " ही गृहशांति नाहीं–हा एक बंधु-भाव-वर्धक समारंभ आहे. चांगले शेजारी मिळणें कठीण असतें. सेसिल आणि रुबी इथें राहायला आल्यानें आम्हांला फार आनंद झाला."

दुसरा म्हणाला, " सेसिलची इथें भरभराट झाली नि त्यानं स्वत:चं घर बांधलं ह्याचा आम्हांला आनंद होतो. सेसिल, आम्ही सारे तुझ्या पाठीशीं उभे आहोंत. जेव्हां तुला मदतीची गरज लागेल तेव्हां इथें जमलेले आम्ही सर्व तुला मदत करूं."

पाहिलेल्या प्रगतीची अवास्तव स्तुति आम्ही करणार नाहीं ह्याची रीसना खात्री करून घ्यायची होती. पण डॉक जोन्स आणि इतर मंडळींनीं जेव्हां एकत्र येऊन बांध घालायच्या कामाला सुरुवात केली तेव्हां एक नवें तेज जनतेंत तयार झाल्याचा प्रत्यय आल्याचें त्यांनींच प्रथम कबूल केलें.

इथल्या विद्यालयांनींहि ह्या नव्या उत्साहाचा प्रत्यय आणून दिला. हायस्कूलचे मुख्याध्यापक सी. आर. कॉलिन्स ह्यांना असें वाटतें कीं " जर शिक्षकाला आपल्या कामाचें चीज व्हावें असें वाटत असेल तर ब्लेअर्स-व्हिलच्या शाळेंतच त्यानें यावें."

" मी मोठा झालों कीं मोठं घर बांधणार आहें. आजोबांनीं बाबांना दिलं तसं छोटं नाहीं. " एक बारा वर्षांचा मुलगा म्हणाला.

आपल्या शिक्षणाचा कांहीं खर्च तरी स्वत: कमाई करूनच भागवावा लागेल ह्याची त्या पोरांना जाणीव होती. जुनी शाळा जळून गेली तेव्हां नवी शाळा बांधण्यासाठीं उभारलेल्या कर्जाला कांहींनीं हरकत घेतली.

" आम्हांला आमच्या मुलांच्या डोक्यावर कर्जाचा भार ठेवून नाहीं मरायचं. " ते म्हणाले. पण संपादक इरा बटनें चटकन् जाहीर केलें— " छे, छे, शाळा झालीच पाहिजे. चांगल्या कार्यासाठीं आपण कर्ज फेडीत आहोंत असं आपल्या मुलांना वाटूं द्या. "

प्रादेशिक ग्रंथालयाची ग्रंथपाल क्लारा म्हणाली कीं, " पुस्तकांच्या व चित्रपटांच्या मागणींत सारखी वाढ होत आहे."

यंग हॅरिस कॉलेजमध्यें तरुण विद्यार्थी धर्मशिक्षण घेत आहेत. लूथर मिलरचें ह्या बाबतींतलें म्हणणें असें आहे कीं " माणसांचा एक रंग आणि वर्ग चांगला आहे नि दुसरा तितका चांगला नाहीं अशा समजुतींत आपण वाहवत गेलों. पण आपल्या बालपणाच्या कल्पना आपण विसरलों नि बायबल नीट वाचलें तर प्रत्येक मनुष्य चुकीच्या मार्गानें गेलेला आहे नि ईश्वरानें आपल्याला वांचवलें आहे असें त्याला स्पष्ट दिसेल. ह्यांत ईश्वरानें कांहीं पक्षपात केल्याचें मला दिसत नाहीं. तेव्हां आपण जर माणसांचा निग्रो, इटालियन, ज्यू , रशियन अशा पद्धतीनें विचार करायचें सोडलें तर बऱ्याच अडचणी दूर होतील व वंशभेद नाहींसे होतील."

जॅक वॉल्ड्रेपना असें वाटतें कीं चर्चनें एक एकर जमीन घ्यावी व सर्वांनीं मिळून ती कसावी म्हणजे ' ईश्वराचीं लेकरें ' काम करीत असल्यासारखें दिसेल. ह्या योजनेला ते ' ईश्वराची एकर योजना' म्हणतात.

आम्ही त्यांच्या अनुयायांबरोबर अशा शेतावर गेलों. बायबलमधील उतारे वाचून दाखविल्यावर जॅक म्हणाले, " हे ईश्वरा, हें शेत आम्ही तुझ्या चरणीं अर्पण करीत आहोंत. हें बीज सुपीक जमिनीवर पडो नि शंभरपट पीक येवो अशी आम्ही प्रार्थना करतों. तुझ्या आशीर्वादाशिवाय हें अशक्य आहे. "

सर्वजण निघून गेल्यावर जॅक आम्हांला म्हणाले, " येशु ख्रिस्तानें आपला नव्वद टक्के उपदेश गवत, धान्य, पेरणी, घर, भाकरी, झाडलोट, दुरुस्ती अशा विषयांवर केला आहे. आम्ही उपदेशक ह्यापेक्षां अधिक करूं

शकणार नाहीं. हे आर्थिक विषय धर्माचा महत्त्वाचा भाग आहेत. पुष्कळ शेतकरी ह्या ईश्वराच्या शेतावर शेती करण्यास शिकले."

पुढें त्यांनीं धर्मप्रवचन सुरू केलें तेव्हां आम्ही आमच्या रेकॉर्डिंग मशिनचा मायक्रोफोन त्यांच्यासमोर ठेवला. आम्ही रेकॉर्ड केलेल्या कांहीं भागांत पुढील शब्द आहेत.–"बऱ्याच लोकांची मुक्ति ही आत्मकेंद्रित असते. पण सर्व जगच ईश्वरानें निर्माण केलें आहे. सर्व जगाचीच मुक्ति व्हायला हवी, केवळ स्वतःची नाहीं. मुक्ति आत्मकेंद्रित बनली कीं तिचा हेतूच नष्ट होतो. खिरश्चनाचें जीवन अधिकाधिक सुकर होणार नाहीं तर अधिकाधिक कठीण होणार आहे. आपल्या वैयक्तिक जीवनाचीं ध्येयें आपण इतकीं लहान ठेवतों कीं तीं साध्य करण्यासाठीं ईश्वराची किंवा इतरांची मदत लागत नाहीं. आपण खिशांत हात घालतों नि असलें देणें देऊन टाकतों. जर आपण ध्येय उच्च ठेवलें तर आपल्याला ईश्वराची व इतर सहकाऱ्यांची मदत लागेल व सहकार्याचे फायदे स्पष्ट होतील"

हे शब्द बोलतांना जॅकची मनोभूमिका खूप खंबीर आहे, हें आम्हांला स्पष्ट झालें. चौदा वर्षांपूर्वी ते ब्लेअर्सविलला आले तेव्हां पहिल्या रविवारचा अनुभव त्यांनीं आम्हांला सांगितला. "प्रथम 'बाहेरच्या' माणसास घेण्याला विरोध होता. मी चांगला शिकलेला धर्मोपदेशक आहें असं सगळीकडे पसरवण्यांत आलं होतं. मी प्रथम चर्चमध्यें गेलों तेव्हां इतर सहा उपदेशक प्रार्थनास्थानें अडवून बसल्याचें माझ्या लक्षांत आलें व मी माझ्या प्रार्थनास्थानापर्यंत जाऊंहि शकलों नाहीं. पुढच्या रविवारीं सर्वांच्या आधीं जाऊन मीं जागा पटकावली व माझ्या श्रोत्यांना स्पष्ट सांगितलें कीं मी पळून जाणारा नाहीं. दुसऱ्या एका उपदेशकाला मीं प्रार्थना सुरू करायची विनंती केली, त्यानें सुरुवात केली' "हे ईश्वरा, पळून न जाणारा उपदेशक तूं इथें पाठवल्याबद्दल आम्ही तुझे आभारी आहोंत."

आतां ह्या गोष्टीला बरेच दिवस झाले. वाल्ड्रेप पळून गेले नाहींत. उलट दहा चर्चेसवर त्यांची देखरेख चालते. त्याचें कारण असें कीं, चँडलर आणि बेलीप्रमाणें त्यांनाहि हें ठाऊक झालें आहे कीं, 'कामें

करावयाचीं असल्यास तीं लोकांच्या बरोबरीनें केलीं पाहिजेत. केवळ लोकांसाठीं एखादी गोष्ट करून चालत नाहीं." तेव्हां लोकांच्या सुखदुःखाशीं ते समरस झाले आहेत. आपल्या जीपमधून डोंगरांतील रुग्णांना ते हॉस्पिटलमध्यें नेतात. मुलांना ते बास्केटबॉल शिकवतात. अर्थात् हें धर्मोपदेशकाचें काम नाहीं, अशी हरकत कांहींनीं घेतली.

आपण एक मोठें तत्त्व शिकलों असल्याचें त्यांनीं आम्हांला सांगितलें. ते म्हणाले, "तुम्ही जें अत्युत्कृष्ट करूं शकतां असें तुम्हांस वाटतें, त्यापेक्षांहि तें अधिक चांगलें करणारें कोणी तरी समाजांत असतेंच."

गोष्टी सांगण्यांत जॅकना कोणी हरवूं शकणार नाहीं. तरुण लोकांच्याबरोबर नृत्याला जाण्याला त्यांना हरकत घेणाऱ्या एका व्यक्तीची हकीकत त्यांनीं आम्हांला सांगितली. ते म्हणाले, "तिच्या तरुणपणीं तिनें कशी गम्मत केली, ह्याबद्दल मीं तिला बोलायला लावलें नि चर्चमधून हळूच निसटून ती 'वाटेल तें' करीत होती त्याची तिला आठवण दिली. दोन तास आम्ही बोलत होतों. मी जायला निघालों, तेव्हां वळून तिच्याकडे पाहिलें नि तिला सांगितलें, 'तरुण बदलले नाहींत. त्यांना अजूनहि मौज करावीशी वाटते. पुष्कळसे तुझ्याइतकेच बेछुट आहेत.' तेव्हांपासून तिची दृष्टि बदलली. खरं म्हणजे पुढच्या नाचाला ती माझ्याबरोबर येणार आहे."

"शेवटीं सरहद्द" आतां नष्ट झाली आहे हें वॉल्टर लॉकचें म्हणणें बरोबर आहे. "समाज अधोगतीच्या मार्गानेंच जातो असें नाहीं......"

झालेल्या प्रगतीला केवळ रस्ते, खतें आणि यंत्रें कारणीभूत नाहींत तर माणसें सर्वांत अधिक महत्त्वाचीं आहेत.

# ३

## आम्ही हार खाणार नाहीं

[ केवळ तेहेतीस कुटुंबांचें नष्ट होऊं पहाणारे एक गांव ह्या तेहतीस कुटुंबांनीं एकदिलानें घेतलेल्या निर्णयानें नि केलेल्या कामानें, नष्ट होण्याऐवजीं उलट भरभराटीला कसें आलें ह्याची कथा. ]

" तेहेतीस कुटुंबांच्या ह्या ' टिन टॉप ' गांवातर्फे आपलें सुस्वागत असो." अशा पाटीजवळ थांबून एका उन्हाळ्या दुपारीं वेदरफोर्ड, टेक्सस येथें फ्रेड समरच्या पेटींत पोस्टमननें एक पत्र टाकलें. पत्रावर असलेला ' ए. पी. ओ ' हा शिक्का पाहून तें पत्र आपला कोरियांत असलेला मुलगा कॅरोल ह्याच्याकडून आलें आहे हें समरनें ओळखलें.

लवकरच समर कुटुंब कॅरोलच्या पत्रांतील पुढील शब्द वाचीत होतें. " मी इवो–जिमा बेटावर कोरियाला जाणाऱ्या विमानांत होतों. कोणीतरी रेडियो चालू केला. रेडियोवर ' अमेरिकेचा आवाज ' ' टिन टॉप ' बद्दलच सांगत होता. मी कोरियांत विध्वंस करायला निघालों होतों. तुम्ही टिन टॉपला करीत असलेल्या प्रगतीची कथा ऐकून मला काय वाटलं असेल ! तुमच्या कामांत सामील व्हावं असं मला कित्ती कित्ती वाटत होतं ! "

ज्या गोष्टींचा ह्या सैनिकाला अभिमान वाटत होता तींत नष्ट होऊं पाहणाऱ्या ' टिन टॉप'च्या तेहेतीस कुटुंबांच्या गांवाची अधोगति थांबवून तें गांव सर्व कुटुंबांनीं प्रगतीच्या मार्गावर कसें आणलें तें सांगितलें होतें. ह्या कार्यांत त्याचेंहि कुटुंब होतें.

कांहीं कुटुंबांचीं नांवें त्या 'सुस्वागतम्'च्या पाटीजवळ रुपेरी रंगांत, त्यांचीं घरें किती अंतरावर आहेत त्यासह लिहिलीं होतीं. सिस्कस, क्रम्स, हचिन्सन्स, हॉजेस, सिअर्स, रिडल्स, टिलेर्स, टॉड्स, समर्स, लॉकलीन्स, स्पून्स, कॅरेवेस अशीं ह्या कुटुंबांचीं नांवें.

'टिन टॉप'चा आकार चौपन्न चौरस मैलांचा असून त्यांत शंभर ते पांच हजार एकरांचीं शेतें आणि गुरांचीं रानें आहेत. सगळीकडे गवताचा समुद्रच पसरलेला दिसतो. १८५० सालीं जीं पहिलीं कुटुंबें इथें रहायला आलीं तीं लाकडी झोंपड्यांत राहायचीं नि घरगुती तयार केलेल्या नांगरांनीं जमीन नांगरून कापूस पेरायचीं.

विसाव्या शतकाच्या आरंभीं कापूस पिंजून गठ्ठे बांधण्याची जिन त्यांनीं सुरू केली. त्या गिरणीच्या इमारतीवरील पांढरे पत्रे उन्हांत चमकायचे. कित्येक मैलांवरून ते दिसत असत. एकदां कोणीतरी त्या पत्र्याकडे पाहून ओरडलें—"बघा, 'टिन टॉप' दिसतंय" आणि तेव्हांपासून गांवाचें नांव 'टिन-टॉप' पडलें.

त्या 'कापसाच्या अर्थयुगांत' कामाखालीं स्त्रियांचा जीव जायचा. गाईचं दूध काढायचं, लोणी तयार करायचं, धुणं धुवायचं, बागेंत भाजीपाला लावायचा नि एवढं सारं करून पुन्हा शेतांत कामं करायचीं. तेव्हां घरांना न्हाणीघरं नव्हतीं, वीज नव्हती नि पाण्याचे नळ आलेले नव्हते. पाण्याच्या भांड्यांत दूध ठेवायचं नि त्याला एक फडकं बांधून ठेवायचं.

सहा वर्षांवरील मुलं बाल्च गांवीं असलेल्या शाळेंत जाण्यासाठीं दोन ते पांच मैल चालत जात. शाळेंत एकच शिक्षिका होती. अंधार पडायच्या आंत मुलं घरीं परत यायचीं व मग शेजाऱ्याकडे जायचीं. नातेवाइकांच्याकडे जाणं एवढंच सामाजिक जीवन होतं. सर्वांची समायिक होती ती शाळा. सर्वांच्या बैठका शाळेंतच भरत.

दोन लहान धर्ममंदिरें होतीं. परंतु त्यांच्यामुळें गांवांत एकी होती असं नाहीं. उलट त्या दोन्ही चर्चमध्यें भांडणंच असायचीं.

१९२० मध्यें स्वयंपाक, शिवणकाम आणि गृहोपयोगी कामें शिकण्यासाठीं महिला मंडळ स्थापन झालें.

१९३० पर्यंत जिन, शाळा, चर्च आणि महिला मंडळ ह्यांतच ‘ टिन टॉप ’ च्या सर्व समाजाचा एकमेकाशीं संबंध यायचा. भरभराटीची लाट आली नि ‘ टिन टॉप ’ ला वगळून आजूबाजूच्या गांवांत प्रगति करून गेली. ह्या गांवाचें भविष्य मात्र अगदीं काळेंकुट्ट होतें. त्यानंतर यंत्रांनीं ह्या समाजाच्या जीवनावर हल्ला केला. नव्या कारखान्यांत नोकऱ्या करण्यासाठीं तरुण लोक गांव सोडून गेले. जिन विकावी लागली. गुरांचें, मांसाचें आणि दुधाच्या धंद्याचें भवितव्य अनिश्चित होतें. पैसा येईल असं गांवांत कांहीं नव्हतं.

१९४४ सालीं बाल्चची शाळाहि बंद झाली. मुलं बाजूच्या गांवच्या दोन शाळांतनं शिकायला जायचीं. शाळेच्या बसनं जाण्यासाठीं त्यांना काळोखांतच घराबाहेर पडावं लागे नि संध्याकाळीं तीं घरीं इतकीं उशिरां परत येत कीं, दिवे लागून गेल्यानें त्यांना रोज गांवचं दर्शन केवळ दिव्याच्याच प्रकाशांत व्हायचं. तरुण माणसांना मोटरगाड्यांचं वेड लागलं. रस्ते खराब असले तरी मोटरीनं फिरायला त्रास होत नसे. मोठालीं माणसंहि आतां खेळ आणि सिनेमा बघायला जाऊं लागलीं.

मिसेस् हॉजेसला ह्या परिस्थितींत मुलांचे होणारे हाल पाहून वाईट वाटायचें. “ पुष्कळांचे वाढदिवसहि साजरे होत नसत. कारण त्या मुलांची माहितीहि कुणाला नसायची.”

मिसेस जिम् जॉन्सन म्हणाल्या, “ इथें आल्यावर मला फार एकटं एकटं वाटायचं. सिनेमाला जायचं एवढं एकच करमणुकीचं साधन होतं. शेतकऱ्याच्या मनांत असलं तरी त्याला वाटेल तेव्हां उठून जातां येत नाहीं. शहरांत मीं कुणाला सांगितलं कीं, मी ‘टिन टॉप’ला राहतें तर ‘ टिन टॉप ’ कुठें आहे तें त्यांना माहिती नसे.”

युद्ध सुरू झालं तेव्हां महिला मंडळ बंद झालं. दोनपैकीं एक चर्च अजिबात बंद झालं. दुसऱ्याचा रंग गेला होताच. भाविकहि येत नसत.

एका रविवारीं तर फक्त एकच स्त्री प्रार्थनेसाठीं आली. गांवच्या दुकानांत मालच नसल्यानें क्वचितच कोणी तिथें जायचा. ‘ टिन टॉप ’ चं सामाजिक जीवन हें असं मरायला लागलं नि गांवावर प्रेतकळा आली.

* * *

पण गांव नष्ट मात्र झालें नाहीं. ऑक्टोबर महिन्यांत एक दिवस दुपारच्या वेळीं ग्रेस कार्टराइट आणि तिचा नवरा मोटरीनें जात असतां स्मशानाजवळ त्यांनीं गाडी थांबवली. स्मशानांतलीं थडगीं गवतानें झांकून गेलीं होतीं. समोर बंद झालेलीं दोन्ही चर्चेस् दिसत होतीं.

“ बिखॅम ” ग्रेस म्हणाली, “ आपण चर्चला रंग देऊं या. ”

“ देऊन बघूं. ” तो म्हणाला आणि पांच मैलांवरील आपल्या शेतावरून रंगारी आणून त्यांनीं चर्च रंगवलें.

कार्टराइट जोडप्यानें हें कां केलें ? बिखॅम साठ वर्षांचा, शांत स्वभावाचा मनुष्य होता. गुरं पाळण्याचा धंदा करण्यासाठीं बत्तीस वर्षांपूर्वीं त्यानें वकिली सोडली. ‘टिन टॉप’ला आठशें एकर रान घेतलं आणि चांगल्या जातीचीं गुरं पाळायला सुरुवात केली. ग्रेसचा बाप ती पांच वर्षांची असतांना आंधळा झाल्यानें तिला आपलं शिक्षण आपल्या हिंमतीवर पुरं करावं लागलं. बिखॅमबरोबर खेडयांत जायचं तिनें ठरवलं तेव्हां तिच्या भावानें तिला बजावलं, “ तूं खेड्यांतून बाहेर पडण्यासाठीं इतकी धडपड करून शिकलीस. पुन्हा खेड्यांत जायच्या आधीं विचार कर. ”

“ मी संकुचित वृत्तीपासून दूर जाण्यासाठीं धडपडलें. मग ती कुठेंहि असो. खेडयापासून दूर जाण्यासाठीं नाहीं. ” तिनें भावाला सांगितलें.

खेड्यांतहि जीवन सुखी होऊं शकतें हें बिखॅमला दाखवून द्यायचं तिनें ठरवलं. तिथल्या समाजांत आपलं मानाचं स्थान निर्माण करण्याचं ठरवून इतर स्त्रियांच्या नि पुरुषांच्या बरोबरीनें त्यांनीं कामें केलीं व आपण चांगले शेजारी असल्याचें सिद्ध केलें. आतां त्यांनीं चर्चला रंग दिल्यामुळें तर ‘ टिन टॉप ’ मध्यें नवें वातावरण सुरू झालें.

मिसेस यंग आणि मिसेस करावे ह्यांनीं महिला मंडळाची बैठक बोलावली व त्यांत त्यांच्या भागाच्या प्रतिनिधींना बोलायला सांगितलें. ' टिन टॉप 'चें जीवन नव्यानें संघटित करण्याचा निर्णय घेणाऱ्या ठरावाला एकंदर सोळा जणींनीं पाठिंबा दिला. फार्मर–स्टॉकमन,' नियतकालिकानें जाहीर केलेल्या ' समाज सुधारणा ' स्पर्धेत भाग घेण्याचा दुसरा ठरावहि महिला मंडळानें पास करून घेतला. पहिलें पारितोषिक एक हजार डॉलर्सचें होतें. वीज, टेलिफोन, चांगले रस्ते ह्यांच्या गांवाला गरजा असल्याची मागणी आतां गांवांत ऐकूं येऊं लागली. शेवटीं ह्या स्पर्धेत भाग घेण्याबाबत सर्व गांवाची ' सार्वजनिक ' सभा घेण्याचा निर्णय घेण्यांत आला.

अठरा जानेवारी १९४९ ला उत्तर भागाच्या जुन्या चर्चमध्यें कंदिलाच्या मिणमिण प्रकाशांत पन्नास गांवकऱ्यांची सभा घेण्यांत आली. मुख्य रस्ता कसा सुधारतां येईल ह्यावर ग्रेस कार्टराइट बोलली. ( तिचें हें पहिलेंच भाषण. ती म्हणाली, "आतां मी खरी शेजारीण झाल्यासारखें मला वाटतें.") जमीनरक्षणासाठीं नि जमिनीचा योग्य उपयोग करण्यासाठीं सरकारकडून काय काय मदत मिळूं शकेल तें त्या विभागाच्या अधिकाऱ्यानें सांगितलें. जे जमीनमालक सभेला आले नव्हते तें आपलं काम पाहून येतीलच असा विश्वास इतरांनीं व्यक्त केला. त्या बैठकींत एक कायम स्वरूपाची संघटना तयार करण्यांत आली, चढाओढींत भाग घ्यावयाचें ठरलें आणि प्रत्यक्ष कामें करण्यासाठीं तेरा समित्या तयार करून सक्तीच्या शिक्षणाचें ज्यांचें वय संपलेलें होतें, अशा प्रत्येक नागरिकाला कुठल्यातरी समितिवर काम करावयास लावण्यांत आलें. हे टेक्ससमधले लोक ब्लेअर्सविलपेक्षां अगदीं निराळे आहेत. त्यांना संघटना तयार करणें प्रगतीच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें वाटलें.

एझल गांवीं असलेल्या जिल्हा कचेरींत ' वीज समिती 'चे सभासद सात वेळां जाऊन आले. डिसेंबरपर्यंत एक–दोन तारा गांवांत येऊन पोंचल्या नि दिवे, पंप, रेडियो सुरू झाले. स्वच्छता समितीनें झाडेंझुडपें तोडून रस्ता आंखण्यासाठीं बारा माणसांची संघटना केली. त्यांच्या

कामाच्या पहिल्या दिवशीं महिलांनीं त्यांना जेवण आणून दिलें आणि आश्चर्यानें थक्क करून टाकलें. गांवचें तें पहिलेंच ' समाज-भोजन ' होतें. प्रथमोपचाराचें शिक्षण देण्यासाठीं आरोग्य समितीनें सर्वच कुटुंबें हातीं घेतलीं. तरुण पोरांनीं बेसबॉल क्लब चालू केला. ह्या सर्व सुधारणांबद्दल गांवाला फार्मर-स्टॉकमन पारितोषिक मिळालें.

चर्च कमिटीनें दोन्ही चर्चेस दुरुस्त केलीं. लोक घरचें जेवण घेऊन यायचे, चर्चची वेळ होईपर्यंत काम करायचे, वेळ झाली कीं प्रार्थना म्हणून, जेवून पुन्हा रात्रीपर्यंत काम करायचे. चर्चला येणाऱ्यांची संख्याहि बरीच वाढली.

धार्मिक शिक्षण बातिस्ता चर्चमध्यें सुरू झालें तेव्हां पहिल्यानें फक्त सहाच ' विद्यार्थिनी ' होत्या. शिक्षकांनींहि बायबल नीटसें वाचलेलें नव्हतें. १९४९ पर्यंत ही संख्या पंचावन्न झाली व चर्चमध्यें प्रार्थनेसाठीं येणारांची संख्या पंचाहत्तर झाली.

' टिन टॉप ' मध्यें नवें जीवन खेळूं लागलें होतें. ग्रेस कार्टराइट म्हणाली, " आम्ही एकत्र आल्यानें नि एकत्र काम केल्यानें आमची एकीची भावना वाढली. आम्ही फक्त आमच्या कुटुंबाचा विचार आतां करीत नव्हतों. एकीचीं मुळें आमच्या समाजजीवनांत खोल जाऊं लागलीं होतीं. तरी आमचे तरुण करमणुकीसाठीं गांवाबाहेर जात होते. असें कां होतें त्याचा आम्ही विचार करूं लागलों. "

त्या ' कां? ' चें उत्तर देणारा कार्यक्रम सुरू सुद्धां झालेला होता.

लहान मुलांच्या आया जेव्हां प्रथमोपचाराचें शिक्षण घेण्यासाठीं जात तेव्हां त्यांच्या मुलांना ग्रेस हस्तव्यवसाय शिकवी. आपल्या अंगावरचीं मुलें अशीं बाजूला काढलीं गेल्यानें मातांना रिकामा वेळ मिळूं लागला नि मोकळेंहि वाटूं लागलें. साहजिकच मनांत विचार येऊं लागले, ' कांहीं गम्मत करायला काय हरकत आहे ? ' त्यांच्या लहानपणीं त्यांना कांहींच मिळालं नव्हतं. अजून कांहीं आयुष्य गेलेलं नव्हतं. पण करमणूक करायची

तर शहरांत जाऊन का पैसे खर्चावे लागतात ? त्यांच्या मनांत हे प्रश्न जसे उभे राहिले, तशीं त्यांचीं उत्तरेंहि सांपडत गेलीं. शेती-अधिकाऱ्याचें सिनेमा दाखवायचें यंत्र घेऊन त्यावर फुकट मिळणारे शैक्षणिक बोलपट दाखविण्यांत येऊं लागले. बाहेरगांवांहून गवई, कलावंत बोलावले, पण फारसें कोणी येईना. मनांत पुन्हा प्रश्न उभा राहिला. आपण पुरेसे प्रयत्न करतों का ?

गांवांत एकादें 'समाज मंदिर' असावें असें समितीला वाटलें. चर्चचा कांहीं तसा उपयोग होण्यासारखा नव्हता, गांवाच्या उत्तरेस असलेलें एक खुलें स्टेज जेव्हां वाऱ्याचा उपद्रव टाळण्यासाठीं दक्षिणेस न्यायचें ठरलें तेव्हां त्याचा मालक तयार होईना. "माझ्या बापानें तें इथें तयार केलं. वारा येवो कीं आणखी कांहीं होवो, तें इथेंच राहील." तो निश्चयानें म्हणाला.

'समाज मंदिर' सार्वजनिक मालकीचेंच हवें हें त्यामुळें गांवकऱ्यांच्या लक्षांत आलें. पाहुण्या आलेल्या जॉन ग्राइंडस्टाफनें सुचविलें कीं, "रस्त्याच्या पलीकडे आपण नवें समाज मंदिर बांधूं या. तें गांवचें स्मारक होईल." कल्पना सर्वांना मान्य झाली. गांवचे लॉनी ऱ्होड्स आणि धाकटा ब्रॅट कॅरावे दुसऱ्या महायुद्धांत मारले गेले होते. स्मारकाला त्या दोन वीरांचीं नांवें द्यायचें ठरलें. ऱ्होड्सच्या वडिलांनीं पांच एकर जमीन दिली. त्या जमिनीवर नवें समाज मंदिर गांवच्या वीरांचें स्मारक म्हणून बांधलें जाणार होतें. हातांत शंभर डॉलर्स होते. गांवीं मिळणाऱ्या दगडांचीच इमारत बांधायची होती.

समितीनें जमीन साफसूफ करून कामाला सुरुवात केली. टेक्ससच्या एका कंपनीला लिहून कोणातरी इमारतीची कल्पना द्यायला सांगितली. नाटकें करणाऱ्या मंडळांना स्टेज कसें असावें तें विचारण्यांत आलें. बांधकामाचे नमुने तयार करणाऱ्या हेड्रिकनें पुरी योजनाच तयार करून देणगी म्हणून पाठवून दिली.

नऊ आक्टोबरला जमिनीवर पहिली कुदळ पडली तेव्हां दोनशें पाहुणे आले होते. विमानदलाच्या विमानांनीं दोन्ही वीरांच्या स्मृतीला मानवंदना

दिली. धर्मोपदेशकानें ‘ छोटे समाज गटच राष्ट्राचा पाया ’ असल्याची जामलेल्यांना आठवण देऊन अधिक समाजसंघटना असाव्यात अशी प्रार्थना केली.

आतां बांधकामावर सारीं कुटुंबें खपूं लागलीं. रविवारीं प्रार्थना संपल्यावर लोक दगड वाहून आणीत. एरवीं जेवण बरोबर घेऊनच ते येत आणि दिवसभर काम करीत. पाया खणायचें काम महिलांनीं केलें. एक म्हणाली, “ बायका नि पुरुष कामं करायला लागल्यावर इमारत पुरी झालीच पाहिजे. ”

रविवारीं, पावसांतसुद्धां रोजच्याप्रमाणें दगड नि सामान वाहून आणायचें काम पुरुष करीत होते. ग्राइंडस्टाफनें पोलाद दिलें. विहिरी खोदण्याचें काम करणारें यंत्र दुसऱ्या एका कामावर शेजारीं चालू होतें, त्यांनीं फुकट विहीर खोदून दिली. कर्बी नांवाच्या गृहस्थांनीं जमीन करायला सिमेंट आणि तें काम करणारे कामगार दिले. शाळेची एक जुनी इमारत होती. तिचीं लाकडें विनामूल्य मिळालीं. जुन्या लोखंडी सामानांतून शेकोटी तयार झाली. सैनिकांच्या एका कारखान्यानें स्वयंपाकघरांत लागणारें सामान बनवून दिलें. स्त्री–पुरुष रात्रंदिवस काम करूं लागले.

१९ फेब्रुवारी १९५० रोजीं गृहशांति झाली. समारंभास येणाऱ्या प्रेक्षकांनीं कांहींतरी उपयोगी वस्तु भेट म्हणून आणली. कांहींनीं पैसे दिले. जेव्हां समाज मंदिराच्या इमारतीचें काम सुरू झालें तेव्हां हातांत फक्त शंभर डॉलर्स होते. सर्वांच्या सहकार्यानें आज गांवांत अठरा हजार डॉलर्सची इमारत उभी राहिली.

मंदिर गांवाच्या ताब्यांत आल्यावर गांवानें ग्रेस कार्टराइटला मेयर केलें आणि नाट्य, प्रसिद्धि, गृहजीवन, धार्मिक बाबी अशा आणखी समित्या नेमल्या.

निरीक्षक म्हणून आम्ही गेलों तेव्हां आमचें स्वागत करायला ग्रेस कार्टराईट ( मेयर ), ब्रायंट कॅरावे ( कमिशनर ), मिसेस ‘ बॅक ’ करावे

( चिटणीस आणि खजिनदार ) व रिडल आणि फ्रँकलिन हे युवक नेते ह्यांचें शिष्टमंडळ उभें होतें.

आम्हांला त्यांनीं मंदिर दाखवलें. शेकोटीच्या जागीं उंचावर ' फार्मर-स्टॉकमन'चें त्यांनीं जिंकलेलें पारितोषिक होतें. शेजारींच ' स्टार टेलिग्रॅम' नांवाच्या वृत्तपत्रानें भेट म्हणून दिलेलें सोन्याचें पाणी दिलेलें फावडें होतें. झुंबरें ज्याला टांगण्यांत आलीं होतीं तें जुन्या गाडीचें चाक होतें. कपडे ठेवायच्या खुंट्या घोड्याच्या नालीच्या होत्या. सभागृहाच्या एका टोकाला स्टेज होतें आणि सहा सात वर्षांच्या दोन मुली तेथें बाहुल्यांच्या खेळाची तयारी करीत होत्या. मंदिराच्या कोठींत भरपूर सामान होतें. पण कोठीला कुलूप लावीत नसत.

संध्याकाळीं आम्ही गांवच्या सभेस हजर राहिलों. बालपक्षाघातानें अपंग झालेला बारा वर्षांचा जॉर्ज कार्यक्रमपत्रिका वांटीत होता. दहा वर्षांच्या टॉमनें पीक-सुधारणेवर एक पोस्टर तयार केलें होतें. तें तो सर्वांना दाखवीत होता. युवकनेता फ्रँकलिन ह्यानें शांतता प्रस्थापित करून शंभर प्रेक्षकांची ती सभा सुरू केली. शेजाऱ्यांच्या प्रेमाबद्दल ईश्वराचे आभार मानणारी प्रार्थना कोणींतरी केली. नंतर जेवणाचा कार्यक्रम झाला. आपलें आपण वाढून घ्यायचें. जेवणानंतर मुलांचें सामुदायिक गीत झालें. मग सर्वांनीं मिळून ' आमचा टिन टॉपचा दीप असाच प्रज्ज्वलित राहूं दे ' असा अर्थ असलेलें गाणें म्हटलें. मग ज्यांचा वाढदिवस नुकताच झालेला होता अशांना आपल्या वयाच्या प्रत्येक वर्षाला एक सेंट प्रमाणें एका पेटींत पैसे टाकायला सांगण्यांत आलें. त्यांतून विजेचा खर्च भागविण्यांत येणार होता. मग सभेला सुरुवात झाली. कांहीं भाषणें पुढें दिलीं आहेत.

" खजिनदारांचा अहवाल पहिल्यानें घेऊं या. "

" सगळीं बिलें भागवलीं आहेत. आतां निधींत २६ डॉलर्स शिल्लक आहेत. विद्यार्थ्यांच्या कर्ज-निधींत ६०० डॉलर्स आहेत. "

" बेसबॉलचं काय झालं ? "

22203 दि:
अनुक्रम
नों: दि:

" जागा तयार आहे. पुढच्या बुधवारी माती पसरायला या.

" शेतीतज्ज्ञाला आम्हीं इथें बोलावलं आहे. "

सभेच्या शेवटीं नाच ठरविण्याची मागणी करण्यांत आली. एक आठवड्यानंतरचा दिवस ठरविण्यांत आल्यावर सभा संपली.

मंदिरांत नियमित होणारे कार्यक्रम म्हणजे ' माता दिन ', ' जमीनरक्षक दिन ' व धार्मिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करण्याचा समारंभ. आतां विवाह समारंभासाठींहि कुणी बाहेर गांवीं जात नसत. २२ जून १९५० रोजीं कॉय कार्टर आणि बॉबी पार्कर ह्यांचा विवाह समाज मंदिरांत झाला. मंदिरांत झालेला तो पहिला विवाह. वधूचे कपडे गांवच्या लोकांनींच हौसेनें तयार करून दिले. मुलांच्या वाढदिवसांची दखलहि फार काळजीपूर्वक घेण्यांत येऊं लागली.

' टिन टॉप 'च्या लोकांच्या चेहेऱ्यांवरचा उत्साह त्यांची जिन गिरणी विकल्यावर नाहीसा झाला होता. आतां तो पुन्हा खेळूं लागला. समाज मंदिरांतच नाट्यगृह असल्यानें त्यांना विशेष उत्साह वाटत होता. प्रगतीचें कार्य सर्वत्र चालू असतांनाच करमणुकीकडे दुर्लक्ष करावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. म्हणून इमारत पुरी होत असतानांच एक समिती बेलोर विद्यापीठांत गेली. तिथें ग्रामीण भागांतील करमणुकीच्या कार्यक्रमांचा विशेष अभ्यास करण्यांत येत होता. विद्यापीठानें सेसिल मॅसीला गांवांत पाठविलें. गांवच्या लोकांशीं चांगली ओळख व्हावी म्हणून इमारतीच्या बांधकामांत तो काम करूं लागला. सोमवारीं तो नाट्यकला शिकवी. छोटीं छोटीं नाटुकलीं त्यानें बसवून घेतलीं. मोठ्यांना त्यानें व्हॉली बॉल खेळायला शिकविलें. स्त्रिया, पुरुष व तरुणांचीं नाटुकलीं त्यानें बसवून घेतलीं. पुढें एकांकिका बसवण्याइतपत प्रगति झाली. नंतर आपलाच इतिहास अभ्यासून त्यावर एक तीन अंकी ऐतिहासिक नाटक गांवच्या लोकांनीं बसविलें. बालशाखाहि नाटकें करूं लागली.

विशीच्या आंत असलेल्या तरुणांनीं लग्नसमारंभावर एक विनोदी नाटुकलं लिहिलं होतं. त्यांतलीं कांहीं वाक्यें-- " प्रिये, ह्या चांभारचौकशा

करणाऱ्या मंडळीसमोर आपण दोन हृदयांचें मीलन करण्यासाठीं उभे आहोंत. ह्या मीलनानंतर आपण ज्या राज्यांत प्रवेश करणार आहोंत तें टेक्ससपेक्षांहि मोठें आहे. "

" ह्या गोड सुंदर पोरीला ज्याच्यावर आपली हुकुमत गाजवतां येईल नि ज्याच्यासाठीं भाकरी भाजतां येतील असा पुरुष हवा आहे. तेव्हां त्यांना आपण आतां लग्नाच्या कुलपानें बंद करूं या. "

" हा तरुण जर तुझ्या बापासारखाच असला तर स्वतःच्या हक्कासाठीं भांडतां भांडतां तुला नकोसं होईल."

समाज मंदिरांतील ह्या नाटकगृहामुळें आतां करमणुकीसाठीं तरुण बाहेरगांवीं जात नसत.

हस्तव्यवसाचेंहि स्त्रीपुरुषांत वेड शिरलें. कपड्यापासून तों बंदुकीच्या पिशव्यांपर्यंत अनेक वस्तु तयार करण्यांत आल्या. त्या विकून पैसे मिळत.

कॅरवे पतिपत्नींना मंदिराला आपल्या मुलाचें नांव दिल्याचा भारी अभिमान वाटतो. मिसेस कॅरवे म्हणाल्या, " जेव्हां आमचा मुलगा मारला गेला तेव्हां आपल्या जीवनांतलं सर्वस्व गेलं असं मला वाटलं. मग ह्या इमारतीच्या कामाला सुरुवात झाली. आम्ही काम करूं लागलों. माझ्या आयुष्यांतला सर्वांत सुखाचा हा काल आहे. इथें पूर्वीं कोणी एकत्र येत नसत, कोणाचीं लग्नं होत नसत. दोन मैलांवर राहणाऱ्या लोकांची माझी ओळखहि नव्हती." मिस्टर कॅरवे इमारतीजवळ काम करीत होते. ते म्हणाले, " ह्या मंदिरानें आम्हां सर्वांना एका कुटुंबांतील माणसांप्रमाणें एकत्र आणलें."

इतर नागरिकांचीं मतें—" पूर्वीं मला ' थँक यू ' म्हणायला सुद्धां येत नव्हतं. आतां नाटकाचं प्रॉम्टिंग मी करतों. मीं इतकी मेहनत घेतली कीं झोपेंत सुद्धां मी भाषण प्रॉम्प्ट करतों." " ह्या मुलांच्या प्रमाणें आम्हांला लहानपणीं संधि मिळाली नाहीं ह्याचं वाईट वाटतं."

एक स्त्री म्हणाली, "न भांडतां आम्ही बायका वाद करायला शिकलों."

० ० ०

आतां सर्वत्र सुधारणा होऊं लागली. प्रत्येकजण आपआपलें घर सुधारूं लागला. घरांत आंघोळीचे टब आले, खिडक्यांचे पडदे तयार झाले, घराभोंवतीं हिरवळ आणि बागा तयार होऊं लागल्या. स्वच्छ, ऊबदार, मऊ अंथरुणें आलीं. टेलिफोन्स आले नि सुंदर पोषाखांच्या चढाओढींत गांवचे लोक भाग घेऊं लागले. गांवांत एक नर्स येऊन मुलांच्या आरोग्याची काळजी घेऊं लागली.

जर्मन वंशाच्या एका महिलेनें आम्हांला अभिमानानें सांगितलें कीं, "आमचें घर आमच्या मालकीचें आहे. आम्ही कुणाचं कांहीं देणं लागत नाहीं."

जॅक पिकार्डला आपल्या मेंढरांचा अभिमान वाटतो.

एकदां खूप पाऊस पडून गांवापासून ग्रॅनबी गांवाला जाणाऱ्या रस्त्यावरील पूल वाहून गेला पूल बांधायला लागणारे ६५०० डॉलर्स द्यायचं सरकारनें नाकारलं. गांवची सभा झाली. सर्व एकत्र आले, यंत्रें मिळविलीं, सिमेंट मिळवलं, कॉंक्रीट तयार केलं नि ४५०० डॉलर्समध्यें (श्रमदानाचें मूल्य धरून) कमी उंचीचा नवा पूल बांधून तयार झाला. हें काम पाहून सरकारनें पंचवीस मैलांचा नवा रस्ता तयार करून दिला व दोन नवे पूल बांधून दिले.

शेजारप्रेमहि वाढलें. ग्रेस आणि ली थॉपसन ह्यांचें घर जळून गेलें. तेव्हां गांवकऱ्यांनीं एक कार्यक्रम केला. सातशें डॉलर्स मिळविले व तीनशें डॉलर्सचें सामान देणगी म्हणून आलें. एका छोट्या घरांत त्यांची तात्पुरती व्यवस्थाहि करण्यांत आली.

क्रम नांवाचा शेतकरी हंगामांत निधन पावला. गांवच्या पुरुषांनीं त्याचं शेत कापून दिलें. बायकांनीं त्याच्या विधवेला जेवायला घातलं.

ह्या प्रेमाच्या बंधनांतून आतां गांव सोडून गेलेल्यांची एक नवी संघटना तयार झाली. वर्षांतून एकदां रविवारीं, गांवाबाहेर राहणारे लोक गांवीं परत येतात. गेल्या समारंभाला शंभराचे वर लोक आले होते.

ह्याच एकीच्या भावनेचा प्रत्यय टेलिफोन कंपनीला आला. एकाच केंद्रांतून सर्व टेलिफोन कनेक्शन्स मिळावींत हा गांवकऱ्यांचा आग्रह त्यांना मानावा लागला. गांवची मतदान पेटी सोयीच्या दृष्टीनें हलवायचा निर्णय जेव्हां कमिशनरनें घेतला तेव्हां गांवकऱ्यांनीं कमिशनरला भर दुपारीं गांवीं आणलें, गांवची एकी प्रत्यक्ष दाखवली. सगळं पाहून झाल्यावर कमिशनरनें सांगितलें, " तुमची मत पेटी इथेंच राहूं द्या. "

अर्थात् अशा वेगानें प्रगति होत असतांना कांहींचा विरोधहि झाला.

' टिन टॉप'च्या एकीमुळें इतर गांवांपेक्षां तिथें तिप्पट कामें होतात असं सरकारी अधिकारी म्हणूं लागले. आतां शेजारचीं गांवें ' टिन टॉप'चा सल्ला घेऊं लागलीं आहेत. एका गांवची शाळा जळून खाक झाली तेव्हां 'टिन टॉप'नें शाळा बांधण्यासाठीं एकोणीसशें डॉलर्सची आपली सरकारी ग्रँट त्या गांवाला देऊन टाकली.

निरोप घेतांना मात्र गांवच्या कोठीला कुलूप लावलेलें नसतें ह्याचें आम्हांला आश्चर्य वाटलें नाहीं. समाज मंदिराशींच आम्हीं गांवकऱ्यांचा निरोप घेतला.

'टिन टॉप'च्या आजच्या जिवंतपणाचें रहस्य एकच आहे. गांवांतलीं तेहतीस कुटुंबें एकत्र आलीं नि एकीचें एक नवें जीवन त्यांना सांपडलें.

# ४

# शांततेचा एक निश्चित मार्ग

[ साऱ्या जगांतलीं माणसं सारखींच असतात हें आपण पुष्कळदां विसरतों. एका अमेरिकन खेडयानें ह्याचा विसर पडूं न देतां एका फ्रेंच खेडयाची सुधारणा करायचं ठरवलं नि त्या खेडयाला 'दत्तक घेतलं,' – हवं तर त्याच्याशीं लग्न लावलं म्हणा. ह्या लग्नाची ही हकिकत वाचा. ]

अमेरिकेंत कॅन्झस राज्यांत असलेल्या अडीचशें वस्तीच्या मॉर्गाविल गांवानें, १९४८ सालीं फ्रान्समधील फीव्ज-गांवाशीं केलेल्या 'विवाहा'ची ही गोष्ट आहे.

दोन्ही गांवांना नवजीवन देणाऱ्या ह्या 'विवाहा'ची कथा मीं न्यूयॉर्कमधील एका कचेरींत प्रथम ऐकली. ह्या कचेरींत लेफ टॉड काम करीत होता. युद्धांत नष्ट झालेल्या युरोपमधील गांवांना अमेरिकन गांवांनीं मदत करावी ही त्याचीच कल्पना आज प्रत्यक्षांत येत होती.

लढाई संपल्यावर फ्रान्समधून टॉड परत आला. अमेरिकेनें युद्धानंतर फ्रान्सला मदत केली नि त्या कार्यांत टॉड काम करूं लागला. एकदां तो प्रचार करीत असतां न्यूयॉर्क भागांतल्या डंकर्क गांवीं फ्रान्समधील डंकर्क ह्या मासेमाऱ्यांच्या गांवाची युद्धांत कशी वाताहत झाली तें त्यानें सांगितलें. स्थानिक वृत्तपत्राच्या संपादकानें तें मनावर घेतलें नि डंकर्कला मदत करण्यासंबंधीं एक जाहीर विनंति-पत्रक प्रसिद्ध केलें. समित्या स्थापन झाल्या नि मदत गोळा करायला सुरुवात झाली. १९४७ मध्यें शेतीचीं अवजारें,

कपडे, अन्न इत्यादि सुमारें एक लाख डॉलर्स किंमतीचा माल घेऊन मोटरी निघाल्या. डंकर्कला ही मदत जाणार होती. गांवांतून निघालेली ही मोटरींची रांग १ मैल लांबीची होती.

ही 'डंकर्क कल्पना' खूपच 'संसर्गजन्य' ठरली. टॉडनें नि त्याच्या कांहीं मित्रांनीं 'ऑपरेशन डेमॉक्रसी लि.' नांवाची संघटना अशीं 'लग्नें' जमविण्यासाठीं काढली. कांहीं काळांतच अशीं दोनशें 'जोडपीं' निरनिराळ्या राष्ट्रांशीं संबंध जोडून मदत करूं लागलीं. पण अमेरिका जशी इतर राष्ट्रांना मदत करीत असे तशीच हॉलंडमधल्या बॉकॉलो गांवानेंहि तुफानांत नष्ट झालेल्या अमेरिकेंतील वॉरेन गांवाला मदत केली. वॉरेननें जेव्हां नवें सभागृह बांधलें तेव्हां त्याला लागणारें सारें फर्निचर बॉकॉलो गांवानें तयार करून पाठविलें.

टॉड म्हणाला, "ह्या छोट्या मदत योजनेंत मॉर्गविल–फीव्ज योजना मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. वेल्मा कारसनला तुम्ही विचारा."

मॅनहाटन येथें मी वेल्माला भेटलों. वेल्मा बांध्यानें चांगली उंच, शेलाटी आहे. "तुमची माहिती घ्यायला मी खूप लांबून आलोंय्" असें मी तिला म्हणालों तेव्हां तिनें सांगितलें कीं–"आम्हीहि आवडीनें ही गोष्ट सांगत असतों."

उपाहारगृहांत गेल्यावर आपल्या गांवच्या पूर्वजांची गोष्ट सांगण्यांत वेल्मा एवढी रंगली कीं ती खायचेंसुद्धां विसरली.

सारा इतिहास ती अतिशय काव्यमय भाषेंत सांगत होती. आपली कथा सांगतां सांगतां ती म्हणाली, "पहिल्या महायुद्धांत भाग घ्यायला आम्ही तयार नव्हतों. दुसऱ्या महायुद्धांत मात्र जगाच्या पाठीवर प्रत्येक आघाडीवरल्या धुमश्चक्रींत मार्गविलचा कोणीना कोणी होताच. आमचीं चार माणसें कामाला आलीं."

रात्रीं आम्ही वेल्माच्या गांवीं गेलों. मीं विचारलें, "तुला ही कल्पना कशी सुचली?"

" मला वाटतं नक्की कुणालाच आठवत नाहीं." तिनें सांगितलें, "पण आमचे एक पाद्री आम्हाला कॅन्झसबाहेरच्या जगाचाहि विचार करायला लावायचे. शिवाय कॅन्झसमध्येंहि ' युनेस्को ' बद्दल बोलून आमची उत्सुकता वाढविणारे लोक होतेच."

" पुढें ? "

" मी एकदां ' युनेस्को ' च्या सभेला गेलें. मला वाटतं १९४७ च्या डिसेंबरमध्यें आम्हांला फार उत्सुकता वाटत होती. सगळ्या पंथाचे आणि सगळ्या व्यवसायाचे लोक तिथें जमले होते. साऱ्यांच्या डोळ्यांसमोर एकच उद्दिष्ट होतें—शांतता. मला भविष्याबद्दल इतकी आशा होती कीं रस्त्यांत मला कुडबुड्या ज्योतिष्याप्रमाणें भविष्य सांगणारी एक मुलगी भेटली तेव्हां मी तिचा हात धरून तिला एका उपाहारगृहांत नेलं आणि म्हणालें, ' तुम्ही भटके लोक हात पाहून दुसऱ्याचं भविष्य सांगतां, पण आज मी तुझं भविष्य सांगतें.' मीं तिचं भविष्य खरंच सांगून टाकलं. मी म्हणालें, ' तुझा प्रेमभंग झाला आहे. पण तूं नव्या अमेरिकेंत खूप भटकशील. तुला सगळ्या वर्णांचे मित्र भेटतील. पण एक लक्षांत ठेव. तुझ्या हृदयांतल्या प्रेमळपणांतच तुझं खरं भविष्य आहे.' मी तिच्या हातावर पन्नास सेंट्स ठेवले तेव्हां तिच्या डोळ्यांत पाणी आलं.

" १९४८ च्या हिंवाळ्यांत दुसऱ्या एका सभेला गेलों असतां आम्ही गांवागांवांची जोडी जमवण्याबद्दलची कल्पना ऐकली. एका गांवानें तर कांहींचा रोष पत्करून एक जर्मन गांवच स्वीकारलं. आमच्याहि मनांत प्रश्न उभा राहिला—आम्ही एकादं गांव कां स्वीकारूं नये ?

" पूर्वी आम्हीं पत्रमित्रांचा प्रयोग करून पाहिला तेव्हां मित्र सांपडत नाहींत म्हणून आमचीं पत्रें परत येत. आम्ही पैसा नि कपडे चीनला पाठवले पण त्याचं काय झालं तें आम्हांला कळलं नाहीं. आमच्यांत धार्मिक भावना दांडगी होती पण प्रत्यक्ष कांहींतरी केल्याशिवाय त्या भावनेला अर्थ आहे असं आम्हांला वाटेना. मग आम्हीं एक समिति नेमली."

बोलतां बोलतां आम्ही सुमारें सत्तर घरांच्या एका छोट्या वसाहतीजवळ येऊन पोंचलों. हेंच मॉर्गनविल गांव. गांवच्या रस्त्याच्या टोंकालाच्च कारसनचें घर होतें. "आमच्याबद्दल तुम्हांला लिहायचंय् ना ? मग आम्ही कसे राहतों तें तुम्ही बघावं असं मला वाटतं." वेल्मा मला म्हणाली, वेल्माचें शिक्षण कॅन्झस स्टेट कॉलेजमध्यें झालें असून घरीं येण्यापूर्वी ती एका जाहिरात कंपनींत काम करीत होती.

सकाळीं न्याहारीपूर्वी मी गांवच्या रस्त्यावरून फिरून आलों. पोस्ट ऑफिस, दुकानें, उपाहारगृह ह्यांच्याचबरोबर 'क्रीडाभवन' अशी पाटी माझ्या नजरेस पडली. ह्या छोट्या इमारतीला लागून लोकांना बसण्यासाठीं सिमेंटच्या पायऱ्या बांधलेल्या होत्या.

न्याहारीचे वेळीं वेल्मानें समितीतर्फे टॉडला लिहिलेलें पत्र मला दाखविलें. पत्रांत तिनें लिहिलें होतें—"आम्हांला एक परराष्ट्रीय गांव हवें आहे. तें आम्ही आमचें म्हणून समजूं. हा निर्णय गांवचें व्यापारी—मंडळ, चर्च, शाळा, महिला—मंडळ, शेतकी—मंडळ, युवक—सभा ह्या सर्वांच्या संमतीनें घेतला आहे." आमचे लोक उत्तम शेतकरी आहेत नि त्यांना प्रासिद्धि मिळविण्यापेक्षां चांगले शेतकरी होणें अधिक आवडतें. तेव्हां आमची गरज ज्याला असेल, असें एक गांव आमच्यासाठीं शोधून काढा."

टॉडकडून गांवांची यादी आली. मग सगळ्यांनीं एकत्र येऊन ती यादी पाहिली. त्यांना प्रथम कम्युनिस्ट गांव हवें होतें. पण कम्युनिस्ट गांव मिळणें शक्य नाहीं, हें लक्षांत आल्यावर हॉलंड, जर्मनी, फ्रान्स आणि इटलीमधील गांवांची यादी विचारांत घेण्यांत आली. मग दोन दिवसांसाठीं बैठक तहकूब करून सर्वजण विचार करूं लागले.

दुसरी बैठक भरली तेव्हां कोणाला इटालियन गांव हवें होतें. कोणी जर्मन गांवाच्या विरुद्ध होते. फीव्जला अनुकूल असणारानें सांगितलें, "गांव आमच्या गांवाएवढेंच आहे. आमच्याच सैनिकांच्या हातून—हेतुपुरस्सर नव्हे—गांव नष्ट झालें. आम्हांला त्यांची मैत्री हवी आहे.

" फीवूजची वस्ती युद्धापूर्वी ३२५ होती. तीनदां लोकांना गांव सोडून जावें लागलें. जेव्हां गांवकरी गांवांत आले, तेव्हां ७५ टक्के गांव नष्ट झालें होतें. कुणाला राहायला जागा, कपडे, अंथरूण-पांघरूण नव्हतें. मुलांना दूध मिळेना. गुरें नाहींशीं झालेलीं."

वेल्मा म्हणाली, " आम्हीं खूप विचार केला. एकदां एक गांव निवडल्यावर इतर गांवांकडे आमचें लक्ष जाणार नव्हतें. पुन्हा बैठक भरली तेव्हां गांवांचीं नांवें लिहून त्यावर मतें घेण्यांत आलीं. फीव्‌जला सर्वांत अधिक मतें मिळालीं आणि फीवूज आमचें झालें."

० ० ०

ह्या निर्णयाची बातमी गांवच्या ' ट्रिब्यून ' साप्ताहिकांत प्रसिद्ध झाली. अग्नेस हफ ह्या पत्राची संपादिका, मालकीण, लेखिका, कंपॉझिटर, मुद्रक आणि व्यवस्थापिका आहे. तिचा नवरा वारल्यापासून ती एकटी हें सर्व काम करते व पत्र प्रसिद्ध करते. चार पानांच्या ह्या साप्ताहिकाला गांव ' जिवंत साप्ताहिक ' म्हणतें असें तिनें अभिमानानें सांगितलें.

' ट्रिब्यून ' नें नुसती ह्या बैठकीचीच बातमी छापली असं नाहीं तर गांवच्या लोकांनीं फीव्‌जच्या लोकांना पाठविलेलीं पत्रें नि त्यांचीं आलेलीं उत्तरेंसुद्धां छापलीं.

महासागरापलीकडे असलेल्या ह्या गांवच्या नव्या संबंधाबद्दल वेल्मानें आपल्या रोजनिशींत लिहिलें होतें-'सागरापलीकडे असलेल्या ह्या गांवाला आम्ही 'भेटणार' आहोंत. आमची ही अनपेक्षित भेट आमच्या कुटुंबाच्या परंपरेला साजेल अशीच आहे. स्प्रिंगफील्ड येथें माझ्या आजोबांनीं एकदां एका अप्रसिद्ध वकिलाशीं कांहीं मिनिटें गप्पा मारल्या. ते परत आले नि साऱ्या कुटुंबियांना एकत्र करून त्यांनीं आपण एका थोर माणसाला भेटलों असल्याचें सांगितलें. त्या वेळचा हा गृहस्थ पुढें अमेरिकेचा अध्यक्ष झाला. त्याचं नांव अब्राहाम लिंकन.'

ती पुढें लिहिते—'जगांतले इतर लोक कष्ट सोशीत असतां अमेरिकेंतले लोक नाचगाण्यांत दंग आहेत असं ह्या गांवच्या लोकांना वाटतां कामा नये. आपण त्यांना जी भाकरी पाठवूं ती प्रेमानें पाठवली पाहिजे. त्यांनीं आमची भावना लक्षांत घ्यावी, आमच्या मर्यादा लक्षांत घ्याव्यात. आमच्याजवळ आहे तेंच आम्ही देऊं शकतों हें लक्षांत घ्यावें.'

ह्या मर्यादांचें स्वरूप लवकरच त्यांच्या लक्षांत आलें. "आम्ही प्रॉटेस्टंट आहोंत. फीव्ज कॅथॉलिक गांव आहे नि त्यांचा धंदा तर दारू तयार करण्याचा आहे."—कांहींनीं हरकत घेतली.

पण अशा हरकतींनीं समितीला जो धक्का बसला त्यापेक्षां निराळ्या प्रकारचा पण अधिक मोठा धक्का पुढें बसणार होता. समितीचा खजिनदार डॅन रोनिक ह्यानें अशी बातमी आणली कीं फीव्जच्या साठ मुलांना प्यायला दूध मुळींच मिळत नाहीं. ह्या बातमीनें सारी हरकत नाहींशी झाली.

"फीव्जच्या मुलांना दूध पाठवायचं म्हणजे पैसा हवा होता." वेल्मा सांगूं लागली. "आम्ही तसे चिक्कू लोक आहोंत. आमच्या घरांत आम्ही कोंबड्यांना नि डुकरांना दूध घालतों पण फ्रान्समधल्या मुलांना दूध पाठवायला पैसेच हवे होते. इतक्या अंतरावरच्या मुलांना दूध विकत घेऊन द्यायला शंभर डॉलर्स जमवणं हें सुद्धां आम्हाला नवीनच होतं."

वेल्मा आणि गांवच्या इतर महिला एकत्र आल्या नि पैसे कसे जमवायचे त्याची चर्चा त्यांनीं केली. अनेक कल्पना विचारांत घेऊन शेवटीं करमणुकीचे कार्यक्रम करून पैसे जमा करायचें ठरलें. वेल्माच्या आईनें अशी सूचना केली कीं ह्या कार्यक्रमांत आमच्या मॉर्गनविल गांवाचा सुरुवातीपासून तों फीव्जच्या संबंधापर्यंतचा इतिहास यावा व ह्या कार्यक्रमाला 'एक विश्व—शांततोत्सव' म्हणावें. सर्वांना ती कल्पना पसंत पडली. वेल्मा कारसन कार्यक्रमाचे संवाद लिहूं लागली. वेल्मा यंग संगीत दिग्दर्शिका म्हणून काम करूं लागली. पोषाखांची जमवाजमव करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली. स्पॅनिश, मेक्सिकन, चिनी, रशियन अनेक देशांच्या पोषाखपद्धति दाखवणारे कपडे जमले. ते कुणाला नीट होतात तें पाहण्यांत आलें.

गांवांत उत्साह ओतप्रोत भरला. तीस लोक ह्या कार्यक्रमांत भाग घेतील असा मूळ अंदाज होता पण आयत्यावेळीं दीडशे लोकांनीं भाग घेतला. ही सर्व हकिकत लेफ टॉडला पत्रानें कळविण्यांत आली. त्या पत्रांत त्याला एक शंकाहि विचारण्यांत आली, " हे फ्रेंच लोक आमचा गैरफायदा घेत नसतील कशावरून ? "

गांव स्थापन झाल्यावर जन्माला आलेलें पहिलें मूलहि ह्या कार्यक्रमांत भाग घेणार होतें—ह्या ' मुलाचें ' वय आज पंचाहत्तर वर्षांचें होतें.

२७ ऑगस्ट १९४८ रोजीं कॅन्झसमधले तीन हजार स्त्रीपुरुष कार्यक्रमासाठीं जमले. फ्रेंच गांवाला ' दत्तक ' घेणाऱ्या अमेरिकेंतील सर्वांत लहान गांवावर जणु त्यांनीं स्वारी केली होती.

गांवचा रस्ता रहदारीला बंद करून सर्व राष्ट्रांच्या झेंडयांनीं सुशोभित केला होता. घरांतल्या चिंध्या रंगवून स्त्रियांनीं हे झेंडे तयार केले होते. फीव्ज्ची माहिती देणारा फलक गांवच्या मध्यावर टांगण्यांत आला होता. निरनिराळ्या प्रकारचें चाळीस गॅलन आइस्क्रीम तयार केलें होतें. चारशें लोकांना पुरेल एवढें कोंबडीचें जेवणहि तयार केलें गेलें. आलेले लोक फीव्ज्साठीं एका पेटींत चांगलीं पायताणें, कपडे टाकीत. अधून मधून रस्त्यावर लोक नृत्य करीत. दहा सेंट्स घेऊन लहान मुलांना घोडयावर बसूं देण्यांत येई. त्या घोडयाला त्या दिवशीं मुद्दाम फ्रेंच नांव दिलें होतें. गरज ओळखून कीं काय, त्यानें त्या रात्रीं आठ डॉलर मिळविले.

हायस्कूलच्या बँडच्या संगीताचे सलामींत अमेरिकन आणि फ्रेंच ध्वज फडकावण्यांत आले व दोन्ही राष्ट्रांचीं राष्ट्रगीतें वाजविण्यांत आलीं. मुख्य कार्यक्रमांत दीडशें गांवकऱ्यांनीं भाग घेतला.

सर्वांना कार्यक्रम फार आवडला. आजूबाजूचे लोकहि आले होते. वेल्मा कारसनच्या संघटनाचातुर्याची सर्वांनीं स्तुति केली. वेल्मा यंगच्या मतें प्रवेशमूल्य न ठेवल्यामुळें अधिक चांगलें झालें. ' तुम्हांला काय हवं तें त्या

— ५ —

दुधाच्या रिकाम्या भांड्यांत टाका' असं जमलेल्या प्रेक्षकांना सांगण्यांत आलं. एक हजार डॉलर्सच्या वर रक्कम जमा झाली.

होमर खिश्चनसन नांवाचा मनुष्य पूर्वीं वाद्य वाजवीत असे पण आजारामुळें त्याला पोंक आलें होतें. वाद्य वाजविणें सोडून तो लाह्या फुलवून विकायचा. त्या आजारी माणसानें आपली त्या रात्रींची आठ डॉलर्सची सर्व कमाई वेल्मा कारसनला फीव्ह्जच्या पोरांना खाऊ विकत घेण्यासाठीं देऊन सांगितलें—" जगांत एकमेकांचा द्वेष करण्याऐवजीं एकमेकांवर प्रेम केलं तर किती बरं होईल!"

सर्वांनींच महत्त्वाचीं कामें केलीं. पण कांहीं कुरकुरले देखील. कांहींना वाटलें आमच्याच अडचणी आम्हांला दूर करतां येत नाहींत तर परक्या गांवाच्या भानगडींत पडा कशाला? कांहींना वाटलं ह्या संधीचा फायदा घेऊन कांहीं लोक आपलं महत्त्व वाढवून घेत आहेत. " पण आम्हीं आमचें काम चालूच ठेवलें."— वेल्मा म्हणाली.

फ्रान्सशीं संबंध जोडणारें 'सेतु-बन्धन' उभारण्यासाठीं कॅन्झसला हजार डॉलरांचा खूप उपयोग झाला. रोनिकच्या बायकोनें फीव्ह्जच्या मुलांना सहा महिन्यांसाठीं किती दूध लागेल त्याचा हिशेब काढला. एलीन आणि जेनेट कोलफील्ड घरोघर फिरून लहान मुलांचे कपडे गोळा करूं लागल्या. जमलेले कपडे कारसनच्या घरीं एकत्र करून ते चांगले दुरुस्त करण्यांत आले. एकादे वेळीं कोणीतरी येऊन आपला जुना कपडा पाही नि म्हणे, " च् च् अजून कांहीं दिवस टिकला असता."

कपड्यांनीं भरलेल्या पेट्या नि दुधाच्या पावडरीचीं पिंपें जेव्हां फ्रान्सच्या रस्त्यावर निघालीं तेव्हां निरोप देण्यासाठीं स्टेशनवर लोक जमले होते. गाडीच्या गार्डाला त्यांनीं सांगितलें, " ह्या भेटीचा विमा उतरला आहे हं. किम्मत—लोकशाहीची इभ्रत." ह्या भेटी घेऊन तेवीस ऑक्टोबरला न्यूयॉर्कहून फ्रान्सला जाणारी बोट सुटली.

फीवृज्चा संबंध लेफ टॉडच्या भेटीनंतर अधिक जवळचा वाटूं लागला. अमेरिकन गांवांनीं ' दत्तक ' घेतलेल्या परराष्ट्रीय गांवाना भेट देण्यासाठींच टॉड गेला होता. त्यानें आपल्या भेटीचें वर्णन लिहिलेलें आहे. तो म्हणतो, " टेकडीच्या एका बाजूला फीव्ज् बसलेले असून, गांवांत एक लांबच लांब रस्ता आहे. मी गांवांत गेलों तेव्हां साऱ्या गांवांत शुकशुकाट झाल्यासारखें दिसलें. पण शाळेच्या छोट्या इमारतींबाहेर बऱ्याच सायकली दिसल्या. बरेच लोक माझी वाट पाहात उभे होते. शाळेंत अमेरिकन व फ्रेंच ध्वज लावण्यांत आले होते व एका मोठ्या फलकावर लिहिलें होतें, " मॉर्गनाविलचा जय असो. " गांवच्या नगराध्यक्षांनीं माझें स्वागत करून माझा परिचय करून दिल्यावर मुलांनीं स्वागतपर गीत म्हणून दाखविलें. त्या प्रेमानें केलेल्या स्वागतामुळें माझें मन भरून आलें. रडं आवरणं मला कठीण झालं. मी मान वळवून दुसरीकडे पाहूं लागलों. आपल्या प्रेमाच्या भेटीचे निदर्शक म्हणून मी थोडा तांदूळ, साबण आणि मुलांना गोळ्यांचा डबा दिला.

" गांवांत मातीचा सुवास दरवळंत होता. गुरांचा नि घोड्यांचाहि वास वातावरणांत भरून राहिला होता. मला घरची आठवण झाली. आम्ही एका मोठ्या शेतावर गेलों. तिथल्या गोठ्याची पार नासधूस झाली होती. गवताचा नि मातीचा ढिगारा पडला होता. पाण्याच्या ओहोळाचे दगड उखडून पडले होते. घराची पडझड झाली होती नि स्वयंपाकघरांत भिंतीवर टांगलेलीं स्वयंपाकाचीं भांडीं तेवढीं दिसत होतीं. चर्चहि पडलेलें होतें. चर्चखालीं दारू सांठवून ठेवायचें कोठार होतें. लढाईच्या दिवसांत जर्मनांनीं बहुतेक दारू पळविली. उरलेल्याची चव आम्हीं घेतली. लढाईच्या दिवसांत इथें माणसं लपायचीं, पण जर्मनांनीं पुष्कळांना ओढून बाहेर काढलें आणि चर्चसमोर त्यांना गोळ्या घातल्या."

तो पुढें लिहितो, " तुम्ही साधीं सुधीं माणसं आहांत अशी आतां येथील लोकांची खात्री पटली. पूर्वी सर्वच अमेरिकन लक्षाधीश असतात असं त्यांना वाटायचं. "

मॉर्गनविल मधल्या समित्या काम करीत होत्या. बींबियाणें समितीनें चाळीस प्रकारचें बीं पाठविलें. साखर, हवाबंद डब्यांतलें मांस खवा, डब्यांत भरलेलें धान्यहि पाठविण्यांत आलें.

फीव्ज़्च्या पाद्यानें लिहून कळविलें कीं "तुम्हीं पाठविलेल्या पेट्या पोंचल्यावर आम्हीं सगळ्यांना एकत्र बोलावलें. सर्वांना अतिशय आनंद झाला होता." १९४९ सालीं नंतरच्या देणग्या वांटण्यांत आल्या तेव्हां प्रत्येक कुटुंबाला आठशें ते हजार फ्रँक किंमतीची साखर, आणि इतर अन्न पदार्थ मिळाले. शाळेसाठीं पाठविलेल्या खास भेटींत पेन्सिली, रबर, रंगीत पेन्सिली होत्या. "मुलांना हें सामान कधींच मिळालं नव्हतं." मेयरनें कळविलें, "आणि तुम्हीं सहजगत्या हें पाठविलें, त्याचा देखावा केला नाहीं."

फीव्ज़्च्या नागरिकांनीं पाठविलेल्या पत्रामुळें मॉर्गनविलच्या नागरिकांनाहि धन्यता वाटली.

* * *

१९४९ च्या उन्हाळ्यांत मॉर्गनविलच्या लोकांना वाटलें—"आपण जी मदत पाठवतों ती एकमार्गी तर ठरत नाहीं?"

फ्रान्सच्या लोकांनीं लिहिलें होतें—"आतां आमचे बगीचे फुलले आहेत. गुरं परत आलीं आहेत. मुलं गुटगुटीत झालीं आहेत. सरकारी मदत मिळूं लागली आहे. पण आम्हांला तुमची आठवण राहील असं कांहीं पाठवाल का?"

एका शनिवारीं एक अमेरिकन मेकॅनिक नि त्याची बायको फीव्ज़्ला पोंचलीं. त्याची बायको मॉर्गनविलची राहणारी होती. त्यांचं दांडगं स्वागत झालं. आठवण राहील अशी भेट कशाला?—खुद्द मॉर्गनविलची नागरिकच त्यांना भेटायला आली होती. सर्वांनीं त्यांचेशीं हस्तांदोलन केलें. मॉर्गनविलचे प्रतिनिधि म्हणून त्यांचें स्वागत झालें.

हें जोडपें रात्रीं मेयरकडे जेवायला गेलें होतें. मेयरनें सांगितलें, " आम्ही दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें, माणूस सुखी होऊं शकतो ह्यावरचा आमचा विश्वासच उडाला होता. तुमच्या भेटीनें केवढा फरक घडवून आणला ! मॉर्गनविल व फीवृज् ह्यांना कांहीं निव्वळ भेटींच्या वस्तूंनीं एकत्र आणलें नाहीं. "

मॉर्गनविलचा शेतकरी ऑगस्ट कोलिंग ह्याला फीवृज्ला मदत पाठविणें कांहीं पसंत नव्हतें. त्याला वाटे, आमच्याच अडचणी भरपूर आहेत. " युरोपला कांहीं प्रवासी मंडळी जाणार असल्याची जाहिरात मीं वाचली. " त्यानें मला सांगितलें, " मी फ्रान्सला गेलों आणि तिथें एकटाच टॅक्सी करून फीवृज्ला पोंचलों. माझ्याशीं बोलायला त्यांनीं गांवच्या शेतकऱ्यांना बोलावलें व मोठी मेजवानी दिली. जेवण आणि गप्पा झाल्यावर मि. बॉनेट ह्यांचें शेत पाहायला आम्ही गेलों. त्यांचेजवळ एक ट्रॅक्टर होता पण त्याला पट्टे नव्हते. मीं पट्टे घेऊन द्यायचं कबूल केल्यावर ते म्हणाले, " मीं पट्टे मागवले आहेत पण माझ्या सरकारनें मला सांगितलें कीं, अमेरिकेंतून आपण एवढा माल घेतला आहे कीं, आपल्याला डॉलर्सचा भयंकर तुटवडा पडेल. " आतां परत आल्यापासून माझें मत बदललें आहे. आपण फ्रान्सकडून जास्त माल खरेदी करायला पाहिजे असं मी सांगायला लागलों आहें. "

कॅन्झसच्या विद्यापीठांत एक फ्रेंच चित्रकार शिकत होता. कॅन्झसच्या जीवनाचीं प्रातिनिधिक चित्रें त्यानें तयार करून दिलीं व भेट म्हणून तीं फीवृज्ला पाठविण्यांत आलीं.

फीवृज्ला चित्रें पोंचतांच मेयरनें सभा बोलाविली. " आपण अमेरिकनांना काय भेट पाठवायची ? " त्यांनीं विचारलें.

एका स्वयंपाकघरांत एक पुरुष बायबल वाचीत आहे, त्याची बायको त्याच्याजवळ पेंगते आहे नि सर्वत्र स्वयंपाकाचीं भांडीं टांगलीं आहेत असें दृश्य असलेलें लाकडी कोरीव काम त्यांनीं मॉर्गनविलला पाठविलें.

१९५० सालीं मॉर्गनविलचा कार्यक्रम ध्वनिमुद्रित करून फ्रेंच भाषेंतून फीव्‌ज्‌च्या लोकांना ऐकवला. हिंवाळ्यांत फीव्‌ज्‌नें मॉर्गनविल दिन साजरा केला. मॉर्गनविलच्या जनतेचें आभार मानणारीं आणि जनरल पॅटनच्या सैन्यानें फ्रान्सला स्वतंत्र करतांना मारलेल्या मुसंडीचें स्मरण देणारीं भाषणें ध्वनिमुद्रित करण्यांत आलीं.

त्यानंतर दर नाताळांत भेटी पाठवल्या जात. नंतर दोन गांवांत अधिक जास्त प्रमाणांत ये जा सुरू झाली.

ह्या सर्वांचा परिणाम काय?

एड श्वेब म्हणाला, "कार्यक्रमासाठीं भोंवतालच्या वीस मैलांतलीं माणसें एकत्र आलीं. पूर्वीं आमच्या ओळखी सुद्धां झाल्या नसत्या. एका फ्रेंच गांवाबरोबरच आमच्याहि गांवाला ही मदतच झाली." मिसेस ओएटिंगरचें मत: "अशा प्रकारच्या स्नेहांतून विश्वशांतीच्या दिशेनें केवढें तरी कार्य होण्यासारखें आहे." लू ॲलन : "दुसऱ्यासाठीं कांहीं करावं असं मनापासून वाटायला लागलं कीं ती भावना मनांत चांगली रुजते व मग तो एक प्रकारचा धर्मच होतो."

"ह्या यशाचें रहस्य काय?" धर्मोपदेशक जो बकल्सना मीं प्रश्न विचारला.

"प्रत्येकजण व्यक्तिशः आपलेपणानें वागत होता." त्यांनीं उत्तर दिलें, "आम्ही कांहीं सबंध युरोपसाठीं मदत पाठवीत नव्हतों. तर आम्हीं व्यक्तिशः पाहिलेल्या लोकांसाठीं हें करीत होतों. नवें जग निर्माण करायला असा व्यक्तिगत मार्गच खरा उपयोगी पडेल."

"ह्याचा जनतेवर काय परिणाम झाला?"

"आमचा दृष्टिकोन त्यामुळें बदलला. उदाहरणार्थ, आम्ही प्रॉटेस्टंट आहोंत नि कॅथॉलिकांना मदत करीत आहोंत. त्यामुळें धर्मांतील भिन्न-पंथीयांकडे पाहण्याची आमची दृष्टि बदलली. आमचा धर्म एक असूनहि फक्त भेदांवर भर दिल्याचें आमच्या लक्षांत आलें. आतां आम्ही अधिक

उदारपणें पाहूं लागलों. ह्या वर्षीं आम्हीं एका कॅथॉलिक शिक्षिकेला शाळेंत नोकरी दिली. ”

“ वांशिक भेदावरहि ह्याचा परिणाम झाला. एक दिवस न्यूयॉर्ककडून एक निग्रो ड्रायव्हर आला. डॅन रोनिकनें त्याचा चेक वटवून दिला. तो उपाहारगृहांत गेला व त्यानें मागच्या दारानें जाणें आवश्यक आहे का म्हणून विचारलें. कुठेंतरी पूर्वीं त्याचा अपमान झाला असला पाहिजे. त्यांनीं त्याला बेधडक आंत येऊन बसायला सांगितलें. जायच्या आधीं तो मोकळे-पणानें डॅनशीं बोलला. त्याला दोन पदव्या होत्या असें नंतर आम्हांला कळलें. ”

वेल्माचें ह्या बाबतींतलें मत हें तिला आपल्या गांवकऱ्यांबद्दल वाटणाऱ्या अभिमानाचें प्रतीक होतें. “ आमचा सर्वांत मोठा दोष नाहींसा झाला—तो म्हणजे सर्वच छोट्या गांवांना मिळालेला न्यूनगंडाचा शाप. आतां आमचीं मुलें जें गाणें म्हणतात त्याचा अर्थसुद्धां जग दिवसेंदिवस लहान होत आहे असाच आहे. न्यूयॉर्क प्रचंड मोठें आहे. पण न्यूयॉर्कनें आमच्यासारखें एकादें गांव थोडेंच दत्तक घेतलें ? आम्हीं मात्र तें केलें. आमचा जगाशीं संबंध आहे. ”

“ आतां इथले लोक एकमेकाशींहि अधिक सहानुभूतीनें वागतात. आमच्या मुलांत परवां एक चिनी मुलगा मिसळून वागत होता, पण कोणी एक शब्दहि बोललें नाहीं. एका मुसलमान विद्यार्थिनीनें तर मेथॉडिस्ट चर्चमध्यें भाषण केलें. ”

“ टॉलींटिंग कुटुंब येथें येणार आहे ना ? ”

“ हो, त्यांना इथें आणण्यासाठीं लागणारे भाड्याचे पैसे आम्ही जमा करीत आहोंत. ”

ट्रिब्यूनच्या कार्यालयांत छापून झालेल्या अंकाचा टाईप सोडवणाऱ्या ॲग्नेस हफला मीं विचारलें “ हें सारें झालें कसें ? ”

" वेल्मामुळें." ती म्हणाली, " दुसऱ्याकडून कामं करून घ्यायची हातोटी तिला चांगली साधली आहे पण स्वतः ती थोडं सुद्धां श्रेय घेत नाहीं. "

त्या रात्रीं नृत्याची तालीम होती. सुमारें शंभर स्त्रीपुरुष नृत्याची तालीम करीत होते. संगीताची लय वाढली व माझ्या नकळत मीहि त्यांच्यांत सामील झालों.

मध्यंतरीं १९५३ सालीं अमेरिकेंत पसरलेल्या संशयाच्या लाटेनें मॉर्गन-विललाहि ग्रासलें. त्या गांवचे लोक म्हणत, फ्रान्सला आम्ही मदत केली हें चुकलें का? पण पुढच्याच वर्षीं संशयाचें हें धुकें नाहींसें होऊं लागलें. फीव्ज़हून येणाऱ्या टॉर्लोटिंग कुटुंबाला मॉर्गनविलला आणण्यासाठीं पुन्हा पैसे जमविण्यांत येत आहेत नि त्यांचें स्वागत करायला गांव सिद्ध झालें आहे.

# ५

# अखेर बांध फुटले

[ वंशभेद ही आपल्या देशांत मोठी अडचण नाहीं पण जातिभेद, धर्मभेद हे अजूनहि आपल्यांत आहेत. समजा हे भेद आपण विसरलों तर ?

—तर किती चांगलें होईल हें एका अमेरिकन गांवाच्या अनुभवानें आपल्याला शिकतां येईल. ही कथा त्या गांवानें केलेल्या प्रयोगावरील आहे. ]

" सीॲटल शहरांतील चिनी आणि जपानी लोकांत मी सर्वांत जास्त परिचित निग्रो होतों. पण गेल्या वीस वर्षांत त्यांचेपैकीं कोणाऱ्याबरोबर मी कपभर कॉफी घेतल्याचेंहि मला आठवत नाहीं." बॉब ग्रोव्ह्ज् १९४० ते ५० च्या दशकांतील पहिल्या कांहीं वर्षांपर्यंतचा आपला अनुभव सांगत होता. ' त्या दिवसांत कोणीहि बाजारांत गेले तरी एकमेकांशीं न बोलतां बाजार करीत आणि परत येत."

निरनिराळ्या वंशाच्या लोकांत किती तीव्र भेदभाव राखला जाई ह्याचें यथार्थ वर्णन ब्रूस रॉवेल ह्या दुसऱ्या निग्रोने केलें. तो म्हणाला, " निग्रो ५ चिनी मुलांत मिसळल्याबद्दल एका जपानी मुलाला त्याच्या बापानें घराबाहेर घालवून दिल्याचें मला माहीत आहे." दुसऱ्या एका जपानी महिलेनें सांगितलें : " मी जेव्हां लहान होतें तेव्हां मला माझ्या आईनें सांगितलें कीं चिनी मोहोल्यांत तूं गेलीस तर याद राख. तिथें लहान मुलींना पकडून सर्कशीला विकण्यासाठीं चापाचे दरवाजे बसविलेले आहेत."

ग्रोव्ह्‌ज् रॉवेल ह्यांनीं ज्या भागाचें हें वर्णन केलें तो भाग पूर्व–पश्चिम एक मैल लांब होता व उत्तर–दक्षिण अर्धा मैल रुंद होता. १९३० सालानंतर मुख्यतः शहरांतील वेश्यांची वस्तीच येथें स्थायिक झाली होती व या भागाला " प्रोफेनिटी हिल " असें नांव देण्यांत आलें होतें.

तिशीच्या नि चाळीसनंतरच्या कांहीं वर्षांत ह्या रस्त्यावरून चालणाराला हा भाग अंधारा वाटे. लहान लहान दुकानें, एक छोटी बँक, एकाददुसरा छोटा कारखाना, रात्रीच्या शोकीन लोकांचे क्लब, जुने पथिकाश्रम. अशा ह्या भागांत बारा हजार लोक एकत्र रहात होते.

अनेक वंशांच्या ह्या वस्तींत पन्नास वर्षांपूर्वी प्रथम चिनी लोक आले आणि त्यांनीं छोटीं उपाहारगृहें, किराणा मालाचीं दुकानें सुरू केलीं, व रेल्वेंत नोकऱ्या धरल्या. पण आपले परंपरागत पंथभेद त्यांनीं सोडले नाहींत. इतरांशीं ते मिसळले नाहींत. चीनवर जपाननें हल्ला केला तेव्हां चिनी लोक इथल्या जपान्यांशीं नुसते फटकूनच वागले नाहींत तर इतरांना आपण चिनी आहोंत हें ओळखूं यावें म्हणून आपल्या दंडावर ' मी चिनी आहें ' असे पट्टेहि त्यांनीं बांधले. लढाई सुरू झाली तेव्हां शहरांत आठ हजार जपानी होते. युद्धकालांत सगळ्यांना अटकेंत ठेवण्यांत आलें. युद्ध संपल्यावर पांच हजार जपानी पुन्हा सीॲटलमध्यें रहायला आले. शिवाय शहरांत दोन हजार फिलिपिनो राहतात. सबंध शहरांत पंधरा हजार निग्रो राहतात. त्यांतले दोन हजार ह्या भागांत आहेत. निग्रोंचे जाझ बँड्स सगळ्या शहरांत लोकप्रिय आहेत. ह्या सर्व भिन्न वंशीयांत एकधर्मीय आणि एक-पंथीय लोक असले तरी ते निरनिराळ्या चर्चमध्यें जात.

पौर्वात्य राष्ट्रीय चिनी व जपानी निग्रोशीं मिसळायला तयार नव्हते—निग्रो इतरांशीं मिसळायला तयार नव्हते.

खुद्द चिनी लोकांतहि पांथिक आणि सामाजिक भेद व उचनीचता फार कांटेकोरपणें पाळलीं जातात. ' उच्चवर्णीय ' चिनी ' कमी प्रतीच्या ' माणसांत मिसळायला तयार नसत. जपान्यांतहि इसि–निसि हे पांथिक भेद होतेच. जुने स्थायिक झालेले निग्रो नव्यानें येणाऱ्या निग्रोंना हातभर दूरच ठेवीत.

ह्या मनोवृत्तीमुळें ह्या भागांत सर्व लोक एकत्र येऊन काम करण्याची शक्यता नव्हती. कोणा एका व्यक्तीला ह्या वस्तीचे प्रश्न सोडवतां आले नसते; व्यक्तीच्या हें शक्तीबाहेर होतें नि चालीरितींत कांटेकोर संस्कार झालेला हा समाज ते भेद विसरायला तयार नव्हता. हे भेद तात्विक असण्यापेक्षां ते संवयीनें अंगवळणीं पडले होते.

* * *

इतर गावांत आपण आतांपर्यंत झालेल्या कार्यांची जी माहिती मिळवली त्यांत कार्याची स्फूर्ति खुद्द गांवांतील जनतेकडून आली होती. येथें तें शक्य नव्हतें. ही स्फूर्ति कोणीतरी बाहेरून आणायला हवी होती.

१९४५ मध्यें इरा रीड नांवाच्या एका सामाजिक कार्यकर्त्याला गाडींत एक निग्रो भेटला. त्याच्या पायांत जोडे नव्हते. आपल्याला गांवांत कुठें राहूं देतील का म्हणून तो चौकशी करूं लागला. त्याचें दैन्य एकाद्या भयाण स्वप्नासारखें इराच्या मनांत घर करून राहिलें. लिन रसेल ह्या सामाजिक कार्यकर्त्यालाहि वर्णभेदाच्या अन्यायामुळें येणारें दैन्य पाहून दुःख होई. तो सीॲटलला आला तेव्हां त्यानेंहि एक प्रश्न विचारला, " ह्या शहरांत निग्रोंना किती वाव आहे ? "

ह्या प्रश्नांतून एका समाजक्रांतीला सुरवात झाली. रसेलच्या प्रश्नानें दिलेलें आव्हान स्वीकारण्यासाठी 'समाज-कार्य मंडळा'नें एक छोटीशी बैठक बोलावली. त्या बैठकींतील कार्यकर्त्यांपैकीं मर्लिन पेननें एका विशिष्ट भागाचें विशेष निरीक्षण करावयाचें ठरविलें. त्या निरीक्षणानंतर असें स्पष्ट झालें कीं योग्य नेत्याच्या अभावीं कार्य होत नाहीं.

तेव्हां सर्व प्रकारचीं सामाजिक कामें करणारांची एक खास समिती नेमण्यांत आली. ह्या समितीनें कित्येक महिने आपल्या कार्यक्षेत्राचा अभ्यास करून ठरविलें कीं सल्ला देणें नि मार्गदर्शन करणें एवढेंच फक्त समिती करूं शकेल; बाकी कामें स्थानिक पुढाऱ्यांनींच केली पाहिजेत. मग प्रश्न असा पडला कीं सामाजिक भेदाचे बांध फोडून स्थानिक पुढारी काम करतील का?

सर्वांना हवासा वाटेल असा एकादा कार्यक्रम हातीं घेतल्यास हें शक्य होतें हें लक्षांत येऊन जानेवारी १९४६ मध्यें स्थानिक पुढाऱ्यांची एक बैठक बोलावण्यांत आली. बैठकींत जी चर्चा झाली त्यांत असें सुचविण्यांत आलें कीं जॅक्सन रस्त्यावरील वस्ती अवघी तीन टक्के असतांना गांवांतील बावीस टक्के क्षयरोगी ह्या भागांतून येतात. तेव्हां क्षयप्रतिबंधक उपचार केंद्र काढलें तर त्याला जनतेचा पाठिंबा नक्की मिळावा. पण हें सर्व पटूनहि स्थानिक पुढाऱ्यांना असें वाटे कीं परक्यांच्याबरोबर आपण काम करूं लागलों तर तें आपल्या लोकांना आवडेल का? त्यांनीं योजना सुरू करण्यास अनुकूल मत दिलें. पण कामें कशीं होतील ह्याबद्दल त्यांना शंकाच होती. मात्र हें काम बाहेरचीं माणसें करूं शकतील असें असल्यानें समाजांतील नेत्यांच्या तुटवड्याचा प्रश्न अडचणीचा नव्हता.

प्रचारास सुरुवात झाली. काम सुरू झालें. पांच दिवसांत ८७८ लोकांची 'क्ष' किरणांनीं तपासणी करण्यांत आली. ह्या तपासणीचे वेळीं पुष्कळांची पहिल्यानेंच एकमेकाशीं ओळख झाली. नवे स्नेही त्यांना आवडूं लागले.

दुसरा प्रश्न उभा राहिला. पुढें काय करणार? 'घाण नाहींशी करून उंदरांचा नाश करायचें काम हातीं घ्यावें', अशी कोणींतरी केलेली सूचना मान्य झाली. स्वच्छतेची गरज पटत होती पण सहकार्य मिळत नव्हतें. शेवटीं एक दिवस चाळीस स्वयंसेवकांनीं सार्वजनिक व खाजगी मालकीच्या मोटर-लॉऱ्या एकत्र केल्या नि पाटी लावली 'घर स्वच्छ करण्यासाठीं आम्हांला बोलवा.' वॉशिंग्टन विद्यापीठांतील समाजशास्त्राचे विद्यार्थी घरोघर जाऊन स्वच्छतेचें महत्त्व पटवून देऊं लागले. ह्याचा परिणाम असा झाला कीं तीस घरांच्या एका भागांतून ८० लॉऱ्या भरून केरकचरा साफ करण्यांत आला.

'क्ष' किरण तपासणी व स्वच्छता मोहीम यशस्वी झाल्यावर स्थानिक समितीला अभिमान वाटूं लागला.

तेव्हां आतां कायम स्वरूपाची संघटना उभी करावी का ह्या प्रश्नाचा विचार करण्यांत आला. एखादा कार्यक्रम यशस्वी करणें हें निराळें आणि

केल्यानें होत आहे रे अनुक्रम क्रमांक ... नों. दि. ... बि. ७७ ... स्थळ

कायम संघटना उभारणें निराळें. शिवाय पूर्वी असें कांहीं झालें नव्हतें. अखेरीस ही जबाबदारी उचलायचें ठरलें. जूनमध्यें संघटना उभी करण्यांत आली, घटना तयार झाली, पदाधिकारी निवडण्यांत आले नि कार्यालयासाठीं जागा घेण्यांत आली. जेराल्ड न्यूमन ह्याची चिटणीस म्हणून नेमणुक झाली.

न्यूमननें बाल आरोग्य केंद्र उघडून कामाला सुरुवात केली. पण पुढें मतभेदामुळें त्यानें राजीनामा दिला. संघटना पुन्हा उघड्यावर पडली. काम होत नसल्यानें कार्यालयाची जागाहि सरकारी अधिकाऱ्यांनीं काढून घेतली. मात्र सुरू केलेलीं कामें चालू ठेवण्यांत आलीं.

रूथ मॅंका हिला चिटणीस नेमण्यांत आल्यावर कामें पुन्हा उत्साहानें होऊं लागलीं. ती अनुभवी होती. लोकांबद्दल तिला प्रेम वाटत होतें. संघटनेच्या पहिल्या वार्षिक बैठकींत फक्त पंचवीस लोक हजर होते. जे हजर होते त्यांनीं, संघटनेचे कार्यकर्ते स्वतःचें महत्त्व वाढवून घेण्यासाठीं आपला उपयोग करून घेत असल्याचें जाहीर केलें.

पण ह्या आरोपाला 'नॉर्थवेस्ट एंटरप्राइज'चे संपादक डॉक् रॉबिन्सन ह्या निग्रो गृहस्थांनीं ताबडतोब उत्तर दिलें, "कोणींहि असा फायदा घेत नाहीं. आपल्याला मिळत असलेल्या मदतीचा जास्तींत जास्त फायदा मात्र आपण घेतला पाहिजे."

ह्या टीकेचा संघटनेला फायदाच झाला. त्यामुळें कामें होऊं लागलीं. पण सभासदांची वृत्ति सर्व कामें चिटणिसावर टाकण्याची होती. पुढच्या बैठकीला फारच थोडे सभासद आले. नेहमीं कामें करणारे स्वयंसेवकीह नाहींसे झाले. कार्यालयाला चांगली जागा द्यायलाहि कोणी तयार होईना. रूथ सुद्धां ह्या परिस्थितींत निराश झाली.

पण काम अधिक चांगलें कसें करतां येईल ह्याचे मार्ग ती शोधूं लागली.

एकदां एका निग्रो शिंप्याशीं ती बोलत असतांना एक गोष्ट तिच्या लक्षांत आली. तो तिच्याशीं सभ्यतेनें बोलत असला तरी मोकळेपणानें बोलत नव्हता. दुसऱ्या दिवशीं एका ओळखीच्या निग्रोला ती घेऊन गेली.

तो आतां तिच्याशीं मोकळेपणानें बोलूं लागला. ह्याचा अर्थ एकच होता. वंशभेदाचे बांध अजून फुटायचे होते. मग तिच्या हेंहि लक्षांत आलें कीं ज्यांच्यासाठीं काम करावयाचें त्यांनीं स्वतः संघटना चालविल्याशिवाय संघटनेचें काम चालू राहाणें कठीण आहे. अजूनहि प्रत्येक स्थानिक कार्यकर्त्या-बरोबर दोन बाहेरचे कार्यकर्ते होते. काय केलं म्हणजे स्थानिक कार्यकर्त्यांचें प्रमाण वाढेल ह्याचा विचार ती करूं लागली.

एक दिवस एक मनुष्य घाईघाईनें कार्यालयांत आला आणि घाईघाईनें सांगूं लागला, " लोकांनीं पायवाटेवर फेंकलेला कचरा उचलून उचलून मी कंटाळलों. कचरा फेंकायला लोकांना बादल्या कां ठेवीत नाहींत ? "

रूथला हेंच हवें होतें. लोक आतां स्वतः विचार करीत होते, मार्ग सुचवीत होते. ती हिंडून फिरून लोकांत ह्या नव्याने तयार झालेल्या प्रवृत्तींना उत्तेजन देऊं लागली.

पौर्वात्यांनीं आजपर्यंत संघटनेच्या कामांत पुढाकार घेतलेला नव्हता. ती उणीव जेन्स मात्सुओका ह्यानें भरून काढली. पूर्वी हा मोंटानांत कामगार म्हणून आला, पण इस्टेट एजन्सी चालविण्याचा परवाना मिळवून तो सीॲटलमध्यें धंदा करूं लागला. संघटनेच्या कामाकडे त्याचें लक्ष जातांच तो पहिल्यानेंच पन्नास लोकांच्या बैठकीपुढें बोलायला उठला. भीतीमुळें त्याच्या तोंडांतून तेव्हां एक शब्दहि बाहेर फुटला नाहीं. पुढें सरावानें तो चांगलें बोलूं लागला. रहदारीचें सिग्नल आणि रस्त्यावर दिवे असणें ह्या दोन कामांवर त्याचा विशेष भर होता. अर्ज, विनंत्या, भाषणें, निधि जमा करणें हीं सर्व करून ७ मार्च १९५० रोजीं त्यानें आपलें उद्दिष्ट साध्य केलें.

चिनी जनतेचें सहकार्य ल्यू के ह्या व्यापार मंडळाच्या सभासदातर्फे मिळविण्यांत आलें. त्यानें चिन हान ह्या दुसऱ्या माणसाची रूथशीं ओळख करून दिली. एक वर्षांत त्याला संघटनेचा अध्यक्ष करण्यांत आलें. प्रत्येक सभासदानें आपआपल्या भागाची सुधारणा करण्याच्या योजना आंखून आणाव्यात असें त्यानें सुचविलें, त्यावरून दीर्घमुदतीच्या योजना तयार करण्यांत आल्या.

बॉब ग्रोव्ह संघटनेचा पदाधिकारी राहायला तयार नसला तरी निग्रो समाजांत आपलें वजन खर्च करून तो कामें करीत असे.

आतां ज्यांच्यासाठीं कामें करावयाचीं त्यांच्यांतूनच नेतृत्व मिळूं लागल होतें. बांध फुटूं लागले होते.

पण अंतर्गत भेदहि बळकट होते. चिनी हॉस्पिटलमध्यें जाण्यास निग्रो भीत असत. जपान्यांचे आपसांतील पंथभेद तीव्र होते व त्यामुळें कोणालाहि त्या समाजाचें प्रतिनिधित्व निर्धास्तपणें करतां येत नसे. एका प्रतिष्ठित निसिपंथीय नागरिकानें रूथला सांगितलें कीं सबंध जपान्यांचेतर्फे काम करणें आपल्याला शक्य नाहीं. त्यानें दुसऱ्या एका माणसाचें नांव सुचविलें. हा गृहस्थ स्वत: 'इसि' होता नि त्यानें 'निसि' मुलीशीं लग्न केलें होतें.

चार वर्षांत संघटनेनें ३७ कामें केलीं. त्यांतून ज्या लोकांना फायदा झाला अशांची संख्या ४०२ वरून १४९८ वर गेली. अंदाजपत्रक ७०९५ डॉलर्सवरून १०,८४४ डॉलर्सवर गेलें. गांवांतील सर्व क्षेत्रांतील सर्व प्रमुख संघटना ह्या संघटनेच्या सभासद झाल्या. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांत चिनी निग्रो होते. रस्त्यावरच्या चिंध्या गोळा करणारा एक आंधळा सभासद झाला. बैठकांना तो नियमितपणें येत असे.

+ + +

१९४७ मध्यें संघटनेनें सर्व जिल्ह्याचें नेतृत्व स्वीकारावें अशी सूचना आली. पैसा उभा करण्याचें कामहि आलें. संघटनेच्या कार्यकर्त्यांनीं २४०० डॉलर्स जमा केले. त्यांना फक्त ८०० डॉलर्स जमा करायला सांगितलें होतें. १९५३ सालीं त्यांनीं ८८०० डॉलर्स जमा केले. एक डॉलर सभासद–वर्गणी देणारे ४५० सभासदहि नोंदविले.

निधि जमा करीत असतां वंशभेद आणखी कमी होत गेले. एका उपाहारगृहाच्या जपानी मालकानें निग्रो कार्यकर्त्याला चहापानाला बोलाविलें. स्त्रियांनीं एकत्र येऊन विचार केला. एकादें 'समाज सहभोजन' केलें तर ! प्रत्येकानें आपलें अन्न आणावें व सर्व अन्न एकत्र करावें व मग सहभोजन करावें.

त्यांनीं शेजाऱ्यांना आमंत्रणें दिलीं. सुमारें २२५ लोक जेवायला येतील अशा अंदाजानें तयारी केली. प्रत्यक्ष जेवणाचे वेळीं जपानी, चिनी, निग्रो व कॉकेशियन स्त्रियांनीं आपलीं प्रादेशिक पक्वान्नें केलीं. आयत्यावेळीं २८५ लोक जेवायला आले. मेयर डेव्हिन ह्यांनीं चर्चेला सुरुवात केली. पंचवीस वर्षांनंतर जॅक्सन स्ट्रीट भाग कसा असावा ह्यावर उत्साहानें चर्चा सुरू झाली.

बुद्ध मंदिरांत झालेल्या १९५० च्या भोजनास ५०० मांणसें आलीं होतीं.

ही नवी एकी स्पष्टपणें सर्वांना दिसावी म्हणून एक ' आंतरराष्ट्रीय उत्सव ' साजरा करायचें ठरलें. त्यासाठीं नेमलेल्या व्यापाऱ्यांच्या समितीनें तीन दिवसांचा कार्यक्रम आंखला. पण प्रत्येकाच्या मनांत एक शंका डोकावत होती. उत्सवास किती लोक जमतील ? तीन दिवसांत जास्तींत जास्त तीस हजार लोक जमतील असा अंदाज काढण्यांत आला. प्रत्यक्षांत पहिल्याच दिवशीं एक लाख लोक जमले. तीन दिवसांत २२५००० माणसें उत्सवाला आलीं.

जीं माणसें फक्त बाजारपेठेंत एकत्र येत होतीं त्यांचीं जीवनें आतां एकत्र आलीं होतीं.

आतां संघटनेची सभासदसंख्या वाढली तशींच कामेंही वाढलीं. क्रीडांगणें, राहण्याचीं घरें, पिण्याचें पाणी शुद्ध करणें अशीं कामें हातीं घेण्यांत आलीं. दरवर्षी उत्तम समाजकार्य करणारास पारितोषिक देण्यांत येऊं लागलें.

आम्ही ग्रोव्हजशीं गप्पा मारीत असतां कोणीतरी म्हणाले "संघटनेच्या कामांत दर आठवड्याला नवे प्रश्न सोडवावे लागतात."

ग्रोव्हूज आम्हांला सांगत होता, " दुसऱ्याला भेटल्यावर आपल्याला आनंद होईल असं आपल्या मनांत कांहीं असतं नि आपल्याला भेटल्यावर त्याला आनंद होईल असं त्याच्या मनांत कांहीं असतं. वीस वर्षांनंतर आम्हांला ह्या आनंदाचा अनुभव येत आहे."

# ६

# कॅरोल मार्ग

प्रेम सर्वांना जिंकूं शकतें. आत्मप्रगतीही करूं शकतें.

अमेरिकेंतल्या एका गांवानें दोन भारतीय शेतकऱ्यांना प्रेमानें बोलावून नेलें नि त्यांना आपल्यांतलें मानलें. अगदीं आपल्या देशाशीं संबंध आलेल्या ह्या गांवच्या कार्याची ही माहिती आहे.

" मला वाटतं, जॉर्जियांतल्या कॅरोल तालुक्यांतले तुम्ही लोक मीं आतांपर्यंत पाहिलेल्या लोकांत सर्वांत चांगले आहांत. तुम्ही एकदिलानें कसें काम करतां तें पाहून मी आश्चर्यानें थक्क झालों. तुमच्या बायबलमध्यें जसं लिहिलेलं आहे तसंच तुम्ही वागतां "–भारतांतील एका जिल्ह्यांतील एका जमीनमालकाचा मुलगा अमरसिंग ह्याच्या तोंडचे हे उद्‌गार आहेत. अमरसिंगचा बाप गांधींचा अनुयायी आहे.

हिटलरच्या जुलमाला बळी पडून निर्वासित झालेल्या टेड हिर्शलाही तसेंच वाटतें. तो म्हणाला, " युरोपांत व आशियांत मी एकंदर तीस देश फिरलों. पण कुठेंच लोकांनीं मला इतकं चांगलं वागवलं नाहीं. " त्यानें विणकामाची गिरणी सुरू केली नि ती चांगली चालली आहे. गेल्या वर्षी त्याला व्यापारी संघटनेचा अध्यक्ष निवडण्यांत आलें. एका निर्वासिताचा एवढा मान करणें हें इथल्या लोकांचं एक वैशिष्ट्य आहे असं सांगून तो म्हणाला, " त्यांच्यांतल्या ह्या वैशिष्ट्यामुळें त्या लोकांचा पराभव करणं अशक्य आहे. "

फक्त छोटे शेतकरी नि छोटे व्यापारी ह्यांच्या ह्या फारशा संपन्न नसलेल्या समाजाची एवढी स्तुति कां होते ? असा आम्हांला प्रश्न पडला.

आम्ही ह्या प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठीं गेलों. ह्या तालुक्याचें क्षेत्रफळ ७५० चौरस मैलांचें आहे. वस्ती ३४,०८४ आहे. ह्या लोकांत आम्ही ह्यापूर्वी सांगितलेल्या सर्व गांवांचीं वैशिष्ट्यें तर आहेतच पण भारतांतून अमरसिंगला आपला पाहुणा म्हणून आणण्यासारखें आणखीहि एक वैशिष्ट्य आहे. ज्या एकीच्या भावनेनें त्यांनीं अमरसिंगला बोलावलें त्याच एकीच्या भावनेनें त्यांनीं आपला शेतीतज्ज्ञ पॉल पॅटन ह्याला भारतांत पाठविलें नि नंतर भारतांतून सेठ कुटुंबाला आणून सहा महिने ठेवून घेतलें.

१८२७ ला ह्या भागांत वसाहतीला सुरुवात झाली तेव्हां असें भवितव्य कांहीं दिसत नव्हतें. नवीन येणारांना घोडे चोरून नेणारांचा बंदोबस्त करण्याचें पहिलें काम करावें लागलें. १९०१ पर्यंत गुंडांचा उपद्रव खूपच होता. इथल्या शेतावर निग्रो गुलाम काम करावयाचे.

पण विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पिस्तुलं फेकून कामाचीं हत्यारं इथल्या लोकांनीं उचललीं. स्वतंत्र वृत्तीच्या ह्या लोकांनीं आपली सर्व शक्ति आतां प्रगतीच्या मार्गाला लावली. ह्या भागांत वर्षांतून कापसाचें एकच पीक निघे. तेव्हां ही ‘एका पिकाची आर्थिक व्यवस्था’ बदलून अधिक पैसा मिळावा म्हणून छोटे उद्योगधंदे, व्यापार आणि खरेदीविक्री सहकारी संस्था सुरू करण्यांत आल्या. रस्ते व जमिनी सुधारायला सुरुवात केली. व्यापारी मंडळ सुरू झालें आणि सरकारनें शेतीचीं नि यांत्रिक कामें शिकवायची शाळा सुरू केली.

१९२२ सालीं कापसाच्या पिकावर कीड पडली व ३५००० गासड्यांचें उत्पन्न ७००० गासड्यांवर आलें. तेव्हां व्यापाऱ्यांनीं चार हजार डॉलर्स जमा केले, अर्सेनिक विष आणि त्याचे फवारे उडवणारी यंत्रसामुग्री जमा केली आणि दर आठवड्याला अर्धा दिवस आपलीं दुकानें बंद करून ते सरकारी तज्ज्ञाबरोबर शेताशेतावर जाऊन कीड कशी मारायची तें शेतकऱ्यांना शिकवूं लागले. शेतकऱ्यांनींहि तें काम तावडतोब शिकून घेतलें आणि पुढील वर्षींचें पीक वांचवलें. एवढ्यांत कॅरल्टन बँक

बुडाली. केवळ कापसाच्या उत्पन्नावर शेतकऱ्याला जगणें शक्य नव्हतें. १९३० सालीं पाहिली राष्ट्रीय बँक बुडाली. तिच्या जागीं स्थापन झालेली जनता बँक १९३२ सालीं बुडाली. मंदी आली. पांच डॉलर्सची मोड एकाद्या वेळीं मिळायची मारामार पडूं लागली.

पण एकी आणि संघटित कार्य करण्याची वृत्ति इथल्या जनतेला स्वस्थ बसूं देईना. बँकेच्या एक हजार भागीदारांनीं व ठेवीदारांनीं एकत्र येऊन बँक पुन्हा सुरू करावयाचें ठरविलें. ह्या लोकांना पराभव मान्य करायची संवय नव्हती. ठेवीदारांनीं आपल्या ठेवीच्या एकतृतियांश रक्कम घेऊन बाकीची रक्कम बँकेला सोडून द्यायचं कबूल केलं. मग भागीदारांनींही असं ठरवलं कीं प्रत्येक ठेवीदाराच्या ठेवीची पुरेपूर रक्कम ठेवीदारांना दिल्याशिवाय एका पैलाही हात लावायचा नाहीं. हें बाहेर कळतांच लोकांचा बँकेवरील विश्वास वाढला. १९३३ सालीं बँक पुन्हा सुरू झाली. १९४० पर्यंत सर्व ठेवीदारांना आपल्या रकमेपैकीं पै न् पै मिळाली. भागीदारांचेंहि कांहीं नुकसान झालें नाहीं. आज बँकेचा मालमत्ता चाळीस लाख डॉलर्सची आहे.

× × × ×

बँकेच्या ह्या प्रकरणापूर्वीं १९३० सालीं आयर्विन इंग्राम नांवाचा एक स्नेहाळू स्वभावाचा गृहस्थ दोनच वर्षांपूर्वीं सुरू झालेल्या नि रडत खडत चालणाऱ्या सरकारी शेती व यांत्रिककला कॉलेजचा मुख्य म्हणून आला. त्या वेळीं लोकसंख्या कमी व्हायला लागली होती, तरुण गांवें सोडून शहरांत निघून जात होते, जमीन पडिक राहूं लागली होती, उत्पन्न कमी, कर्जें खूप अशी स्थिति होती. घरें पडायला आलीं होतीं. पाण्याचे नळ नव्हते. शाळांची संख्या कमी झाली होती, त्यांची आर्थिक स्थिति अगदीं वाईट होती, शिक्षण पुरें झालेल्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी होती. शेतकरी व व्यापारी ह्यांत वैरभाव होता नि शेतकरी शेतीची नवी पद्धत स्वीकारण्याच्या इतका विरुद्ध होता कीं जेव्हां एक अधिकारी एका शेतकऱ्याकडे नव्या पद्धतीची माहिती द्यावयाला गेला तेव्हां त्याच्यावर त्या शेतकऱ्यानें बंदूक रोखली.

इनग्रॅमनें नि त्याच्या सहकाऱ्यांनीं हें परिस्थितीनें दिलेलें आव्हान स्वीकारायचें ठरविलें. साऱ्या तालुकाभर काम करायचें त्यांनीं ठरविलें. पुढच्या तीस वर्षांत ह्या भागांत जी प्रगति झाली नि जिची अमरसिंगानें नि हिर्शनें स्तुति केली ती घडवून आणण्यांतला फार मोठा वांटा ह्या लोकांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाला द्यावा लागेल. थोड्याच काळांत कॉलेजचें नांव बदलून 'पश्चिम जॉर्जिया असें नांव देण्यांत आलें नि शिक्षकांना शिकवून तयार करण्यासाठीं तिसऱ्या वर्षाचा अभ्यासक्रम चालू करण्यांत आला.

१९५० सालच्या मार्च महिन्यांत मी ॲटलांटाहून मोटरनें येथें आलों तेव्हां शेती मला निकृष्ट अवस्थेंत आढळली. राहत्या घरांची स्थितीहि चांगली नव्हती. ज्या घरांत घरमालक राहात होते तीं घरें जरी चांगलीं असलीं तरी ज्या घरांत भाडेकरू राहात होते त्या घरांची स्थिति चांगली नव्हती.

कॅरल्टन ही आजूबाजूच्या दहाबारा खेड्यांची बाजारपेठ व तीन परगण्यांची व्यापारपेठ आहे. गांवची वस्ती 'ॲडाम्स स्क्वेअर' चौका-भोंवती आहे. मीं कॅरल्टन हॉटेलमध्यें खोली घेतली.

चौकापासून एक मैलावर असलेल्या कॉलेजमध्यें मी घाईघाईनें गेलों. श्री. इनग्रॅम माझी वाट पाहात होते. "आमच्या तालुक्यांतील बरेचसे प्रश्न आम्हीं सोडविले आहेत" ते म्हणाले. आम्ही बऱ्याच प्रश्नांवर चर्चा केली. त्यांतील महत्त्वाचे मुद्दे त्यांनीं स्पष्ट केले. "आमच्याकडून लोकांना फक्त दोनच प्रकारची मदत हवी असते. एक–ते काय करतात नि म्हणतात त्यावर आम्ही विश्वास ठेवावा अशी त्यांची अपेक्षा असते आणि त्यांचे प्रश्न त्यांना स्वतःला सोडविण्यांत मदत करावी. बँक बुडाली तेव्हां नि कापसाच्या पिकावर कीड पडली तेव्हां त्यांनीं स्वतःच्या आपत्तींतून स्वतःच मार्ग काढला. एकादा नवा कार्यक्रम हातीं घ्यायचा झाला तर तो आंखतांना त्यांना स्वतः त्यांत फार मोठा भाग घ्यायची इच्छा असते.

आणि योग्य पुढारी अपुऱ्या साधनांच्या साहाय्यानेंहि जनतेंतल्या जास्तींत जास्त कर्तबगारीला जागें करून कामें करून घेऊं शकतात."

मला सर्व इमारती दाखवीत असतां इन्ग्रॅम एका खोलीसमोर थांबले. तिथें शिक्षक व विद्यार्थी जमून एक डॉलर किंमतींत रंगीत खुर्ची कशी तयार करावयाची तें शिकत होते. कॉलेजच्या प्रायोगिक शेतावरहि आम्ही गेलों. मुसळधार पाऊस वा निकस गवत ह्यांनीं खचून न जातां यश कसें मिळवावें हें निदर्शनास आणणारीं समृद्ध हिरवींचार कुरणें व अस्सल अवलादीचीं गुरें हें ह्या शेतमळ्याचें वैशिष्ट्य. तळमजल्यावरील प्रादेशिक ग्रंथालयांत पंचवीस हजार ग्रंथ होते. ठिकठिकाणीं फिरतें वाचनालय पुस्तकांचा पुरवठा करी, पुष्कळदां गांवचा पेट्रोलपंप म्हणजे गांवचें वाचनालय असे. तिथें पुस्तकें ठेवलीं जात. जसं लोकांचं जमिनीकडे अधिक लक्ष वेधलं तशी पुस्तकांची मागणी वाढत गेली. सध्यां तीन तालुक्यांत दोन लक्ष अडतीस हजार वाचक आहेत.

लोकांना स्वावलंबी कसें करावें ह्याचें शिक्षण ह्या ठिकाणीं शिक्षकांना देण्यांत येई. ह्यांत पालकांच्या बरोबरीनें मुलांनाहि शिक्षण देण्यांत येई. येथील लोकांत असा समज आहे कीं मूल दिवसभरांत जें शिकतें तें एका रात्रींत विसरूं शकतें. म्हणून समाज शिक्षणाची येथील पद्धत फार पूर्वीपासून अस्तित्वांत आहे. 'समाज शिक्षण' हा शब्द इतरत्र त्यावेळीं रूढहि नव्हता.

"तालापूसा तुम्हीं पाहिलंच पाहिजे" असा आग्रह करून इन्ग्रॅमनीं मला त्या चार मैलांवरच्या गांवींहि नेलें. "आपण शाळा बंद होण्यापूर्वी तेथें पोंचूं" ते म्हणाले. त्यांनीं शाळेबद्दलची माहिती सांगितली. १९३७ सालीं ह्या ठिकाणीं शाळेची एक अतिशय गलिच्छ इमारत होती. एक दोन शिक्षक सगळें शिक्षण देत. सामानाची नासधूस करणें नि शाळेचें सामान चोरणें हे नित्याचेच प्रकार होते. शाळेची जबाबदारी आपल्यावर आहे असं इथल्या शेतकी कुळांना वाटत नसे आणि ते शिक्षण-कर द्यायलाहि कधीं तयार नसत.

" आमची एक शिक्षिका इथें आली नि तिनें शेतकऱ्यांच्या एक दोन बैठकी घेतल्या. भाजीपाला हवाबंद करण्याचा कारखाना काढण्यासाठीं त्यांनीं एक इमारत घ्यायचं ठरविलं. नंतर सहकारी पद्धतीवर त्यांनीं धान्य दळण्याची गिरणी चालू केली. आज तिचे तीनशें सभासद आहेत. नंतर त्यांनीं शाळेची इमारत चांगली दुरुस्त केली.

आम्ही कारखान्याजवळ असलेल्या शाळेंत गेलों तेव्हां शाळेंत साठ मुलं होतीं. " शाळेच्या इमारतीच्या कॉंक्रीटच्या पायऱ्या बांधण्याचें सामान आम्हीं तयार केलें." त्या मुलांनीं सहजगत्या सांगितलें नि तें खरं असल्याचं एक पालक म्हणाले, " जेव्हां आम्ही शाळेंत जात होतों तेव्हां मास्तर सांगतील तेवढेंच आम्ही करायचे. स्वत: कांहीं ठरवून करायची संधी आम्हांला कधीं मिळालीच नाहीं. आतां प्रत्येक वर्गांतलीं कामें मुलं स्वत: आंखतात नि पार पाडतात."

योजना कशा आंखल्या जातात तें मीं प्रिन्सिपॉलना विचारलें. त्या म्हणाल्या, " काम सुरू करण्यापूर्वीं मी मुलांना सर्व कांहीं सांगतें. लवकरच आमचे गोट्या खेळण्याचे विभागीय सामने सुरू होणार आहेत. स्पर्धांचे नियम तयार करण्याचें काम मुलांच्या सहकार्यानें चालू आहे." त्या बोलत असतांनाच माझें लक्ष विद्यार्थ्यांनीं बहुमतानें तयार केलेल्या वेळेचा उपयोग कसा करावा ' ह्याबद्दलच्या नियमांच्या फलकाकडे गेलें. मी वाचूं लागलों, ' आपला पुढारी निवडा ' ...... ' लक्ष देऊन नीट ऐकत जा ' ......' आपली पाळी येईपर्यंत थांबा '......' बोलण्यापूर्वीं हात वर करा '......' कांहीं सांगायचं असलं तरच बोला '......' इतर सर्वांना बोलायची संधी द्या.'

दुसऱ्या दिवशीं आम्ही सहा मैलावरील सॅंडहिल वसाहतींत गेलों. शाळेची इमारत विटांची होती. शेजारींच मुख्याध्यापिका व शिक्षिका राहात होत्या. मुलांनीं स्वत: लावलेलें शेत आम्हांला दाखविलें. कांहीं मुलांनीं वर्गांतच मापें तयार करून त्याप्रमाणें कॉंक्रीटचा रस्ताहि बांधला होता.

दुपारीं मिस् मेजर ह्या शिक्षिकेकडे मी जेवायला गेलों. मुलांनीं भराभर आम्हांला वाढलें. ही शिक्षिका नुकतीच अधिक पगाराची नोकरी सोडून येथें आली होती. " इथें प्रत्यक्ष जीवनांतून मला मुलांना शिकवतां येतं—नुसत्या पुस्तकांच्या आधारानें नव्हे. त्यामुळें मुलं कशीं समाधानी असतात. ! "—तिनें कारण सांगितलं. ह्या शाळेंत बरेच शिक्षक ठराविक वेळ मदत करीत असत. शिकवतांना प्रत्यक्ष अनुभवाला अधिक महत्त्व द्यायचं त्यांचं धोरण त्यावरून स्पष्ट होण्यासारखं आहे.

रात्रीच्या सभेंत तीन पिढ्या एकत्र आल्या होत्या. करमणुकीच्या कार्यक्रमांत शेतीवरील गाणीं, विद्यार्थ्यांनीं बसवलेले संवाद, वाद्य व मिश्र संगीत होतें. मध्यंतराचे वेळीं शाळेचे विश्वस्त मेल्विन् आयरेस ह्यांनीं सांगितलें कीं, " कॉलेजचीं माणसं इथें येऊन आतां तेरा वर्षं झालीं. त्यापूर्वीं आम्ही भारी विचित्र माणसं होतों. आमचीं आपसांत भांडणं चालू असायचीं. एकमेकाशीं बोलायलाहि लोक तयार नसत. शाळेची दुर्दशा होत होती नि मुलांना शिकण्यासाठीं वीस मैलांवर असलेल्या शाळेंत जावें लागे. कॉलेजांतून प्रथम डोन फ्रेड गन इथें आले. नांगर हांकणारांच्या जवळ जाऊनहि ते त्यांच्याशीं बोलायचे. ते गांवच्या भांडणांत पडले नाहींत. पण शाळेची आवश्यकता त्यांनीं सर्वांना पटविली. नंतर त्यांनीं आमची बैठक घेतली. अशा तेरा बैठकी घेतल्यावर आम्हीं आमचीं भांडणें बाजूला सारलीं आणि शाळा बंद करण्याच्या ऐवजीं सुधारायचं ठरवलं."

मी जायला निघालों तेव्हां ते मला म्हणाले, " मी मेलों कीं शाळेजवळ मला पुरावं अशी माझी इच्छा आहे. त्या शाळेनंच आम्हांला एकत्र आणलं. "

पश्चिम जॉर्जियांतल्या शाळांनीं कुटुंबांना आपआपले प्रश्न सोडविण्यास मदत केली आहे. सर्वच शाळा ह्या पद्धतीनें काम करीत नाहींत पण इन्ग्रॅमचें तत्त्व जेथें जेथें स्वीकारलें गेलें तेथें तेथें अशी प्रगति झाली. सुदैवानें इथें शिक्षण पुरें केलेले ८५ टक्के लोक ह्या भागांतच राहात आहेत.

वैयक्तिक अडचण सोडवायला लागलं कीं पुष्कळदां सबंध समाजाच्या अडचणी सोडवायचा मार्ग त्यांतून मिळतो. इनूग्रॅमचे सहकारी डीन रॉबर्ट्स म्हणाले, " आपल्या अडचणी स्पष्टपणें सांगायला लोकांना प्रवृत्त करणें हा एक खरा उपाय आहे. पुष्कळदां त्यांना बोलायला लावायचं म्हणजे वर्षांच्या वर्षं प्रयत्न करीत बसावं लागतं, पण दुसरा उपाय नाहीं. ह्या भागांतल्या काळ्यागोऱ्या पुढाऱ्यांचं एक मंडळ आम्ही दहा वर्षांपूर्वी बनवलं. एक वर्षभर ह्या मंडळाशीं नुसती चर्चाच करीत होतों. मग आरोग्य योजनेची निकडीची एकादी गरज समोर उभी राही, पण काम करायला फारशीं माणसं तयार नसत. म्हणून जिथें जिथें चार लोक एकत्र जमत तिथें तिथें आम्ही बोलायची संधी सोडत नसूं. त्यांच्या कार्यक्रमांत भाग घ्यायचीहि संधी आम्ही दवडीत नसूं. शाळेच्या एकदोन सभासदांना जमणाऱ्या मंडळीशीं गप्पा मारण्यासाठीं आम्ही घेऊन जायचे. लोकांना थोडा उत्साह वाटावा म्हणून शाळेचा बँड आम्ही घेऊन जात असूं. संध्याकाळपर्यंत आम्हांला बोलायची संधी मिळायची. आम्ही आरोग्य-रक्षणाबद्दल, परिचारिकांच्या आवश्यकतेबद्दल, शाळेच्या सुधारणेच्या आवश्यकतेबद्दल बोलत असूं. कांहीं वर्षं असं खतपाणी दिल्यावर लोक थोडेफार बदल करायला संमति द्यायचे.

\+ \+ \+

धर्मोपदेशक डिक फ्रिन १९३७ सालीं इथें आले नि रात्रंदिवस त्यांनीं कामाला वाहून घेतलें. शेती नि शेतकऱ्याचं हृदय ह्या दोन्हींची प्रगति करायचा निर्धार त्यांनीं केला नि आपलें धर्ममंदिर एवढेंच केवळ आपलें कार्यक्षेत्र आहे असें न समजतां सारें जग हें आपलें कार्यक्षेत्र आहे ह्या निर्धारानें ते कामाला लागले.

" आमच्यांत एकी असायच्या ऐवजीं भांडणें नि गैरसमजच अधिक होते." डिक फ्रिन म्हणाले," विद्यालयें, समाज मंडळें, शेती व औद्योगिक संघटना ह्या सर्वांतून सहकार्याऐवजीं एकमेकाचे पाय ओढण्याची प्रवृत्ति अधिक होती. त्यामुळें सर्वप्रकारचें सरकारी सहाय्य आणि सर्वप्रकारच्या

संघटना असूनहि आमची प्रगति होत नव्हती. उलट आपसांतले हेवेदावे मात्र वाढत होते. हे सर्व भेद मिटवून आम्हांला एकत्र आणणारा एकादा दुवा आम्हांला हवा होता. तेव्हां एकदां आम्हीं सर्वांनीं एकत्र बसून असें ठरविलें कीं कांहीं काम करायचें असेल तर निरनिराळें काम करीत बसण्यापेक्षां सर्वांनीं एकत्र येऊन काम केलेलेंच चांगलें. "

" आणि मग तुम्हीं सुरुवात कशी केलीत ?"

" १९४१ सालीं मॅंडाविल गिरणीला वाचनालय व कल्याणकेंद्र हवें होतें म्हणून त्यांनीं गिरणीच्या एका गुदामांत जागा दिली. कॉलेजनें माणसें पाठविलीं आणि माझ्या धार्मिक शिक्षणाच्या शाळेनें पैसे व पुस्तकें गोळा केलीं. हें केंद्र सुरू झाल्यावर ४२ सालीं बालमंदिरहि असेंच सुरू करण्यांत आलें. ह्या प्रयोगामुळें गांवांतली उदासीनता नष्ट होऊन विचारांना नवी चालना मिळाली." क्लिनच्या साहाय्यानें इतर चर्चहि कामें करूं लागली.

लोखंडी मालाचा दुकानदार ग्लेन होगन म्हणाला, " गांवाला कंटाळून तरुण माणसें गांवाबाहेर पडत असत. एकादी नवी कल्पना अमलांत आणणं गांवांतल्या जुन्या माणसांच्या विरोधामुळें शक्य होत नसे व गांव सोडावें लागे. पण गिरणीला जसें यश आलें तसें सहकार्यानें काम करण्यांत आम्हांला कां यश येऊं नये असें आम्हांला वाटूं लागलें. "

हेंच कार्य करण्यासाठीं कॅरोल परगणा सेवा संघाची स्थापना १९४३ सालीं झाली. संघानें आपले उद्देश एका चाकाच्या चित्रानें स्पष्ट केले. चाकाचा मध्य म्हणजे संघ व अनेक कार्यें करणाऱ्या इतर संघटना म्हणजे हा मध्य व चाकाची धाव ह्यांना सांधणाऱ्या दांड्या. संघानें गांवच्या सर्वांत उंच इमारतींत आपली कचेरी थाटली व सर्व क्षेत्रांत काय कामें करतां येतील त्याची पाहणी करण्यास सुरुवात केली. सत्तर नागरिक कामाला लागले. प्रत्येक गांवाला आपला विकास कार्यक्रम आखावयास सांगण्यांत आलें नि सतरा हजारापासून तों चाळीस हजार डॉलर्सपर्यंतचीं

अंदाजपत्रकें प्रत्येक गांवासाठीं तयार करण्यांत आलीं. ही सर्व रक्कम जमा होत नसे. पण नागरिकांनीं व व्यापारी नि उद्योगधंदेवाल्यांनीं संघाचें कार्य चालू ठेवलें.

पहिल्यानें सिम ह्यांची संघाचे चिटणीस म्हणून नेमणूक झाली होती. मी गेलों तेव्हां ग्लेन होगन त्यांचे जागीं काम करूं लागले होते. गांवांत एक पादत्राणें तयार करणारा कारखाना, पेन्सिलींचा कारखाना, विणकामाचा कारखाना असे कारखाने सुरू झाले होते व आणखी नव्या कारखान्यांच्या योजना चालू होत्या.

कल्याण विभागाचें काम करणाऱ्या ग्लॅडिस ग्रिफिन ह्या रेडक्रॉसच्याहि कार्यकर्त्या होत्या. त्या सर्वांशीं सहानुभूतीनें वागत. पण भावनाविवश होत नसत. पुष्कळदां त्या आपल्या जबाबदारीवर निर्णय घ्यायच्या. कॅदरीन नांवाच्या मुलीच्या बाबतींत त्यांनीं तसेंच केलें. तिचे हातपाय लुळे पडले म्हणून तिच्या वडिलांनीं तिला उचलून ग्रिफिनच्या कचेरींत आणलें. ती सहा महिन्यांपेक्षां अधिक जगणार नाहीं असें डॉक्टरांनीं सांगितलें पण ग्रिफिनना तें पटलें नाहीं. आणखी तपासणीनंतर कॅदरीनच्या मेंदूवर वाढ झाल्याचें उघड झालें. ऑपरेशननंतर ती इतर मुलांसारखी हंसूं खेळूं लागली.

\+ + + +

संघाच्या स्थापनेनंतर चार वर्षांनीं कार्सन प्रिचर्ड हे बाप्तिस्त चर्चचे धर्मोपदेशक म्हणून गांवांत आले. त्यांची वृत्ति उपदेश करण्यापेक्षां दुसऱ्याचें ऐकून घेण्याकडे अधिक होती. दुसऱ्यांना बोलायला लावण्याची कलाहि त्यांना चांगली अवगत होती. नवें जीवन समजावून घेऊन धर्म-संस्थेचा पाठिंबा मिळवायला हाच मनुष्य योग्य आहे असें संघाच्या सभासदांना पटलें. प्रिचर्ड ह्यांच्या निरनिराळ्या कार्यांना त्यांच्या वरिष्ठांनीं हरकत घेऊन जेव्हां त्यांची बदली करायचें ठरविलें तेव्हां गांवकऱ्यांनीं अर्ज करून त्यांची बदली रद्द करून घेतली. सर्व शैक्षणिक कार्यें सुरळित चालूं लागल्यावरच त्यांनीं आपली बदली स्वीकारली.

प्रिचर्ड आणि फ्रिन ह्यांची जोडी चांगलीच जमली. ते दोघे ओक माऊंटन ह्या छोट्या गांवीं गेले. ह्या गांवाचे भरभराटीचे दिवस संपले होते. गांवची जमीन अगदींच निकस होती. दारूच्या गुत्त्यांना मात्र तेजी आली होती. फ्रिन म्हणाला, "ओक माऊंटनविषयींच्या विचारांनीं मला पुष्कळदां झोंप येत नाहीं. तसं म्हटलं तर तिथले लोक वाईट नाहींत. पण जमीनच निकस असल्यानें त्यांचाहि इलाज नसतो."

इथली शाळा हें गांवचें भूषण आहे. एफी आणि ग्रेरू ह्या शिक्षिका इथें काम करतात. १९४१ सालीं एफी इथें आली तेव्हांची परिस्थिति तिनें सांगितली. "शाळेला रंग नव्हता. चोऱ्या व्हायच्या म्हणून शाळेचीं दारें व खिडक्या सतत बंद असत. अधून मधून सातवीचीं मुलं आजूबाजूच्या झाडीला आग लावून देत नि माझ्या पूर्वींची शिक्षिका त्यांना मग चाबकानें झोडपून काढी." एफीनें दारं खिडक्या उघडून ठेवल्या. सातवीच्या पोरांनीं आग लावली. ती साऱ्या पोरांना बरोबर घेऊन तिनें विझवली. "तुमची मालमत्ता कुणीं जाळली तर तुम्हांला चालेल का?" तिनें मुलांना विचारलं व पुन्हा कोणी आग लावणार नाहीं असा विश्वास व्यक्त केला.

"पण आम्हांला तुम्ही चाबकानें फोडून काढणार नाहीं?" एकानें विचारलं.

"त्यानें तुम्ही सुधाराल?" तिनें विचारलं.

"नाहीं."

"मग मारायचं कशाला?" तिनें विचारलें. पण पुढं कोणीं आगी लावल्या नाहींत. उलट घरांत कांहीं कारणानें मोकळेपणा न वाटणारीं मुलं शाळेची वेळ संपल्यावरहि शाळेंतच घुटमळत. स्नेहभावानें सर्वांच्या सुखदुःखांत सामील होऊन एफीनें आदर्श शिक्षिका कशी असते तें प्रत्यक्ष दाखवलं.

एफीनें तयार केलेल्या ह्या वातावरणानें गांवांतले लोक नव्यानें विचार करूं लागले. गांवांत बदल करायला पाहिजेत असें त्यांना वाटूं लागलें. गांवांत एक समाज मंदिर असावें असें ते बोलूं लागले. जॉर्जियाच्या टेक्निकल स्कूलनें मंदिराच्या इमारतीचे आराखडे तयार केले. गांवच्या लोकांनीं लांकूड दिलं, इतर सामान दिलं, सुतारकाम केलं, श्रमदान केलं. रॉस हंटरनें सांगितलें, " मी सकाळीं आठ वाजतां बांधकामावर जायचा; बारा वाजेपर्यंत काम करून जेवायला जायचा; दोन वाजतां माझ्या नोकरीवर परत जाऊन तिथें रात्रीं दहा वाजेपर्यंत काम करायचा; नि थोडी झोंप काढून पुन्हा सकाळीं इथें यायचा. आम्ही विहीर खोदायला लागलों तेव्हां तिथें पाणी लागणार नाहीं असं सर्वांनीं मत दिलं. पाणी लागेपर्यंत खणायचं आम्हीं ठरवलं. एक महिनाभर आम्ही खोदीत होतों; मग पाणी लागलं. "

सर्वपंथीय प्रार्थनामंदिरहि बांधून झालं. पहिल्या दिवशीं धर्मोपदेशकानें प्रार्थना केली. " ईश्वरा, हें मंदिर आम्ही तुझ्या चरणीं अर्पण करीत आहोंत. ह्या गांवचं लाकूड, आमचा निढळाचा धाम आणि स्नेह्या-सोबत्यांची मदत ह्यांत आम्हीं घातलीं आहेत तीं देवा, आम्ही तुझ्या चरणीं अर्पण करतों. देवा, आम्हां सर्वांना असंच एकत्र ठेव. एकमेकाला मदत करण्याची बुद्धि दे. ह्या गांवची सुखद स्मृति आमचीं मुलें जेव्हां मोठीं होतील तेव्हां त्यांच्या हृदयांत राहूं दे. "

बार्ड मॅक् ॲलिसन ह्या तेथील योजना—अधिकारी आहेत. त्यानें आपला एक अनुभव सांगितला. " ओक माऊंटनला गांवकऱ्यांची एक बैठक घेऊन त्यांत एका डॉक्टरांचं भाषण करायचं ठरलं. पण गांवकरी जमल्या-बरोबर गांवांत हुनर शाळा कशी चालवतां येईल ह्याबद्दल जी चर्चा सुरू झाली ती खूपच रंगली. चर्चा संपली तेव्हां डॉक्टरना बोलायला वेळच राहिला नाहीं. पुढच्या बैठकीला डॉक्टरांनीं घरांची संख्या व संडासाला लागणारे पडदे ह्यांचे आंकडे दिले. हे आंकडे गांवच्या मुलांनींच घरोघर फिरून गोळा केले होते. डॉक्टरांनीं आंकडे सांगतांच आपण पडदे तयार

करून देऊं असं गांवच्या हुन्नर शाळेनें चटकन् सांगितलं. पहिल्या बैठकींत आपल्याला बोलायला मिळालं नाहीं ह्याचं डॉक्टरांना वाईट वाटलं नाहीं.

ह्या नव्या जीवनाचें स्वरूप अलेक्झांडर ह्या शेतकऱ्यानें स्पष्ट केलें. ते म्हणाले, " पूर्वी शेतकरी नुसता जगत होता एवढंच. आमच्या पूर्वजांचींच पापं आम्ही उगाळीत होतों. जमीन साफ करायची, पेरायचं नि जमीन निकस झाली कीं तें शेत टाकून पुढें जायचं. आतां कॉलेजच्या नि शेती खात्याच्या मदतीनें आम्ही जमिनीची निगा राखतों. आतां शेतकरीहि सुखानें जगूं शकतो. "

\+ + + +

स्मिथफील्ड कॅरल्टनपासून अठरा मैलांवर आहे. सोल स्मिथ ह्या सुशिक्षित स्त्रीनें पुढाकार घेतल्यानें अटलांटा व्यापार मंडळानें लावलेलं ग्रामसुधारणा पारितोषिक ह्या गांवानें जिंकलं.

पुढें आणखी काय करायचं ह्याचा विचार गांवचे लोक करूं लागले. त्यांत पोलार्ड नांवाचा साठ वर्षांचा एक म्हातारा होता. ह्यानें शेजाऱ्याचीं मुलं नि नातवंडं शिकून पदव्या घेऊन बाहेर पडलेलीं पाहिलीं. त्याला स्वतःला शिकायला मिळालं नव्हतं. त्याच्या डोक्यांत विचार आला, " आमचं कॉलेज आम्हांला कां मिळूं नये ? "

एका शनिवारीं रात्रीं प्रिचर्ड आणि डीन रॉबर्ट्स ह्यांना जेवायला बोलावून ह्या विषयावर चर्चा झाली व शेवटीं दोन महिन्यांचा एक अभ्यासक्रम घ्यायचं ठरलं नि ह्या अभ्यासक्रमांत पुढील प्रश्नांचीं उत्तरं द्यायचं ठरलं. ' दुसऱ्या एकाद्या ग्रहावर माणसं राहतात का ? ' ' आपले शब्द कसे तयार झाले ? ' ' अणुस्फोट म्हणजे काय ? ' तिथें बसलेल्या गसच्या नातवानें प्रश्न विचारला होता, " बाबा दगड कसे येतात ?"—तेव्हां तोहि प्रश्न अभ्यासक्रमांत सामील करून घेण्यांत आला.

ज्ञानाच्या ह्या तहानेकडे कोणता तत्पर शिक्षणतज्ज्ञ दुर्लक्ष करील ! १९४९ सालीं दोन महिन्यांचें हें ' कॉलेज ' घेण्यांत आलें. जितकं ज्ञान वाढलं तितकी ज्ञानाची तहानहि वाढली. ह्या वर्गानें " सहकार म्हणजे

यश " हें वाक्य आपलें बोधवाक्य म्हणून निवडलें. एका वर्षांत अशीं आणखी पांच कॉलेजें निघालीं, त्यांत ३०० प्रौढ शिकूं लागले, १५४ जणांनीं प्रमाणपत्रें मिळाविलीं.

एकदां भारतांतील ग्रामीण वाचनालयांचे मुख्याधिकारी डॉ. देसराज कल्ला युनिटी इथें आले. ही शिक्षणयोजना पाहून ते म्हणाले, " मी सतरा देश हिंडून शोधीत असलेलं उत्तर मला इथें मिळालं. "

शिक्षणक्रम संपल्यावरहि लोक एकत्र जमून मिळालेल्या शिक्षणाचा आढावा घेतात नि पुढील योजना तयार करतात.

\+ \+ \+ \+

आतां संघाकडे अशीं कॉलेजें उघडण्यासाठीं निग्रोंच्याहि सतत विनंत्या येत असतात. पांच वर्षांच्या ह्या प्रयोगानंतर प्रिचर्ड ह्यांचें असें मत झालें आहे कीं ह्या समाजांत आतां प्रतिष्ठा निर्माण झाली आहे. लोक केवळ जगण्यासाठीं धडपडत नाहींत किंवा पैसा व कीर्ति ह्यांच्यामागें धांवत नाहींत.

\+ \+ \+

आतां हा प्रदेश नवीं कामें करायला तयार झाला होता. पाणीपुरवण्यासाठीं व सहलीला योग्य अशी एखादी शोभिवंत जागा तयार करण्यासाठीं गांवाजवळ एकादें तळें हवें होतें.

एकदां गांवचे एक व्यापारी जिमी होम्स व सिटी एंजिनिअर बाहेरगांवीं जलविहारासाठीं गेले असतां सिटी एंजिनिअर म्हणाले, " जर आपल्या गांवचें तळें तयार असतें तर जलविहारासाठीं आपल्याला बाहेरगांवीं यावें लागलें नसतें. "

" कोणतें तळें ? "

" चला मी दाखवतों. " एंजिनिअर म्हणाले व वीस वर्षांपूर्वीं एक मैल तळ्याच्या योजनेचे आराखडे व तळ्याच्या हद्दी दर्शविण्यासाठीं लावलेले खांब त्यांनीं दाखविले.

अनुक्रम वि: ९५....
क्रमांक ......... नों: दि: .........

ती कल्पना ताबडतोब गांवभर झाली व तळ्याचें काम करण्यासाठीं एक समितीहि स्थापन झाली. तळ्याच्या किनाऱ्याची जमीन तिचे शंभर लहान लहान तुकडे पाडून विकण्यांत आली. पुढें अशा जमिनी विकून आणखी पैसा उभा करण्यांत आला. सार्वजनिक उपयोगाच्या जागा राखून ठेवण्यांत आल्या. खोदकामास सुरुवात झाली नि गांवाला एक सुंदर तळें आणि पाणीपुरवठ्याचें साधन मिळालें.

एक लाख डॉलर्सचें टॅनर स्मारक हॉस्पिटलहि प्रिचर्डनें असेंच मिळविलें. त्यानें पन्नास हजार डॉलर्स जमा केले नि एका श्रीमंत नागरिकानें तेवढ्याच रकमेची भर घालून आधुनिक हॉस्पिटल उभें केलें.

ह्या प्रवृत्तींमुळें वांशिक भेद बाजूला होऊन सर्व नागरिक एकत्र आले. एका निग्रो शेतकऱ्याची मुलगी कॅदरीन हार्डी १९५२ च्या ऑलिम्पिक सामन्यांत धांवण्याच्या शर्यतींत पहिल्या आलेल्या अमेरिकन महिला पथकांत होती. ती परत आली तेव्हां साऱ्या गांवानें तिचें प्रचंड स्वागत केलें.

\+ + + +

ह्या गांवाची कथा जेव्हां नभोवाणीवरून सांगण्यांत आली तेव्हां न्यूयॉर्क हेरॉल्ड ट्रिब्यून फोरमची हेलेन वॉलर हिच्या मनांत ती कायम घर करून राहिली. एकदां परराष्ट्राच्या एका अधिकाऱ्यानें तिला चिडविण्यासाठीं विचारलें, "अमेरिकन नागरिकाला अधिकार देणारा तुमचा कायदा आम्हांला कशाला दाखवतां? आशियांतल्या अशिक्षित शेतकऱ्यालाहि कळेल असें अमेरिकेंत काय आहे तें सांगा."

ती कॅरल्टनला गेली. नभोवाणीवर तिनें ऐकलेली कॅरल्टनची गोष्ट तिला आठवत होती. प्रिचर्डला भेटून तिनें विचारलें, "भारतांतून एकादा शेतकरी इथें कां बोलावून घेत नाहीं? परराष्ट्रीयांचे संशय तरी त्यामुळें दूर होतील." प्रिचर्ड तेव्हां कांहीं बोलले नाहींत. हेलेननें संघापुढें ही कल्पना मांडली. पंचवीस सभासदांची एक समिति तयार करण्यांत आली व भारतांतून एका शेतकऱ्याला बोलवायचें ठरलें. त्याचा खर्च ट्रिब्यून व संघ मिळून सोसणार होते.

एटावा जिल्ह्यांतील अडतीस वर्षांच्या, अमरसिंग ह्या शेतकऱ्याची निवड करण्यांत आली. त्याच्या मालकीची साठ गांवांत मिळून एकंदर वीस हजार एकर जमीन होती. स्वातंत्र्ययुद्धांत त्यानें दोनदां तुरुंगवास भोगला होता. त्याला दोन मुलें होतीं.

मार्च १९५२ मध्यें अटलांटा विमानतळावर दोन महिन्यांचा पाहुणचार भोगण्यासाठीं अमरसिंग पोंचला. तो कसा दिसत असेल ह्याचें सर्वांना अतिशय कुतुहल वाटत होतें.

" कुठल्या शहरांत आपण जायचं ? " अमरसिंगला विचारण्यांत आलें.

" कराची ते न्यूयॉर्क, सगळीं शहरं सारखींच दिसतात मला. कॅरल्टनला जाऊं या प्रथम. " अमरसिंग म्हणाला.

गांवच्या समितीनें त्याला हॉटेलमध्यें राहायला खोली दिली. त्यांना एक शंका वाटत होती. अमरसिंगला आपल्या घरीं लोक बोलावतील का ?

पहिल्या दिवशीं संध्याकाळचें जेवणाचें आमंत्रण चर्चचें होतें. जेवायच्या वेळीं त्यानें भरपूर खाल्लें, तो मोकळेपणानें सर्वांशीं बोलला आणि स्त्रियांच्या कपड्यांची व सौंदर्याची त्यानें स्तुति केली. त्याची ही मोकळे-पणाची वागणूक गांवभर कळतांच दोन महिन्यांत त्याचा एकहि दिवस जेवणाच्या आमंत्रणाशिवाय गेला नाहीं.

त्यानें शेतकऱ्यांशीं चर्चा केली. त्यांच्या शेतीची, शेती करण्याच्या पद्धतीची, यंत्रांची पाहणी केली. पिकाबद्दल चर्चा केली. शेतकरीकुटुंबांत तो फार प्रिय झाला.

निग्रो माजी सैनिकांच्या संघटनेंत तो रात्रीं आठपासून दोन वाजेपर्यंत बोलत बसला.

" मीहि काळा असल्यानें ते माझ्याशीं फार मोकळेपणानें बोलले. " तो म्हणाला, " वांशिक भेदानें त्यांना फार वाईट वाटतें, पण मला वाटतें गोऱ्यांची नवी पिढी वंशभेद नि वर्णभेद विसरून वागेल नि आम्ही भारतांत हरिजनांचा प्रश्न जसा सोडवला तसा इथला निग्रोंचा प्रश्न सुटेल. "

अमरसिंगनें आपल्या मनांतील विचार युनिटी येथें केलेल्या भाषणांत स्पष्ट केले. तो म्हणाला, "मी अमेरिकेंत आलों तेव्हां अमेरिकन लोकांबद्दलची माझी कल्पना निराळी होती. आतां तुम्ही एकत्र येऊन कामें कशीं करतां तें मला समजून घ्यायचें आहे."

अमरसिंग प्रत्येक खेड्यांत गेला. दहा हजार लोकांशीं त्यानें हस्तांदोलन केलें. प्रत्येक शाळेला त्यानें भेट दिली.

आपण एकत्र कामें कशीं करतों तें निरनिराळ्या लोकांनीं त्याला निरनिराळ्या शब्दांत सांगितलें. "प्रत्येक कामांत सर्वांचीं मतें विचारण्यांत येतात म्हणून." "आम्ही एकमेकाचा मान राखतों, प्रत्येकाचें ऐकून घेतों." "अमर, हें सारें एका छोट्या शब्दामुळें होतें. प्रेम—मग त्याला तूं कसलेंहि धार्मिक नांव दे." असें एकएकाचें मनोगत.

"मीं तुमचें बायबल दोनदां वाचलें," अमर म्हणाला, "बायबलमध्यें लिहिलें आहे तसेंच तुम्ही वागतां आहांत."

अमरला निरोप देतांना तिथले पोस्टमास्तर म्हणाले, "माझ्या दृष्टीनें अमर म्हणजेच भारत." दुसरा एकजण म्हणाला, "आमच्या करोल परगण्याइतकेच भारतीय चांगले लोक आहेत हें आम्ही शिकलों." एडिथ फॉस्टर म्हणाले, "अमर आम्हांला आमच्यांतलाच एक वाटतो. आमच्या दोन देशांतील अंतर त्याच्यामुळें नाहींसें झालें आहे. अशीं आणखी माणसें आलीं पाहिजेत."

हेरॉल्ड ट्रिब्यूनच्या सहकार्यानें अमरबरोबर पॅटन भारतांत आला. तोहि भारतांत दोन महिने राहणार होता. एटावा जिल्ह्यांत त्यानें शेतकऱ्यांना जमिनीला बांध कसे घालावेत व जमिनीची धूप थांबवणारी कुडझु वनस्पती शेतांत कशी लावावीत तें शिकविलें. शेतकरी त्याला 'कुडझु पॅट' म्हणूं लागले.

ह्यानंतर संघाला मोठी आर्थिक तूट सहन करावी लागली. गांवच्या व परगण्यांतल्या सर्वांनीं पुन्हा एकत्र येऊन तूट भरून काढली. पण आणखी एक मोठी आपत्ति समोर उभी राहिली. १९५२ मध्यें मॉडविल् गिरणी

बंद पडली. आधुनिक गिरण्यांच्या चढाओढींत ती टिकणें अशक्य झालें. सहकार्यानें गिरणी चालवणं अशक्य होतें. पण बेकार होणाऱ्या चारशें कामगारांच्या उपजीविकेचा प्रश्नहि होताच. तेव्हां एक नवी कंपनी काढून बंद झालेल्या गिरणीच्या इमारती ताब्यांत घेण्यांत आल्या आणि कपडे रंगविण्याच्या व खडीकाम करण्याच्या कारखान्यांत तीनशें कामगारांना पुन्हा रोजगारी मिळूं शकली.

ह्या अनुभवामुळें आर्थिक प्रश्नांना हात घालण्याची आवश्यकता अधिक भासूं लागली. आतां प्रत्येकाचें सुखदुःख हा वैयक्तिक प्रश्न राहिला नाहीं. तो सर्वांचा सामुदायिक प्रश्न झाला होता.

तसं म्हटलं तर ह्या भागाचा नि भारताचा कांहीं संबंध नव्हता. पण होरेन्स होम्स ह्यांनीं सांगितल्याप्रमाणें पॅटन नि सिंग हे एकमेकाच्या देशांत गेल्यानें देशादेशांतील स्नेहभाव अधिक वाढला. ह्या भावनेला अधिक उत्तेजन देण्यासाठीं सर्व आर्थिक अडचणी सोसूनहि एक भारतीय कुटुंबच इथें पाहुणे म्हणून निदान सहा महिन्यांसाठीं बोलवायचें त्यांनीं ठरविलें.

एटावाचा हरिश्चंद्र सेठ ( वय ३३ ) हा शेतकरी व विस्तारयोजनेंत साक्षरता प्रचाराची अधिकारी असलेली त्याची २७ वर्षें वयाची बायको अन्नपूर्णा पाहुणीं म्हणून इथें आलीं. त्यांना राहायला घर, मोटर देण्यांत आली. त्यांच्या मुलाचा–सिद्धार्थचा–जन्म इथेंच झाला. दोघांनींहि शेती, सामुदायिक कार्यें, शिक्षणपद्धति ह्यांचा अभ्यास केला.

ही सर्व कथा एकदा इन्ग्रॅमनीं चित्रपटद्वारा दाखविली. चित्रपट दाखवून झाल्यावर कोणीं तरी विचारलें, " रात्रीचे वर्ग घेणाऱ्या तुमच्या शिक्षकांना किती पगार मिळतो ? "


इन्ग्रॅमना थोडें आश्चर्यच वाटलें. शांतपणें ते म्हणाले, " हें बघा, त्यांना पगारच मिळत नाहीं. ह्या शिक्षकांना आपल्या लोकांबद्दल खरें प्रेम वाटतें म्हणूनच ही सारी प्रगति झाली. "

सारें शालागृह त्या वेळीं शांत होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

# मनपसंत

## लेखनासाठीं





मनांत असूनही अनेकवार अनेक गोष्टीं-मुळें मनपसंत आणि सुलभ लेखन होत नाहीं. मनपसंत लेखनासाठीं मोहरेदार कागद अगर केवळ मनाचा उत्साह असून भागत नाहीं. ह्या गोष्टींबरोबर चांगली लेखणीही असावी लागते. चांगल्या लेखणीची उणीव आजकाल प्लेटो पेन्स भरून काढीत आहेत. प्लेटो पेन्सच्या मृदु व अणीदार नीबमुळें तावच्या ताव कागदावर सुलभ व सफाईदार लेखन करतां येतें.

# plato

**चार रुपयांपासून अठरा रुपयांपर्यंत मिळणाऱ्या प्लेटो पेन्सपैकीं कोणतेंही तुम्ही तुमच्या आवडीप्रमाणें निवडूं शकतां.**

**म्हात्रे प्रॉडक्ट :** PLATO RSGD

व्यापारविषयक सर्व चौकशीसाठीं
सोल डिस्ट्रिब्यूटर्स
**बेस्ट फाउंटनपेन डेपो**
७९, देवकरण मॅन्शन
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.

Shilpi-m.p-mar-468 -a

REFBK 0009737

REFBK-0009737